सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शनिवार, २८ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३२८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### नफावसुलीने बाजारात घसरण

**मुंबई :** आठवडाभरात शेअर बाजारात विक्रमी वाढ झाल्यानंतर अखेरच्या सत्रात मात्र मोठ्या प्रमाणात नफावसुली झाल्याने बाजारात ताण निर्माण झाला. निर्देशांक २००हून अधिक अंकांनी खाली आला, तर निफ्टीतही ३७ अंकांची घसरण झाली.



निर्देशांकातील ३० पैकी १५ शेअर्स नफ्यात, तर उर्वरित १५ तोट्यात होते. निफ्टीतील ५० पैकी २९ शेअर्स फायद्यात होते. सन फार्माचे शेअर्स सर्वाधिक वाढीसह बंद झाले. त्यापाठोपाठ टायटन, एनटीपीसी, रिलायन्स इंडस्ट्रीज, एचसीएल टेक, बजाज फिनसर्व्हचे शेअर्सही वधारले होते. मात्र, बँक, वाहन उद्योग, टेलिकॉम कंपन्या अशा महत्त्वाच्या क्षेत्रातील शेअर्सवर विक्रीचा दबाव दिसून आला.

### पूर्व लडाखमधून सैन्य मागे घेण्यास चीन तयार

**नवी दिल्ली :** गेल्या चार ते पाच वर्षांपासून पूर्व लडाखमधील सीमेवर भारत आणि चीनमध्ये तणावाचे वातावरण आहे. हा तणाव कमी करण्यासाठी अनेक दिवसांपासून प्रयत्न सुरू आहेत. आता पूर्व लडाखच्या नियंत्रण रेषेवरील तणाव संपवण्यासाठी आणि संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने लडाखमधून सैन्य मागे घेण्यासंदर्भात चीनने सहमती दर्शवली आहे. चीनच्या संरक्षण मंत्रालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, चर्चेच्या माध्यमातून चीन आणि भारतातील मतभेद कमी करण्यास सहमती देण्याबरोबरच एकमेकांशी संवाद मजबूत करण्यास आम्ही सहमती दर्शवू. सयावेळी झांग म्हणाले की, भारत आणि चीनने पूर्व लडाखमधील नियंत्रण रेषेवरील तणाव कमी करण्यासाठी आणि प्रलंबित मुद्यांवर संवाद मजबूत करण्यासह काही सहमती करण्यास सक्षम आहेत.

# अधिकाऱ्यांच्या बदल्या का केल्या नाहीत?

## निवडणूक आयोग राज्य सरकारवर नाराज




**मुंबई, २७ सप्टेंबर**

विधानसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत सूचनांचा अहवाल न दिल्याने केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारवर नाराजी व्यक्त केली. निवडणूक आयोगाने महाराष्ट्रासह निवडणुका होत असलेल्या चार राज्यांच्या मुख्य सचिवांना पत्र लिहीत एकाच जागी तीन वर्षांपेक्षा जास्त काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या सूचना दिल्या होत्या. पण, याकडे या राज्यांच्या मुख्य सचिवांनी दुर्लक्ष केल्याचे आयोगाने म्हटले आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार तसेच आयुक्तद्वय ग्यानेश कुमार आणि डॉ. सुखबीरसिंह संधू आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत.

राज्याच्या मुख्य सचिवांना दिलेल्या कालावधीत या अधिकाऱ्यांची बदली का केली नाही, हे स्पष्ट करण्याचा निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिला. तीन वेळा स्मरणपत्र पाठवूनही राज्य सरकारकडून कुठलेही उत्तर न आल्याने निवडणूक आयोगाने आपली नाराजीही व्यक्त केली.

राज्याचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालकांसोबत आढावा बैठकीत लोकसभा निवडणुकीत मुंबई शहरातील मतदान केंद्रांवर मतदारांना झालेल्या गैरसोयीबद्दल निवडणूक आयोगाने नाराजी व्यक्त केली. मतदान केंद्रांवर बेंच, पंखे, पिण्याचे पाणी, शेड अशा सर्व किमान सुविधांची खात्री करण्याचे अधिकाऱ्यांना सांगण्यात आले होते. मात्र, या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या नव्हत्या. विधानसभा निवडणुकीत मतदान केंद्रांवर मतदारांचे रांगांचे योग्य नियोजन करण्याचा आदेश निवडणूक आयोगाने दिला आहे. (तभा वृत्तसेवा)

### निवडणूक आयोगाची आज पत्रपरिषद

राज्याचे पोलिस महासंचालक, मुख्य सचिव आणि इतर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर निवडणूक आयोग शनिवारी पत्रपरिषद घेणार आहे. दरम्यान, राज्य विधानसभेची निवडणूक दोन किंवा तीन टप्प्यांत घेतली जाईल, अशी चर्चा सुरू आहे. तथापि, या प्रश्नाचे उत्तर शनिवारी आयोगाच्या पत्रपरिषदेनंतरच मिळणार आहे.

मंकीपॉक्सबाबत सतर्क राहा

# केंद्राच्या राज्यांना सूचना

**नवी दिल्ली, २७ सप्टेंबर**

केंद्राच्या आरोग्य मंत्रालयाने मंकीपॉक्स विषाणूच्या संदर्भात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना सजग राहण्याचा निर्देश दिला आहे.

भारतात मंकीपॉक्स क्लेड १ बी चा नवीन रुग्ण आढळल्याने भारत हा आफ्रिकेबाहेरील तिसरा देश ठरला आहे, ज्यात या प्रकारचा रुग्ण आढळला आहे. जारी केलेल्या निर्देशानुसार, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने मंकीपॉक्स संशयित रुग्णांना विलगीकरणात ठेवण्यास सांगितले आहे. यासाठी रोग प्रतिबंधक उपाययोजना कडकपणे राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. चाचणीसाठी ठरवलेल्या प्रयोगशाळांची यादी देखील दिली आहे.

आरोग्य मंत्रालयाच्या मते, १४ ऑगस्ट रोजी जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्स विषाणूच्या प्रादुर्भावाला आंतरराष्ट्रीय आरोग्य आणिबाणी म्हणून घोषित केले आहे. २००५ च्या आंतरराष्ट्रीय आरोग्य नियमांनुसार भारत या घोषणेचा भाग आहे. राज्य सरकारांना आरोग्य सुविधांमध्ये तयारीची तपासणी करण्याचा आदेश देण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)



मुंबईच्या आकाशात शुक्रवारी सकाळपासून असे काळेकुट्ट ढग दाटून आले होते. यामुळे दिवसा सायंकाळ झाल्याचा अनुभव येत होता. त्यानंतर काही वेळातच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. यामुळे मुंबईतील जनजीवन विस्कळीत झाले होते.

# महिलेने केली फडणवीसांच्या मंत्रालयातील कार्यालयाची तोडफोड

**मुंबई, २७ सप्टेंबर**

उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयाची एका महिलेने तोडफोड केल्याचा धक्कादायक प्रकार घडला. सचिवांसाठी असलेल्या गेटमधून संबंधित महिलेने पास न काढता मंत्रालयात प्रवेश केला. यानंतर तिने थेट फडणवीस यांचे कार्यालय गाठून तेथे तोडफोड केली आणि निघून गेली. यामुळे मंत्रालयाच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गुरुवारी सायंकाळाच्या सुमारास धनश्री सहस्रबुद्धे नामक महिला मंत्रालयाच्या परिसरात फारसा पोलिस बंदोबस्त नसल्याचा फायदा घेत सचिवांच्या गेटने सहजपणे आत शिरली. यानंतर तिने सहाव्या मजल्यावर असलेल्या फडणवीसांच्या कार्यालयाबाहेरील नेमप्लेट काढून फेकली व घोषणाबाजी केली. त्यानंतर



ती तिथून निघून गेली. याप्रकरणी फडणवीसांच्या कार्यालयाकडून तक्रार दाखल केल्यानंतर संबंधित महिलेची ओळख पटवण्यासाठी पोलिस कामाला लागले.

या घटनेचे सीसीटीव्ही समोर आल्यानंतर एकच खळबळ उडाली. मरिन ड्राईव्ह पोलिस या घटनेचा तपास करीत आहेत. मात्र, संबंधित महिला मंत्रालयात घुसल्याने तेथील सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. पास नसतानाही महिलेने मंत्रालयात प्रवेश कसा केला, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**मानसिक स्थिती ठीक नसल्याची माहिती**

महिलेचे नाव धनश्री सहस्रबुद्धे असून, तिची मानसिक स्थिती ठीक नसल्याने सध्या तिचे पोलिसांकडून समुपदेशन करण्यात येत आहे. ही महिला मुंबईच्या दादर विभागात वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास केला असता, संबंधित महिलेचे मानसिक संतुलन बिघडले आहे आणि तिच्या विरोधात इमारतीत देखील अनेक तक्रारी आहेत. ही महिला मनोरुग्ण असून, याआधी तिने तिच्या वडिलांना मारहाण करण्यासोबतच प्राणघातक हल्ला केल्याची माहिती आहे, ज्यामुळे तिच्या वडिलांनी तिच्यावर गुन्हा देखील दाखल केला आहे. (तभा वृत्तसेवा)

# 'हा' अधिकार अजूनही सामान्यांपासून लांबच

### सार्वजनिक जनजागृतीची गरज




आज माहिती अधिकार दिन

**नागपूर, २७ सप्टेंबर**

एरवी लोकशाही व्यवस्थेत जनतेला जितकी कर्तव्ये सांगितली आहेत, तितकेच त्यांना अधिकारही आहेत. बहुतांश सामान्य नागरिकांना आपल्या कर्तव्य आणि अधिकारांविषयी माहितीदेखील नसते. एवढेच काय पण माहिती मिळविण्यासाठीचाही अधिकार आहे, याविषयीदेखील ते अनभिज्ञ असतात. सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि अन्य काही व्यावसायिक सोडले तर माहितीच्या अधिकाराचा वापर हवा त्या प्रमाणात अजूनही होताना दिसत नाही.

२००५ मध्ये सरकारने माहिती अधिकार कायदा केला. त्यामुळे गैरव्यवहारांना चाप बसेल आणि सत्य समोर येईल, असा यामागील उद्देश होता. कायद्याचा काही लोकांना जसा फायदा झाला तसा काही लोकांनी त्याचा दुरुपयोगही केला. कायद्याच्या जागृतीसाठी २८ सप्टेंबरला आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन राज्यात साजरा करावा, असा आदेश निघाला. मात्र, आजही हा दिवस आणि या कायद्याची व्याप्ती कागदोपत्रीच जास्त आहे.

**सामान्यांचे प्रश्न**

सर्वसामान्यांना याविषयी विचारले असता त्यांचे म्हणणे असते की, आम्ही याचे काय करणार? आम्हाला कोणते घोटाळे उघडकीस आणायचे नाहीत किंवा कोणाला वांध्यात आणायचे नाही. पण प्रत्यक्षात अनेक सरकारी योजनांची माहितीसुद्धा सामान्य लोक या अधिकाराद्वारे मिळवू शकतात, याची त्यांना कल्पना नसते. एखाद्या क्षेत्रात झालेली फसवणूक त्यासंदर्भातील कायद्यांची माहिती असल्यास टाळली जाऊ शकते.

साधे उदाहरण घ्यायचे तर रेल्वेत प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे अधिकार काय आहेत, याची सर्वसामान्यांना कल्पना नसते. अशी माहितीदेखील सरकारी विभागांकडून माहितीच्या अधिकारात मागवता येते.

**नव्या पिढीपर्यंत जागृती व्हावी**

नव्या पिढीपर्यंत हा कायदा पोहोचण्यासाठी शाळा, महाविद्यालयांमधून वक्तृत्व, निबंध, प्रश्नमंजूषा आदी स्पर्धा घेणे अपेक्षित आहे. सामाजिक संघटनांनीही या कामी पुढाकार घेतला पाहिजे. जेणेकरून सर्वसामान्यांना या दिवसाचे महत्त्व कळेल आणि आपल्या या अधिकाराविषयीदेखील जागृती येईल. (तभा वृत्तसेवा)

# कृषितंत्र जागविण्याचे काम गावांनी करावे

### भय्याजी जोशी यांचे प्रतिपादन ● मा. गो. वैद्य स्मृती न्यासातर्फे पहिले उत्कृष्ट सरपंच पुरस्कार प्रदान

**वर्धा, २७ सप्टेंबर**

महात्मा गांधींनी भारताचे दर्शन गावात होत असल्याचे सांगितले. धर्म गावात पाळला जातो. गावात ६० ते ७० टक्के लोक एकमेकांना नावाने ओळखतात. गावच सुख-दु:खात सहभागी होते. शहरात हे वातावरण नाही. गावाच्या विकासासाठी पंचायतराजसारख्या योजनांवर विसंबून न राहता स्वत:च गावाचा विकास करा. रासायनिक खतांनी शेतीचे नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांच्या लक्षात आणून देण्यासाठी गावागावांतून प्रयत्न व्हावे, असे उद्बोधन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अ. भा. कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी यांनी केले.

मा. गो. वैद्य स्मृती न्यासाच्या वतीने २७ सप्टेंबरला स्थानिक महात्मा गांधी औद्योगिकीकरण परिसरात पहिल्या 'उत्कृष्ट सरपंच पुरस्कार' वितरण कार्यक्रमात ते मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी महात्मा गांधी औद्योगिकीकरण संस्थेचे संचालक डॉ. आशुतोष मुरकुटे होते. याप्रसंगी व्यासपीठावर पुंडलिक लांडगे, न्यासाचे अध्यक्ष अरविंद कुकडे यांची उपस्थिती होती.




व्यासपीठावर भय्याजी जोशी, डॉ. मुरकुटे, लांडगे, कुकडे यांच्यासह पुरस्कार प्राप्त महिला सरपंच

मा. गो. वैद्य तरोड्यात सरपंचाच्या खुर्चीत न बसलेले व निवडून न आलेले सरपंच होते. मा. गो. वैद्य पारदर्शक, शुद्ध आचारविचार असलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या नावाने पुरस्कार मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न करा, असे ते म्हणाले. प्रास्ताविक अरविंद कुकडे यांनी, संचालन भूषण वैद्य यांनी, तर आभारप्रदर्शन दिलीप चौधरी यांनी केले.

कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य डॉ. मनमोहन वैद्य, न्यासाचे उपाध्यक्ष हरिभाऊ वझूरकर, सचिव दत्ता टेकाडे, जिल्हा संघचालक जेठानंद राजपूत, वर्धा नगर संघचालक डॉ. प्रसाद देशमुख, संजीव लाभे, चंद्रशेखर जोशी, वैशाली येरावार आदींसह न्यासाचे पदाधिकारी, सदस्य, विदर्भातील सरपंच उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

### पहिले उत्कृष्ट सरपंच

यावर्षी पहिल्यांदाच उत्कृष्ट सरपंच पुरस्कार प्रदान करण्यात आला. यात नागपूर विभागातून आगरगाव जि. वर्धा येथील सरपंच विभा राऊत, द्वितीय पुरस्कार चिंचाळा जि. नागपूर येथील प्रणीता पडोळे तर अमरावती विभागातून प्रथम पुरस्कार ढोरखेडा जि. वाशीम येथील सुनीता मिटकरी, तर द्वितीय पुरस्कार माउली चोर जि. अमरावती येथील संगीता झंजाट यांना देण्यात आला. प्रथम एक लाख तर द्वितीय ५० हजार रुपये, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

● इंडोनेशियाच्या सुमात्रा बेटावर अनाधिकृत सोन्याच्या खाणीत भूस्खलन होऊन १५ जणांचा मृत्यू झाला आहे.

# 'तरुणांचा' असलेल्या भारताची वार्धक्याकडे वाटचाल




**नवी दिल्ली, २७ सप्टेंबर**

सर्वाधिक तरुण मंडळी असलेल्या देशांपैकी एक म्हणून काही वर्षांपूर्वी भारताकडे पाहिले जात होते. आजही भारत तरुणच आहे. जगातील भारत हा चौथा युवा देश आहे. असे असले तरी काहीशी चिंता वाढविणारी आकडेवारी समोर येत आहे. त्यात भारत हळूहळू वार्धक्याकडे जाऊ लागला आहे.

जगातील युवा पिढीच्या यादीत नायजेरिया पहिला देश आहे, तर फिलिपीन्स दुसरा आणि बांगलादेश तिसरा देश आहे. १४० कोटी लोकसंख्या असलेला आपला भारत देश चौथ्या क्रमांकावर आहे. भारतातील तरुणांच्या वयाची सरासरी काही वर्षांपूर्वी २४ वर्षे होती ती आता वाढून २९ वर्षांवर गेली आहे. यानुसार तरुणांची संख्या घटत चालली आहे. तरुणांचे जसजसे वय वाढू लागले आहे तसतसे त्यांची जागा घेणारी नवीन पिढी घटू लागली आहे.

वय वाढू लागल्याने भारत येत्या काही वर्षांत वृद्धापकाळाकडे वाटचाल करणार आहे. वृद्धापकाळ आला की समस्याही अनेक असणार आहेत. ६० वर्षांवरील लोकांची संख्या ही २०५० पर्यंत ३४ कोटींवर पोहोचणार आहे. २०३६ मध्ये वृद्धांची संख्या ही एकूण लोकसंख्येचा १२.५ टक्के होणार आहे. ४० टक्के वृद्ध लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली असणार आहे. १८.७ टक्के वृद्ध लोकांकडे उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्रोत नाही. (वृत्तसंस्था)

### लोकसंख्या वाढीचा दर १ टक्क्यावर

देशाच्या लोकसंख्येचा वाढीचा दर २०२४ मध्ये १ टक्क्यावर आला आहे. हा दर १९५१ नंतरचा सर्वात कमी आहे. १९७२ ला लोकसंख्या वाढीचा दर सर्वाधिक म्हणजे २.२ टक्क्यांवर होता. देशात अखेरची जनगणना ही २०११ मध्ये झालेली आहे. तेव्हा देशाची लोकसंख्या १२१.१ कोटी होती. एसबीआयच्या अहवालानुसार ती आता १४२ कोटींवर गेली आहे.

## तातडीने पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक सोलापूर तरुण भारतमध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

१) डेस्क उपसंपादक २ पदे
२) बातमीदार ४ पदे
३) डिटीपी ऑपरेटर २ पदे
३) मार्केटिंग प्रतिनिधी ४ पदे

किमान तीन वर्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

संपर्क: ९८८११९१४४३

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# वागदरी रस्ता सुसाट... पण ब्रेकर सतराशे साठ

**राष्ट्रीय महामार्ग विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष; अक्कलकोट-वागदरी रोडवरील वळणामुळे अपघातांच्या प्रमाणात वाढ**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ सप्टेंबर-**

तालुक्यातील वागदरी रस्त्यावर डांबर उखडून खड्डे पडल्याने वाहनचालकांना नाहक त्रास होत असून, धक्कादायक बाब म्हणजे या रस्त्याला सतराशे साठ ब्रेकर असून, कित्येक धोकादायक वेडीवाकडी वळणे आहेत. या वेड्यावाकड्या वळणाचा अंदाज नवीन वाहन चालकांना येत नसल्याने आतापर्यंत कित्येकांना या अक्कलकोट-वागदरी रोडवर जीव गमवावा लागला असून, या घटना वारंवार घडतात. पण या गंभीर घटनेची कोणीच दाखल घेत नाही.



वेडीवाकडी वळणे व सतराशे साठ ब्रेकरचा संध्याकाळच्या वेळी व दिवसादेखील वाहन चालकाच्या निदर्शनास येत नाहीत. पण गाडी जवळ जाताच हे ब्रेकर व वळणे दिसतात. अचानकपणे गाडी कंट्रोल करणे हे वाहन चालकांना धोक्याचे ठरत असून, यापूर्वी कित्येकांचा बळी या रोडवर गेलाय. पण राष्ट्रीय महामार्ग व स्थानिक प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी केवळ झोपेचे सोंग घेऊन नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा स्वरूप आपणास वारंवार पाहायला मिळत आहे.

आतापर्यंत २० जण या रोडवर मृत्युमुखी पडले असून, या मृत्यूला सर्वस्वी राष्ट्रीय महामार्ग विभाग जबाबदार आहे. संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर गुन्हा करण्याची मागणी मराठा सेवा संघांचे जिल्हा कार्यकारणी सदस्य प्रवीण घाटगे यांनी केली असून, हा अक्कलकोट वागदरी रस्ता तात्काळ दुरुस्त होऊन या रोडवरील बेकायदेशीर ब्रेकर काढून आवश्यक त्या ठिकाणी ब्रेकर करण्यात यावे व अक्कलकोट-वागदरी हा रस्ता सा. बां. विभागाच्या अखात्यरित होता. पण गेल्या ५ ते ६ वर्षांपासून हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. या विभागाच्या ठेकेदार व अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे डोळेझाक करीत असून, आणखीन किती बळी गेल्यावर हा रस्ता होणार आहे...? असा सवाल नागरिकांतून विचारला जात आहे.

अक्कलकोट-वागदरी राष्ट्रीय राज्य महामार्ग हा रस्ता कर्नाटक व मराठवाड्याला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असून या रस्त्यावर सर्वांत जास्त रहदारी असते. सांगवी बु पुलाजवळ पडलेल्या मोठ्या खड्ड्यात आत्तापर्यंत ३० ते ४० जण पडून गंभीर जखमी झाल्याची घटना घडली असून, त्यातच एका महिलेचे मृत्यू झाला आहे. अशा गंभीर घटना वेळोवेळी घडत असताना देखील राष्ट्रीय महामार्ग विभाग हे झोपेचे सोंग घेत आहे. जर येत्या आठवड्याभरात अक्कलकोट-वागदरी राष्ट्रीय महामार्गाची दुरुस्ती न केल्यास सांगवी बुसह पंचक्रोशीतील नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन करण्याची चर्चा खेड्यापाड्यात रंगली आहे.

> अक्कलकोट-वागदरी रस्ता हा गेल्या सहा महिन्याखालीच दुरुस्त केला आहे. पण सहा महिन्यात पुन्हा या रस्त्याची वाट लागली आहे. बोगस कामाची चौकशी होऊन हा रस्ता पुन्हा दुरुस्त करावा. वेडीवाकडी वळणे असल्याने वारंवार अपघात घडतात. याचा राष्ट्रीय महामार्ग विभागाने जर दाखल घेऊन या रस्त्याचा प्रश्न येत्या ८ दिवसात मार्गी न लावल्यास सांगवी बु येथे रस्ता रोको आंदोलन करणार आहे.
>
> **- प्रविण घाटगे,**
> **जिल्हा कार्यकारणी सदस्य, मराठा सेवा संघ**

## संक्षिप्त वृत्त



### तांडा समृद्धी योजना लाभदायी ठरणार : रामेश्वर नाईक

**अणदूर, दि. २७ सप्टेंबर-**

राज्यातील बंजारा तांड्याचा सर्वांगीण विकास केवळ शासनाच्या संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी योजनेमुळे साधता येणार असून ही योजना बंजारा समाजासाठी लाभदायी ठरणार असल्याचे महाराष्ट्र राज्य धर्मादाय रुग्णालयत समितीचे महाराष्ट्र राज्य कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले. धाराशिव जिल्हा भाजपाचे तांडा वस्ती संपर्क अभियानाचे संयोजक प्रविण पवार व सोलापूर जिल्ह्याचे संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेचे सहप्रवासी युवराज राठोड यांनी सत्कार केला, यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व भारतात राहून आजही बंजारा समाजातील बहुसंख्य तांडे विकासापासून दूर आहेत, ही बाब विचारात घेऊन महायुती सरकारने संत सेवालाल महाराज समृद्धी योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्यामुळेच ही योजना अमलात आली आहे. या निर्णयामुळे आता राज्यात स्वतंत्र योजना तांड्यासाठीच राबविले जात असल्याने महाराष्ट्र राज्यातील हजारो बंजारा तांडे स्वतंत्र ग्रामपंचायत होण्याचा मार्ग मोकळा होणार असून तांड्याचा कायापालट होणार असल्याचे रामेश्वर नाईक यांनी माहिती दिली.



### जळकोटमध्ये डॉ. रेड्डी यांना निरोप, डॉ. मयूर सिसोदियांचे स्वागत

**अणदूर, दि. २७ सप्टेंबर-**

जळकोट पशुसंवर्धन दवाखान्यातील पशुधन अधिकारी डॉ. कृष्णा रेड्डी यांची बदली झाल्यामुळे त्यांना निरोप समारंभ व नूतन पशुधन अधिकारी डॉ. मयूर सिसोदिया यांची जळकोट येथे नेमणूक झाल्यामुळे त्यांचे स्वागत पशु औषध विक्रेते अमृत मेडिकल यांनी आयोजित केले होते. २०१८ पासून जळकोट येथे डॉ. कृष्णा रेड्डी कार्यरत होते. शेतकऱ्यांच्या जनावरांना विशेष औषध उपचार करून त्यांनी शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन करण्याचे आवाहन करून अनेक शेतकरी व कष्टकऱ्यांनी पशूंचा सांभाळ केला. बॅडमिंटन ग्रुपच्या वतीने दोन्ही अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीनिवास पाटील, संजू जाधव, जीवन मोजगे, गोविंद शिंदे, पत्रकार अजय अणदूरकर, नागू भैय्या, सुभाष कार्ले, महादू काळे, डॉ. समाधान, मेजर अनिरुद्ध कदम, ओंकार पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन विश्वास भोगे यांनी केले तर आभार संदेश यांनी मानले.




### केममधील मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला चांगला प्रतिसाद

**करमाळा, दि.२७ सप्टेंबर-**

खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन व फुले शिक्षण व समाजविकास मंडळाचे संस्थापक शिवाजी तळेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने वांद्रेचे तहसीलदार चिरंजीव विजयसिंह शिवाजी तळेकर यांनी घेतलेल्या मोतीबिंदू शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. यावेळी महेश तळेकर, एपी ग्रुपचे अध्यक्ष अच्युत तळेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक महावीर तळेकर, जिल्हा समन्वय समितीचे शिवसेना सोलापूर गणेश तळेकर आदी उपस्थित होते.

### लाचेची मागणी केल्याप्रकरणी केत्तूरच्या सर्कलला जामीन मंजूर

**बार्शी, दि. २७ सप्टेंबर-**

तक्रारदाराने कुणबी दाखला मिळण्यासाठी तहसीलदार करमाळा यांच्याकडे अर्ज दाखल केला होता व सदरचा अर्ज पडताळणी कामी केत्तूर येथील मंडळ अधिकारी शंकर विठ्ठल केकान यांच्याकडे आलेला होता. यासाठी त्यांनी तीन हजार रुपयांच्या लाचेची मागणी हाताने खुणवून केल्याबाबतची करण्यात आली होती. याची पडताळणी २२ ऑगस्ट २४ रोजी केत्तूर मंडल अधिकारी कार्यालयात झाल्यानंतर १९ सप्टेंबर रोजी फिर्यादीने तक्रारदार दाखल केलेली होती. यात शंकर विठ्ठल केकान यांना २० सप्टेंबर रोजी अटक करण्यात आली होती. नंतर त्यांनी ॲड. निखिल पाटील यांच्यामार्फत जामिनासाठी बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्या. मांडे यांच्यासमोर झाली. जामीन अर्जाच्या युक्तीवादावेळी आरोपीचे वकील ॲड. निखिल पाटील यांनी हे प्रकरण पडताळणी कामी मंडळ अधिकारी शंकर विठ्ठल केकान यांच्याकडे २१ ऑगस्ट २४ रोजी आलेले होते व तदनंतर त्यांनी २२ सप्टेंबर रोजी सदरची पडताळणी पूर्ण करुन त्याचा अहवाल तक्रारदार यांच्याकडे हाती दिलेला होता. सदरचे काम त्याच दिवशी पूर्ण केलेले असल्याने लाच मागण्याचा कोणताही प्रश्न निर्माण होत नव्हता व यातील मंडळ अधिकारी यांनी कधीही लाचेची मागणी केलेली नसून तसा सक्षम पुरावा तक्रारदार यांच्याकडे नसून केवळ द्वेष भावनेतून सदरची तक्रार दाखल झालेली असून तपासामध्ये आरोपीविरुद्ध कोणताही पुरावा मिळून आलेला नाही, असा युक्तिवाद केला. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपी शंकर विठ्ठल केकान यांची ५० हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर जामिनावर मुक्तता करण्यात आली. सदर प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. निखिल पाटील, ॲड. दत्तप्रसाद मंजरथकर, ॲड. सतपाल नरखेडे, ॲड. श्रीराम अंधारे यांनी काम पाहिले.

# पंढरीत दिवाळीची खरेदी एकाच छताखाली

**मनसे आणि वीरशैव महिला मंडळाचा नाविन्यपूर्ण उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ सप्टेंबर-**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आद्य वीरशैव महिला मंडळ पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिला उद्योजकांसाठी पंढरपूर मध्ये भव्य असा एक्सपो घेऊन दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता यावी. या हेतूने दिवाळीनिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रम येथील टिळक स्मारक मैदानावर दिनांक १९,२० ऑक्टोबर २०२४ रोजी भरवण्यात आला आहे. यामध्ये भाग घेणाऱ्या महिला उद्योजकांसाठी मोफत स्टॉल व स्टॉल उभारण्यासाठी विना व्याज कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी स्टॉलची बुकिंग करावी असे आवाहन मनसे नेते दिलीप धोत्रे आणि डॉक्टर शोभा कराळे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले आहे.



यावेळी मनसेचे पदाधिकारी व आद्य वीरशैव महिला मंडळाचे अध्यक्ष डॉ. शोभा कराळे, सुवर्णा स्वामी, आरती पावले, कविता पावले, विशालाक्षी पावले, संजीवनी ठिगळे,मनीषा वासकर,अनुराधा स्वामी उपस्थित होत्या. पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा. नागरिकांना दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता यावी. या हेतूने महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आद्य वीरशैव महिला मंडळाच्या वतीने पंढरपुरात प्रथमच दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता येणार आहे. या एक्सपो मध्ये २०० स्टॉल उभारण्यात येणार असून यामध्ये भाग घेणाऱ्या महिलांना नाम मात्र नोंदणी फी १०१ ठेवण्यात आली आहे. भाग घेणाऱ्या महिला भगिनींना मोफत सुसज्ज स्टॉल दिले जाणार आहेत. तसेच महिलांना २५ हजार रुपये स्टॉल उभारण्यासाठी कर्ज स्वरूपात देण्यात येणार आहे. हे कर्ज एक्सपो संपल्यानंतर भरावे लागणार आहेत. याला कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. यामध्ये भाग घेणाऱ्या महिलांना नाव नोंदणी ५ ऑक्टोबर पर्यंत करता येणार आहे. प्रथम येणाऱ्या महिलांना यामध्ये संधी दिली जाणार आहे.

दिवाळीनिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रम मनसेच्या वतीने येथील टिळक स्मारक मैदानावर घेण्यात आला आहे. तरी पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिलांनी भाग घ्यावा असे आवाहन मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी केले आहे. यावेळी शहराध्यक्ष संतोष कवडे, शहर संघटक गणेश पिंपळनेरकर, मार्गदर्शक संदीप रणवरे, महेश पवार, ओंकार जाधव, शशिकांत पाटील, समाजसेवक बाबा चव्हाण इत्यादी उपस्थित होते.




# बार्शीतील नवचेतना मैत्री फेस्टिव्हलचा दोन दिवस महिलांनी लुटला आनंद

**यंदाचे ११ वे वर्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ सप्टेंबर-**

बार्शीमधील सर्व स्त्रिया दरवर्षी गणेश विसर्जनानंतर आतुरतेने या कार्यक्रमाची वाट बघत असतात. अशा या सर्व स्त्रियांच्या मनाला भुरळ घालणाऱ्या 'नवचेतना' मैत्री फेस्टिवलचे हे यशस्वी अकरावे वर्ष होते. दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील बार्शीतील स्त्रियांनी याला भरभरुन प्रतिसाद दिला.

उद्घाटन लायन्स क्लबचे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर एमजेएफ ॲड. एम.के. पाटील यांनी केले. यावेळी लायन्स क्लबच्या डीसी वुमन एम्पॉवरमेंट एमजेएफ लायन चेतना होमकर, लायन्स क्लब बार्शी टाउनचे अध्यक्ष महावीर कदम, सचिव हेमंत जमदाडे, खजिनदार किरण आवटे, लिओ क्लबचे अध्यक्ष गौरव देडिया, खजिनदार आवेश बांबोली आदी उपस्थित होते. दोन्ही दिवशी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये अगदी सहा महिन्यांच्या लहान बालकांपासून ते वयोवृद्ध महिलांपर्यंत सर्व वयोगटातील स्पर्धाकांनी भरभरुन सहभाग नोंदवला. पाककला, मेहेंदी, रांगोळी, नृत्य स्पर्धा, तू तू मैं मैं आणि रील स्पर्धा, रांगणे स्पर्धा, हेल्थी स्माईल स्पर्धा, अशा विविध स्पर्धांची रेलचेल होती. नृत्य स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या काळजाराणी प्रेक्षकांना शेवटपर्यंत जागेवर खिळवून ठेवले होते. विविध स्टॉलही या ठिकाणी लावण्यात आले होते. समारोपाला उज्वला निंबाळकर उपस्थित होत्या. लायन्स क्लब बार्शी टाऊन तेजस्विनी आणि कोठारी लॅबतर्फे महिलांची मोफत शुगर तपासणी करण्यात आली. त्यामध्ये २५० ते ३०० जणींनी लाभ घेतला. फेस्टिव्हलसाठी प्रकल्प प्रमुख म्हणून लायन शर्वरी-फुरडे व त्यांच्या कॉर्डिनेटर पल्लवी बजाज आणि वैशाली शहा यांनी काम पाहिले. क्लबच्या अध्यक्षा विद्या काळे, सचिवा प्राची जमदाडे आणि खजिनदार कविता अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला.




## सह्याद्री फार्मसी कॉलेजची रॅली जल्लोषात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ सप्टेंबर-**

जागतिक औषधनिर्माता दिनानिमित्त मेथवडे येथील सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे सांगोला शहरात रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात डॉ. बाबासाहेब देशमुख, नवनाथ पवार, रमेश जाधव, संस्थेचे अध्यक्ष डॉ. दिलीपकुमार इंगवले, रोटरी क्लबचे विकास देशपांडे, विलास बिले, डॉ. प्रभाकर माळी, मोहन मस्के, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी श्रीकांत घोंगडे, अरविंद केदार, बापूसाहेब भाकरे, डॉ. स्नेहल भोसले, बापूसाहेब ठोकळे, किशोर बनसोडे, विजय कांबळे, सागर पाटील, धनंजय शिंदे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरपरिषदेचे स्वच्छता दूत इंजि. नवज्योत ठोकळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वच्छतेचा संदेश दिला.

# बार्शी नपा नगर पथविक्रेता समितीच्या निवडी बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ सप्टेंबर-**

बार्शी नगरपरीषदमार्फत नगर पथविक्रेता समिती निवडणूक २०२४ मधील बिनविरोध निवड झालेल्या उमेदवारांचा आमदार राजेंद्र राऊत यांनी सत्कार करुन सर्वांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.



महाराष्ट्र पथ विक्रेता सन २०१६ नुसार राज्यात पथ विक्रेता धोरण राबविण्याबाबत बार्शी नगरपरीषदमार्फत नगर पथविक्रेता समिती निवडणूक २०२४ राबविली होती. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून. बा.न.पा. मुख्याधिकारी तथा प्रशासक बाळासाहेब चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदरील निवडणुकीत एकूण ९५७ मतदारापैकी ११ उमेदवारांचे अर्ज भरले होते. त्यापैकी अर्ज ४ बाद झाले व ७ उमेदवारांची अर्ज मंजूर झाले होते व अनु. जमाती (महिला) या प्रवर्गातून कोणताही अर्ज प्राप्त झाला नाही.

सदरील निवडणुकीत सर्वसाधारण पुरुष गटातून अलीशेर इब्राहीम बागवान, हेमंत विनायक शाहीर, दिव्यांग पुरुष प्रवर्गातून दादाराव गणपत गायकवाड, सर्वसाधारण महिला प्रवर्गातून आरती विनोद कदम, अनुसूचित जाती प्रवर्गातून मंगल लहू शिंदे, इतर मागासवर्गीय महिला प्रवर्गातून राजूबाई लक्ष्मण ढगे, अल्पसंख्याक महिला प्रवर्गातून मन्नाबी सारावर बागवान यांची बिनविरोध निवड झाली. तसेच अनुसूचित जमाती महिला प्रवर्गातून कोणताही अर्ज प्राप्त न झाल्यामुळे ती जागा रिक्त ठेवण्यात आली. यावेळी महादेव बोकेफोडे, बप्पा जगताप यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

# बार्शी महावितरण कार्यालयातील गैरव्यवहाराची चौकशी करा

**माजी मंत्री एकनाथ खडसे यांची विधानपरिषदेत तात्काळ कारवाईची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ सप्टेंबर-**

महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत माजी मंत्री एकनाथराव खडसे यांनी बार्शी महावितरण कार्यालयात घडलेल्या गंभीर गैरव्यवहाराच्या प्रकरणी तात्काळ चौकशीची मागणी केली आहे. त्यांनी महावितरणचे अध्यक्ष श्री. लोकेश चंद्र यांना एक पत्र पाठवून याप्रकरणी कारवाई करण्याची विनंती केली आहे.

खडसे यांच्या पत्रानुसार, बार्शी येथील महावितरण कार्यालयात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये कार्यकारी अभियंता सुरेश कुऱ्हाडे आणि सहाय्यक अभियंता गणेश कांबळे यांचे नाव समोर आले आहे. आरोप आहे की त्यांनी नियमांचे उल्लंघन करुन सुशिक्षित बेरोजगारांना कामे वितरित केली आहेत. नवीन सेवा कनेक्शन या टेंडर प्रक्रियेत अनेक अपात्र व्यक्तींना काम देण्यात आले आहे. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला आहे. खडसे यांच्या मते, या कामांचे वितरण करताना अनेक नियमांची पायमल्ली करण्यात आली आहे, ज्यामुळे शासनाच्या प्रतिमेला धक्का लागला आहे. खडसे यांनी स्पष्ट केले आहे की, बार्शी महावितरण कार्यालयात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत तात्काळ सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशी पूर्ण होईपर्यंत कार्यकारी अभियंता सुरेश कुऱ्हाडे आणि सहाय्यक अभियंता गणेश कांबळे यांना निलंबित करणे आवश्यक आहे. बार्शी येथील विभागामध्ये या गैरव्यवहारासाठी दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जावी. एनएससी टेंडरमध्ये अपात्र व्यक्तींना कार्यान्वित करणे आणि त्यामध्ये केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराबद्दल सखोल तपास करणे. सुशिक्षित बेरोजगारांना कामांचे वितरण करताना नियमांचे उल्लंघन करून अन्याय होतो आहे, याबाबत गंभीर विचार करणे. या प्रकरणात खडसे यांच्या पत्राने राजकीय व सार्वजनिक क्षेत्रात एक नवीन चर्चेला वाव दिला आहे. अनेक स्थानिक नागरिक आणि बेरोजगारांनी खडसे यांच्या मागणीला पाठिंबा दर्शवला आहे. त्यांनी सांगितले की, या गैरव्यवहारामुळे अनेक लोकांच्या भविष्यात अंधार निर्माण झाला आहे.

> **यापूर्वी शिरीष ताटे यांनी केली होती तक्रार**
>
> यापूर्वीही राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश सचिव शिरीष ताटे यांनी या संदर्भात तक्रार केली होती. त्यांच्या तक्रारीमध्येही बार्शी महावितरण कार्यालयात होणाऱ्या अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहाराबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती. यामुळे या मुद्यावर सखोल चर्चा झाली असून, याला राजकीय रंग प्राप्त झाला आहे.



## सोजर फार्मसीमध्ये जागतिक फार्मसिस्ट डे उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ सप्टेंबर-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, सोजर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये वर्ल्ड फार्मसिस्ट डे साजरा करण्यात आला.

फाउंडर-ग्लोबल फार्मा अकॅडमीचे अमितकुमार माने यांचे फार्माकोव्हिजीलंस या विषयावर गेस्ट लेक्चर, ए. डी. आर. रिपोर्टिंग चित्रफीत महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेचे अध्यक्ष अतुल अशोकराव अहिरे यांच्यान्वये प्रदर्शित करण्यात आली. यावेळी संस्थाध्यक्ष अरुणदादा बारबोले, एमएसपीसी समन्वयक सिद्धेश्वर घाळे, जमीर आवटे, सुधीर राऊत, प्राचार्य सुजित करपे तसेच रमेशभाऊ कोंढारे, मोईज काझी, प्रशांत बारस्कर, हेमंत गांधी, संजय पाटील उपस्थित होते. सोजर कॉलेज ऑफ फार्मसीतील राष्ट्रीय सेवा योजना युनिट व केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनतर्फे रक्तदान शिबीर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन संस्थाध्यक्ष अरुणदादा बारबोले यांनी केले. यावेळी ६३ जणांनी रक्तदान केले. कै. कस्तुरबा गांधी मतिमंद निवासी शाळा व मूकबधिर निवासी शाळा खांडवी-बार्शी येथील बालचमूंना, केमिस्ट ॲड ड्रगिस्ट असोसिएशन प्राचार्य सुजित करपे यांच्या उपस्थितीमध्ये खाऊ वाटप करण्यात आले. प्रास्ताविक मगर यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सुशीलकुमार शिंदे यांच्या सत्कार सोहळ्याची अकलूजमध्ये जय्यत तयारी

**अकलूज, दि. २७ सप्टेंबर-**

माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या ८४ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या भव्य सत्कार समारंभाची तयारी अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. २९ सप्टेंबर रविवारी दुपारी तीन वाजता हा कार्यक्रम होणार असून यासाठी भव्य अशी तयारी सुरू आहे. सुमारे ५० हजार लोक बसतील असा भव्य मंडप देण्याचे काम चालू असून आज खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे खा. शरदचंद्र पवार, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयंत पाटील हे प्रमुख असतील तर राज्यातील सर्व नवीन निर्वाचित खासदारांचा यावेळी सत्कार केला जाणार असल्याची माहिती खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दिली. सर्वपक्षीय खासदारांना निमंत्रण दिले असल्याचेही त्यांनी सांगितले. या समारंभासाठी राज्यातील अनेक प्रमुख नेते मंडळी उपस्थित राहणार आहेत. यावेळी कोणतेही राजकीय प्रवेश किंवा इतर गोष्टी होणार नाहीत, असेही खा.धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.



### सुयोग फाऊंडेशन, पत्रकार बांधवांच्या वतीने सपोनि पवार, सपोनि देवकर यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक शैलेश पवार यांच्या बदलीनिमित्त व नूतन सहाय्यक पोलिस निरीक्षक सुरज देवकर यांच्या आगमनानिमित्त येथील सुयोग फाऊंडेशन व तामलवाडी पत्रकार संघटनेच्या वतीने त्यांचा फेटा, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. तामलवाडी पोलिस ठाण्याचे प्रभारी सपोनि शैलेश पवार यांची नुकतीच मुंबई येथे बदली झाली असून, त्यांच्या जागेवर प्रभारी सपोनि सुरज देवकर यांनी पदभार स्वीकारला आहे. यानिमित्त तामलवाडी पोलिस ठाणे येथे दि.२४ सप्टेंबर रोजी छोटासा कार्यक्रम घेऊन त्यांचा फेटा, पुष्पगुच्छ व शाल देऊन पोलिस ठाण्याच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी सुयोग फाऊंडेशच्या वतीने डॉ. रविराज गायकवाड आणि तामलवाडी पत्रकार संघटनेच्या वतीनेही जेष्ठ पत्रकार अविनाश गायकवाड यांच्या हस्ते शैलेश पवार व सुरज देवकर यांचा फेटा, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला व शैलेश पवार यांना पुढील पदोन्नतीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तर यावेळी नूतन सपोनि सुरज देवकर यांचेही स्वागत करण्यात आले. यावेळी तामलवाडी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा शिवरत्न न्यूजचे संपादक सर्जेराव गायकवाड, शिवरत्न न्यूजचे तामलवाडी प्रतिनिधी सचिन शिंदे, रवी घोटकर, बाळासाहेब डोलारे आदी पत्रकार बांधवासह डॉ रविराज गायकवाड, दशरथ भाकरे, माऊली गुंड यांच्यासह पोलिस बांधव उपस्थित होते. सूत्रसंचालन पोलिस कर्मचारी शिवाजी सिरसट यांनी केले.

# अक्षय शिंदेवर अंत्यसंस्कारासाठी तातडीने जागा उपलब्ध करून द्या

## उच्च न्यायालयाचे निर्देश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२७ सप्टेंबर-**

संशयास्पद एन्काऊंटरमध्ये मारण्यात आलेल्या अक्षय शिंदेचा मृतदेहावर अंत्यसंस्कारासाठी गेल्या चार दिवसापासून जागा उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे त्यासाठी सोमवारपर्यंत जागा उपलब्ध करून द्यावी ,असे निर्देश उच्च न्यायालयाने राज्य सरकारला शुक्रवारी दिले.

बदलापूर बालिका अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचा सोमवारी मुंब्रा बायपास रोडवर पोलीस व्हॅन मध्ये एन्काऊंटर झाला आहे. त्याबाबत उच्च न्यायालयाने संशय व्यक्त केला असून पोलिसांकडून सर्व संबंधित पुरावे ३ ऑक्टोंबरपर्यंत सादर करण्याचे सूचना केली आहे. असे असताना दुसरीकडे अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यासाठी बदलापूर कल्याण अंबरनाथ येथील नागरिकांनी विरोध केला आहे त्यामुळे त्याचा मृत्यू देह अध्यापित कळवा रुग्णालयात ठेवण्यात आला असून अक्षय चे वडील अण्णा शिंदे यांनी त्याबाबत उच्च न्यायालयाला साकडे घातले.



शुक्रवारी झालेल्या सुनावणी वेळी सोमवारपर्यंत अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने निर्देश दिले होते. न्या. रेवती मोहिते -डेरे व न्या. एम. एम. साठ्ये यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी झाली.मात्र या जागेबाबत जाहीर माहिती न देता जागा निश्चित झाल्यावर अक्षयच्या कुटुंबीयांना त्याची माहिती देण्यात यावी, असे निर्देश न्यायालयाने दिले. या प्रकरणी पुढील सुनावणी सोमवारी होईल. सुनावणीत बदलापूर येथील व जवळील सर्व स्मशानभूमीमध्ये अक्षयला दफन करण्यासाठी जागा देण्यास स्थानिक पातळीवरुन विरोध होत असल्याची माहिती सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी दिली. आरोपीच्या समाजात मृतदेहाला दफन केले जात नाही, असे सरकारी वकिलांनी सांगितले.मात्र ही मृताच्या आईवडिलांची इच्छा असल्याकडे न्यायालयाने लक्ष वेधले व सरकारी वकिलांचा युक्तिवाद खोडून काढला. भविष्यात या प्रकरणी काही गरज भासली तर मृतदेह दफन केल्यास पुन्हा काढता येईल, त्यामुळे दहन करण्याऐवजी दफन करण्याचा निर्णय कुटुंबातर्फे घेण्यात आला.

# १२ लाखांच्या मुद्देमालासह चोरटे जेरबंद

**पंढरपूर शहर पोलिसांची कामगिरी**

**१८ तोळे सोने, अन्य चोरीचा ऐवज जप्त**



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ सप्टेंबर-**

पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेने जबरीने सोनसाखळी चोरी करणाऱ्या दोन चोरांकडून अंदाजे १२ लाख १० हजार किंमतीचा (अंदाजे १८ तोळे सोने) मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे.

पंढरपूर येथ २८ ऑगस्ट रोजी फिर्यादी डॉ. मैत्रेयी मंदार केसकर (रा. शाकुंतल नगर, इसबावी, पंढरपूर ) यांच्या अंगावर चटणी टाकून त्यांना ढकलून देऊन गळ्यातील ४४.६६० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मोठे गंठण बळजबरीने हिसकावून चोरी करून दोन अज्ञात इसम मोटारसायकल वरून निघून गेले होते. याच्या तपासासाठी गुन्हे प्रकटीकरण शाखेतील कर्मचाऱ्यांची दोन पथके तयार करून रवाना केली होती. त्यानंतर ट्रॅफिक कर्मचाऱ्यांना नाकाबंदी करून अज्ञात मोटारसायकलवरील आरोपींचा शोध घेण्यात आला. दरम्यान अज्ञात आरोपीचा व मोटारसायकलचा शोध घेत असताना दोन संशयित मोटारसायकलवरून जाताना दिसले. त्यांना मोटारसायकल थांबविण्यास सांगितले असता ते मोटारसायकलवरून पळून जाताना पडले. त्यांना ताब्यात घेऊन अंगझडती घेतली. त्यावेळी संशयित आरोपी विनोद गोविंद पिंपळे (रा. उजनी कॉलनी, श्रीपूर, ता. माळशिरस) याच्या जरकीनमध्ये ३,३१,०२६ रुपयांचे एक ४४.६६० ग्रॅम वजनाचे फिर्यादीचे सोन्याचे मोठे गंठण, काळे मणी व सोन्याच्या वाटी, अर्धी अंबारी कंपनीची लाल चटणीची पुडी मिळून आली. आरोपी महादेव शंकर पवार (रा. श्रीपूर, ता. माळशिरस) यांनी गुन्हा करताना वापरलेली विनानंबर मोटारसायकल असा मुद्देमाल मिळाला. अटक केल्यानंतर त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाणे हद्दीत ४ गुन्हे केल्याची कबुली दिल्याने त्या ४ गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितमकुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग डॉ. अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पंढरपूर शहर पोलीस ठाणे विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक अशिष कांबळे, राजेश गोसावी, नागनाथ कदम, बिपीनचंद्र ढेरे, सूरज हेंबाडे, शरद कदम, सिरमा गोडसे, पोहे नितीन पलुसकर, सचिन हेंबाडे, नवनाथ माने, शहाजी मंडले, समाधान माने, बजरंग बिचुकले, निलेश कांबळे तसेच सायबर शाखा सोलापूर ग्रामीणचे योगेश नरळे यांनी केली.

# निष्पक्षपातीपणे निवडणुकीसाठी शुक्लासारखे वादग्रस्त अधिकारी हटवा

## काँग्रेसची निवडणूक आयोगाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २७ सप्टेंबर :**

विधानसभेच्या निवडणुका निष्पक्षपातीपणे पार पाडण्यासाठी वादग्रस्त व सरकारी पक्षाला मदत करणारे अधिकारी हटवले पाहिजेत. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुल्का यांची कारकिर्द संशयास्पद व वादग्रस्त आहे. विरोधी पक्षांच्या नेत्यांना धमकावणे, विरोधी पक्षांच्या नेत्यांचे फोन टॅपिंग करणे यासारखे प्रकार त्यांनी केले असून त्यांच्यावर गुन्हेही दाखल झालेले आहेत. निवडणुका पारदर्शक व निष्पक्षपातीपणे पार पडण्यासाठी रश्मी शुक्ला यांच्यासह वादग्रस्त व सत्ताधारी पक्षाला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांना हटवावे, अशी मागणी काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे केली असल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितले.

महाराष्ट्र दौ-यावर असलेल्या देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांची काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. शिष्टमंडळात प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस मुनाफ हकीम आणि डॉ. गजानन देसाई यांचा समावेश होता. त्यांनी २४ सप्टेंबरला मुख्य निवडणूक आयुक्तांना पाठवलेल्या पत्राची प्रत आज पुन्हा मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्याकडे सुपूर्द केली.

पत्रकारांशी बोलताना पटोले म्हणाले की, शुक्ला यांची सेवा समाप्त झाली असतानाही सरकारने त्यांना दोन वर्षांची मुदतवाढ दिली आहे. त्या भाजपा युती सरकारला अनुकुल अशी भूमिका घेऊन मदत करत असतात, असे वादग्रस्त व संशयास्पद अधिकारी निवडणूक काळात नसावेत, अन्यथा निवडणूक निष्पक्ष होणार नाही. राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. मंत्रालयातील गृहमंत्र्यांच्या कार्यालयाची एका महिलेने तोडफोड केली व गृहमंत्र्यांच्या नावाच्या पाटीची तोडफोडही केली. राज्याचा गृहमंत्रीच सुरक्षित नाही तर राज्यातील जनता कशी सुरक्षित असेल असा प्रश्न नाना पटोले यांनी उपस्थित केला. भाजपा युती सरकारने विकासाच्या नावावर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी केली आहे, विकास कुठेच दिसत नाही पण निवडणुकीच्या तोंडावर जनतेमध्ये सरकारची स्वच्छ व विकास केल्याची प्रतिमा मीडियातून दाखवण्यासाठी एका आयएएस अधिकाऱ्यामार्फत मीडियाच्या प्रमुख व्यक्तींना बोलावून टार्गेट दिले जात आहे. यासाठी एमएसआरडीसी, एमएमआरडीए, म्हाडा, सीडको, प्रदुषण महामंडळ, एसआरए यांचा पैसा वापरला जात आहे. राज्य सरकारच्या विविध महामंडळावर हजारो कोटींचे कर्ज आहे. महामंडळे ५० हजार कोटी रुपये तोट्यात आहेत हे कॅगच्या अहवालातून समोर आले आहे. सरकारकडे पैसे नसताना या महामंडळाचा पैसा वापरून कोट्यवधींची उधळपट्टी सुरु आहे, असेही पटोले म्हणाले.

### मनपामध्ये आज लोकअदालत

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

लोकअदालतीचे आयोजन शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. जिल्हा न्यायालयाऐवजी सोलापूर महानगरपालिकेतील कौन्सिल हॉल येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृह, येथे या लोक अदालतीचे कामकाज होणार आहे.

याची सर्व मिळकतदारांनी नोंद घ्यावी, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली. या लोकअदालतीमध्ये मालमत्ता कर विभागाकडून सुमारे ८ हजार ५००, भुमी व मालमत्ता विभागाकडील १ हजार ६०० थकबाकीदारांसह विविध विषयांवर तोडगा निघणार आहे.


# मुंबई विद्यापीठ सिनेटच्या निवडणुकीत ठाकरे गटाची सरशी

## सर्व जागांवर विजयी

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २७ सप्टेंबर:**

वारंवार लांबणीवर व न्यायालयात दाखल याचीकेमुळे चर्चेचा ठरलेल्या मुंबई विद्यापीठाच्या सिनेटच्या निवडणूक उद्धव ठाकरे गटाच्या युवा सेनेने दणदणीत विजय मिळविला आहे सर्व दहा जागांवर ठाकरे गटाचे उमेदवार निवडून आले. त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या उमेदवारांचा एकतर्फी पराभव केला.

राज्यात शिवसेनेत फूट पडून सत्तांतर झाल्यानंतर गेल्या दोन वर्षापासून सिनेटच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या होत्या दोन वेळा निवडणूक जाहीर करूनही राजकीय दबावामुळे त्या स्थगित करण्यात आल्या होत्या अकेत गेल्या शुक्रवारी २२ सप्टेंबर ची निवडणूक स्थगित करण्याचे आदेश काढण्यात आल्यानंतर ठाकरे गटाने त्या विरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने राज्य सरकारला चपराक लगावत निवडणूक स्थगितीचा आदेश रद्द करून तातडीने निवडणुका घेण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार




२४ सप्टेंबरला मतदान झाले.

त्याचा आज निकाल लागला असून ठाकरे गटाच्या युवा सेनेने सर्व जागांवर बाजी मारली. ही निवडणूक ठाकरे गटाची युवासेना विरुद्ध भाजपा पुरस्कृत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये चुरशीची झाली होती.

मुंबई विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधर गटाच्या अधिसभा (सिनेट) निवडणुकीत यंदा १३ हजार ४०६ मतदारांपैकी जवळपास ५५ टक्के मतदारांनी मतदान केले. त्यानुसार ७ हजार २०० मतांपैकी ६ हजार ६८४ मते वैध आणि ५१६ मते अवैध ठरली आहेत. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना विजयासाठी जवळपास १ हजार ११४ मतांचा कोटा पार करणे आवश्यक आहे.

नोंदणीकृत पदवीधर गटाच्या खुल्या प्रवर्गातील ५ जागांसाठी १५, तर प्रत्येकी १ जागा असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातून २, अनुसूचित जमाती प्रवर्गातून ३, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती प्रवर्गातून ३, इतर मागास वर्ग प्रवर्गासाठी ३, महिला प्रवर्गातून २ असे एकूण २८ उमेदवार १० जागांसाठी निवडणुकीच्या रिंगणात होते. राखीव प्रवर्गातून पाचही जागांवर ठाकरे गटाच्या युवा सेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत. विजयी उमेदवारांची नावे अशी : स्नेहा गवळी-महिला राखीव, शीतल देवरुखकर-शेठ-अनुसूचित जाती, धनराज कोहचाडे-अनुसूचित जमाती- शशिकांत झारे-विज-भज, मयुर पांचाळ - इतर मागसवर्ग

शिंदे-भाजप सरकार सुरुवातीपासूनच रडीचा डाव खेळत होते. परंतु तरीही आम्ही सर्व जागांवर विजय मिळविला. विजयी उमेदवारांची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली.



# म्युझिक आर्ट डान्स अकॅडमी आयोजित नवली नवरात्री गरबा-दांडिया वर्कशॉपला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ सप्टेंबर -**

नवरात्रीनिमित्त म्युझिक आर्ट डान्स अकॅडमीच्या वतीने निर्मल कुमार फडकुले सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या नवली नवरात्र गरबा-दांडिया वर्कशॉपला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. नऊ दिवस चाललेल्या या वर्कशॉपमध्ये गरबा-दांडियाचे विविध प्रकार शिकविण्यात आले. कोरिओग्राफर भूमिषा शहा यांनी सहभागी महिलांना दोन ताली, तीन ताली, दोडिया, दांडिया, हिंच आणि गरबा रिल्स कशा तयार करायच्या याचे सखोल प्रशिक्षण दिले. या स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून डॉक्टर अंशू शर्मा आणि सोनाली खानापुरे यांनी काम पाहिले. वर्कशॉपचे आयोजन म्युझिक आर्ट डान्स अकॅडमीच्या असावरी गांधी, विकास गोसावी, सोनाली वाघमोडे आणि अमोल मोहिते यांनी यशस्वीरित्या केले. या कार्यक्रमामध्ये सहभागी महिलांसाठी शेवटच्या दिवशी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

**स्पर्धेतील विजेते**

**बेस्ट ड्रेसिंग :** डॉक्टर मिताली रेड्डी आणि अंकिता बेद.
**बेस्ट गरबा :** डॉक्टर क्षितीजा देशमुख आणि आदिती देसाई
**बेस्ट दांडिया :** रुपेश नागणसूरे आणि प्राजक्ता पाटील
**ऑल राऊंडर :** डॉक्टर श्रद्धा पांढरे

# सांगोल्यात छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ शिवशिल्पाचे आगमन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २७ सप्टेंबर-**

सांगोला शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात लोक सहभागातून नव्याने बांधण्यात आलेले भव्य दिव्य शिवतीर्थ येथे बसवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ शिवशिल्पाचा शुक्रवार दि.२७ सप्टेंबर रोजी हजारोंच्या उपस्थितीत अभूतपूर्व आगमन सोहळा पार पडला.

गुरुवार दि.२६ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ शिवशिल्प कोल्हापूर ते सांगोला असा तालुक्यातील शिवभक्त आपल्या वाहनाच्या ताफ्यासह सामील होत जल्लोषपूर्ण वातावरणात आणण्यात आला. यावेळी तालुक्याचे हद्दीमध्ये आगमन झाल्यानंतर विविध गावात स्वागत करण्यात आले. शुक्रवारी सकाळी १२ वाजता सांगोला शहरातील श्री. अंबिका मंदिर येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ शिवशिल्पाचे आगमन झाले. तेथून हलगी पथक, ढोल पथक, बँड पथक, टाळ पथक, उंट, घोडे, मावळे यांचा समावेश असणारी भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सांगोला शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर भगवे झेंडे,स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. आगमन मार्गावरुन रांगोळ्यांची आरास काढण्यात आली होती. फटाक्यांची आतिषबाजी करत, जेसीबीद्वारे फुलांचा वर्षाव करत व क्रेनद्वारे पुष्पहार अर्पण करून सर्व समाजबांधव व शिवप्रेमींनी उत्साही वातावरणात छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ शिवशिल्पाचे स्वागत केले.



**संताजी चौगुलेंनी साकारले शिवशिल्प**

सांगोल्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी अश्वारूढ शिवशिल्प व्हावे, अशी अनेक वर्षापासून शिवप्रेमींची मागणी होती. त्यानुसार सांगोला नगरपरिषदेच्या सहकार्याने व आर्किटेक्ट संकेत शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली एक ऐतिहासिक वारसा जपणारे शिवतीर्थ उभारण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या कला संचनालय विभागाच्या मार्गदर्शनानुसार कोल्हापूरचे शिल्पकार संताजी चौगुले यांनी ११ फूट उंच, २.५ टन वजनाचा ब्राँझचा पूर्णाकृती असे शिवशिल्प साकारले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# वक्फ कायदा आणि मुस्लिम समाजाची दिशाभूल

मुस्लिम समुदायाची संपत्ती तसेच धार्मिक संस्थांचे नियमन आणि व्यवस्थापनासाठी वक्फ कायदा बनविण्यात आला. मुस्लिम समुदायाच्या संपत्तीचा धार्मिक तसेच समाजोपयोगी कामासाठी योग्य उपयोग व्हावा म्हणून त्या संपत्तीचे संरक्षण तसेच प्रबंधन करण्याचा अधिकार या कायद्याने वक्फ मंडळाला मिळाला आहे. मुस्लिम समाजात वक्फ संपत्तीचा उपयोग धार्मिक तसेच समाजोपयोगी कामासाठी केला जातो. यातून गरिबांना मदत केली जाते तसेच शिक्षणासाठी त्याचा प्रामुख्याने उपयोग केला जातो. मुळात 'वक्फ' हा अरबी शब्द आहे. त्याचा अर्थ रोखणे वा समर्पण करणे असा आहे. वक्फ कायद्यानुसार अशा संपत्तीचे नियमन आणि व्यवस्थापन करण्यासाठी प्रत्येक राज्यात वक्फ मंडळ स्थापन करण्यात आले आहे. राज्यातील मुस्लिम समाजाच्या संपत्तीची नोंदणी, संरक्षण आणि व्यवस्थापन करण्याचा अधिकार या मंडळाला आहे. वक्फ कायद्यानुसार वक्फ मंडळाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व संपत्तीची वक्फ मंडळात नोंदणी करणे आवश्यक आहे. या संपत्तीची देखभाल, दुरुस्ती आणि विकास करण्याचा अधिकार वक्फ मंडळाला असतो. वक्फ संपत्तीशी संबंधित वादांच्या सुनावणीसाठी एक विशेष न्यायालयही असते. वरकरणी पाहता ही आदर्श अशी व्यवस्था आहे. पण या व्यवस्थेचा मोठ्या प्रमाणात गैरफायदा घेण्यात आला वा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्याचा दुरुपयोग करण्यात आला. कोणतीही संपत्ती जी मुस्लिमांची नाही आणि हिंदू समाजाची आहे, तिचाही वक्फ मंडळात खोटारडेपणाने समावेश करण्यात आला. देशात अशा हजारोंच्या संख्येत वादग्रस्त संपत्ती आहेत, ज्यांचा वक्फ कायद्यात समावेश करण्यात आला. एकदा एखाद्या वक्फ मंडळाने एखाद्या संपत्तीचा वक्फ संपत्ती म्हणून वक्फ मंडळात समावेश केला तर त्यावर सुनावणी करण्याचा अधिकार सरकार वा संबंधितांना मिळत नव्हता. याबाबतच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात सरकारकडे आल्या.

देशात २०१४ पर्यंत मुस्लिम समाजाचे तुष्टीकरण करणारे काँग्रेसचे सरकार असल्यामुळे हे प्रकार खपून गेले. तक्रारी आल्यानंतरही सरकारने त्याची दखल घेतली नाही; त्यावर योग्य ती कारवाई केली नाही. त्यामुळे मोदी सरकारने वक्फ कायद्यात दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला. जवळपास ४० दुरुस्त्या त्यात सुचविण्यात आल्या. एखादी संपत्ती वक्फ मंडळाची आहे, हे ठरविण्याचा अधिकार वक्फ मंडळाला होता. या अमर्याद अधिकाराला आळा घालण्याची तरतूद या नव्या कायद्यात आहे. कोणतीही संपत्ती वक्फची संपत्ती आहे, हे ठरविण्याचा वक्फ मंडळाचा अधिकार नव्या विधेयकातून काढून घेण्यात आला. एखाद्या संपत्तीवर वक्फ मंडळाने दावा केल्यावर त्या दाव्याची पडताळणी करण्याचा अधिकार सरकारने स्वतःकडे घेतला. विधेयकात ज्या दुरुस्त्या सुचविण्यात आल्या, त्या सरकारने स्वतःहून केल्या नाही तर न्या. सच्चर आयोग आणि के. रहमान खान यांच्या अध्यक्षतेखालील संसदेच्या संयुक्त समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारावर विधेयकात या दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. पण यावरून काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी गदारोळ केला. सरकार मुस्लिम समाजावर अन्याय करत असल्याचा आरोप केला. मोदी सरकारने घेतलेल्या कोणत्याही समाजहिताच्या आणि राष्ट्रहिताच्या मुद्याला विरोध करण्याची सवयच गेल्या १० वर्षांत काँग्रेसने स्वतःला लावून घेतली आहे. काँग्रेसचे आजपर्यंतचे राजकारण हे मुस्लिमांच्या तुष्टीकरणाचे होते. स्वतःच्या धर्मनिरपेक्षतेचा ढिंढोरा पिटणाऱ्या काँग्रेसला धर्मनिरपेक्षतेचा अर्थच कळला नाही, असे म्हणावेसे वाटते. धर्मनिरपेक्षता म्हणजे सर्व धर्मांना समान वागणूक देणे, कोणत्याही धर्माचे फाजील लाड न करणे तसेच कोणावरही अन्याय होणार नाही, याची काळजी घेणे. पण काँग्रेसने धर्मनिरपेक्ष या शब्दाचा अर्थ आपल्या राजकीय सोयीसाठी मुस्लिम समाजाचे तुष्टीकरण आणि बहुसंख्य हिंदूंवर अन्याय करणे, असा घेतला. मुस्लिम समाजाचे तुष्टीकरण करताना आपण देशातील बहुसंख्य हिंदूंवर अन्याय करतो आणि त्याची राजकीय किंमतही आपल्याला चुकवावी लागत आहे, याचे भानही काँग्रेसला राहिले नाही. मुस्लिम तुष्टीकरणाच्या मानसिकतेमुळे एकेकाळचा हिंदुबहुल काँग्रेस पक्ष कधी हिंदुविरोधी झाला, हे त्याला समजलेच नाही.

काँग्रेस या विधेयकावरून करत असलेला अपप्रचार रोखण्यासाठी मोदी सरकारने वक्फ दुरुस्ती विधेयक संसदेच्या संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेतला. कारण, भाजपाच्या पर्यायाने मोदी सरकारच्या मनात कुठेच पाप नव्हते. वक्फ दुरुस्ती विधेयक सरकारने मुस्लिम समाजाच्या व्यापक कल्याणासाठी आणले होते, मुस्लिम समाजावर अन्याय करण्यासाठी नाही. जगदंबिका पाल यांच्या नेतृत्वातील समितीने या विधेयकाबाबत सर्वांशी चर्चा करण्याची प्रक्रिया सुरू झाली. आतापर्यंतच्या समितीच्या चार-पाच बैठकी झाल्या आहेत. विशेष म्हणजे देशाच्या सगळ्या भागांत जाऊन ही समिती लोकांना भेटत आहे, त्यांची मतं जाणून घेत आहे. आश्चर्य आणि आनंदाची बाब म्हणजे अनेक मुस्लिम बांधवांनी आणि संघटनांनी या विधेयकाला पाठिंबा दिला आहे. वक्फ मंडळावर मुस्लिम समाजातीलच काही स्वार्थी आणि भ्रष्टाचारी लोकांनी कब्जा केला आहे. नागासारखे ते त्यावर फणा काढून बसले आहेत. वक्फच्या संपत्तीचा स्वतःच्या फायद्यासाठी ते दुरुपयोग करीत आहेत. मुस्लिम समाजातील गोरगरीब, शोषित, पीडित आणि वंचित वर्गाला वक्फच्या संपत्तीचा लाभ मिळत नाही. संयुक्त संसदीय समितीच्या मुंबईत झालेल्या बैठकीत गुलशन फाऊंडेशन आपले म्हणणे मांडत होता. वक्फ दुरुस्ती विधेयकाचे समर्थन करत असताना सुंता न झालेले मुस्लिम तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी गुलशनच्या प्रतिनिधीला रोखण्याचा प्रयत्न केला. कारण, गुलशनचे प्रतिनिधी या विधेयकाचे समर्थन करीत होते. कल्याण बॅनर्जी यांच्या या मुस्लिम तुष्टीकरणाच्या मानसिकतेचा राष्ट्रवादी विचाराच्या शिवसेना शिंदे गटाच्या नरेश म्हस्के यांनी विरोध केला, त्यामुळे दोघांत वाद झाला. त्याची परिणती गोंधळात झाली. कल्याण बॅनर्जी हे तृणमूल काँग्रेसचे आहेत. तृणमूल काँग्रेसच्या पश्चिम बंगालमधील सत्तेच्या राजकारणाची इमारतच मुस्लिम तुष्टीकरणाच्या पायावर उभी आहे. नवीन मुल्ला मोठ्याने बांग देतो असे म्हणतात, त्याप्रमाणे कल्याण बॅनर्जींचे झाले आहे. कारण त्यांची नेता मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यात मुस्लिम तुष्टीकरणाची चरमसीमा गाठली आहे. हिंदूंवर अन्याय करण्यासाठी तसेच मुस्लिमांचे तुष्टीकरण करण्यासाठी त्यांनी सर्व लाजलज्जा आणि मर्यादा सोडली आहे. तृणमूलच्या कल्याण बॅनर्जी यांनी तर कमरेचे सोडून डोक्याला बांधले असल्याचे त्यांच्या वागणुकीवरून दिसून आले आहे. मुस्लिमांचे सर्वात जास्त तुष्टीकरण कोण करतो, यासाठी काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जीवघेणी स्पर्धा लागली आहे. जुन्या काळातील गोष्टीत एखाद्या राक्षसाचा प्राण विशिष्ट गोष्टीत आणि विशिष्ट ठिकाणी राहात होता, असे म्हटले जात होते. तसेच काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्या सत्तारूपी राक्षसाचा प्राण मुस्लिम समाजाच्या तुष्टीकरणात आहे. मुस्लिम समाजही काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांना निवडणुकीत दिलेल्या पाठिंब्याची किंमत वेगवेगळ्या राष्ट्रविरोधी मार्गाने वसूल करीत आहे. देशातील सगळे मुस्लिम राष्ट्रविरोधी आहे, असे नाही. या देशावर श्रद्धा आणि निष्ठा असलेल्या तसेच भारतमातेला मानणाऱ्या मुस्लिमांची संख्या कमी नाही. सगळेच मुस्लिम अतिरेकी नाही, पण पकडलेले सर्व अतिरेकी हे मात्र मुस्लिम आहेत, हे कोणालाच नाकारता येणार नाही. मुस्लिम समाजातील युवकांची दिशाभूल करून त्यांना चुकीच्या मार्गावर नेण्यात काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांची मोठी भूमिका आहे. आपल्या राजकीय स्वार्थासाठी या दोन्ही पक्षांनी मुस्लिम समाजाची वारंवार दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. याचा राजकीय फायदा या दोन्ही पक्षांना मिळत असला, तरी त्याची मोठी किंमत मुस्लिम समाजातील युवकांना चुकवावी लागत आहे, त्यांच्यावर विनाकारण अतिरेकी असा शिक्का बसत आहे. वक्फ कायद्यातील दुरुस्ती ही मुस्लिमविरोधी नाही तर मुस्लिम समाजाच्या व्यापक हिताची आहे, याची जाणीव मुस्लिम समाजाने करून घेतली पाहिजे, त्यातच त्याचे हित आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# अहो; मुलांवर कोणते संस्कार करायचे?

बदलापूरच्या घटनेने महाराष्ट्र हादरला आणि सगळीकडून निषेध नोंदवण्यात आला. शाळेतच काम करणारा सफाई कर्मचारी अक्षय शिंदेने हे नीच कृत्य केल्याचं उघड झालं. गृहमंत्र्यांनी त्वरित हालचाल करून नराधमाला अटक केली. आता या आरोपीचा सोमवारी मुंब्रा बायपासवर एन्काऊंटर झाल्याची बातमी आली आहे. न्याय हा न्यायालयातच झाला पाहिजे. रस्त्यावरील न्याय लोकशाही देशाला शोभत नाही. परंतु भाजपाचे सरकार आल्यापासून विरोधक लोकांना रस्त्यावर येण्यास उकसवत आहेत. अक्षय शिंदेच्या प्रकरणात काही लोक अक्षय शिंदेचे समर्थक झाले आहेत की काय, अशी शंका मनात निर्माण होते. अक्षयने केलेला गुन्हा अक्षम्य आहे. तो माणुसकीला काळिमा फासणारा आहे. अक्षय शिंदेचा मृत्यू झाल्याने दुःख वाटून घेण्याचं कारण नाही आणि त्याच्या मृत्यूमुळे कुणाला दुःख होत असेल तर त्या दुःखी झालेल्या माणसाच्या सद्सद्विवेकबुद्धीवर, त्याच्या माणूसपणावर संशय घ्यायला बरीच जागा आहे. ज्या विरोधकांना नराधमाच्या एन्काऊंटरमुळे त्रास झाला आहे. त्यांच्या त्रासाचं मूळ कारण आपण शोधलं पाहिजे. त्यांना अक्षय शिंदेची काळजी वाटत नाही, तर त्यांना स्वतःची काळजी वाटते. कारण नराधमाला शिक्षा व्हावी म्हणून लोक निषेध नोंदवतात व त्याच्या मृत्यूनंतर लोक आनंद व्यक्त करतात. म्हणजे लोक जागृत झालेले आहेत.

दुसरी गोष्ट ही घटना घडल्यानंतर काही उत्साही लोकांनी मुंबईत देवेंद्र फडणवीसांचे फोटो लावले, ज्यात फडणवीसांच्या हातात बंदूक दाखवण्यात आली आहे आणि 'बदला पुरा' असे लिहिलेले पोस्टर्सही लावलेले आहेत. यावरून खासदार सुप्रिया सुळे यांनी फडणवीसांवर टीका केली आहे. त्या म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस एक गृहमंत्री आहेत आणि त्यांच्या हातात बंदूक असलेले पोस्टर लागणार, हे माझ्यासाठी खूप धक्कादायक आहे, जी मुलं ते बॅनर बघतील त्यांच्यावर काय संस्कार होतील? हा शाहू, फुले, आंबेडकरांचा देश आहे. देवेंद्रजींनी तिथून आम्हाला बंदुका दाखवल्या तर आम्ही इथून देवेंद्रजींना संविधान दाखवू.

सुप्रिया सुळे यांना मुलांवरील संस्काराचा प्रश्न पडला आहे; चांगलेच आहे. पण देवेंद्र फडणवीसांचा बंदुकधारी फोटो यापेक्षाही काही गंभीर प्रश्न महाराष्ट्रात आहेत. त्याबाबत सुळे यांची मते महाराष्ट्राला जाणून घ्यायला नक्कीच आवडतील. मुलांवर संस्कार करण्याच्या दृष्टिकोनातून पवार कुटुंबीयांनी कोणकोणते उपक्रम आजपर्यंत राबविले? मुलांवर संस्कार व्हावे म्हणून त्यांनी कोणती पुस्तके वाचावीत, असं सुळे यांना वाटतं?



शरद पवार संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनात उपस्थित राहतात, जिथे मुलांवर संस्कार करणाऱ्या रामावर आणि समर्थांवर गलिच्छ भाषेत टीका होते, निवेदिता सराफ या महिलेवरही विनाकारण टीका होते, तेव्हा मुलांवर वाईट संस्कार होत नाहीत का? शिवचरित्राचा प्रचार व प्रसार करणारे बाबासाहेब पुरंदरे यांना धमक्या दिल्या गेल्या, शिव्या दिल्या गेल्या तेव्हा मुलांवर वाईट संस्कार होत नाही का? समर्थ रामदास हे महाराष्ट्राचे थोर संत, त्यांच्याविषयी जेव्हा पुरावे नसतानाही अभद्र बोललं जातं, तेव्हा काय मुलांवर चांगले संस्कार होतात का? ज्ञानाची परंपरा चालवणाऱ्या भांडारकर प्राच्य शोध संस्थेवर हल्ला झाला, काही ज्ञानसाधना नष्ट करण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा कोणते संस्कार मुलांवर झाले? ज्ञानसाधना नष्ट करणे ही जिहादी संस्कृती आहे. शाहू, फुले, आंबेडकरांची ही संस्कृती नाही. या महापुरुषांनी ज्ञानोपासना केलेली आहे. मग ज्ञानसाधना नष्ट करणाऱ्यांच्या मागे जे खंबीरपणे उभे राहतात, ते या महापुरुषांचे गुन्हेगार नाहीत का?

हा शाहू, फुले व आंबेडकरांचा महाराष्ट्र आहेच. हे महापुरुष महानच होते. पण त्यांचे कोणते विचार सुप्रिया सुळे यांना आवडतात आणि ते मुलांनी आत्मसात केले पाहिजेत, हे त्या सांगू शकतात का? बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानाची उपासना केली, उच्चशिक्षित झाले. कुण्या हिंदुत्ववाद्यालाही कधी सुचलं नसेल असं पाकिस्तानवर पुस्तक त्यांनी लिहिलेलं आहे. त्यामुळे बाबासाहेबांबद्दल सर्वांच्याच मनात आदर आहे. पण बाबासाहेब आंबेडकरांवर व्याख्याने देऊन सुप्रिया सुळे मुलांना प्रोत्साहित करू शकतात का? त्यांना बाबासाहेबांचे कोणते गुण आवडतात, हे त्या सांगू शकतात का? संजय राऊत हे सुप्रिया सुळे यांचे सहकारी आहेत. त्यांची आघाडी आहे. राऊत हे टीव्हीवर उघडपणे गलिच्छ भाषा वापरतात, महिलांना व इतर नेत्यांना शिवीगाळ करतात, तेव्हा मुलांवर वाईट संस्कार होत नाहीत का? आपल्यापेक्षा वयाने अगदी लहान असलेल्या तरुणाचे अपहरण करून मारहाण केल्याचा आरोप आव्हाडांवर आहे. पण पवारांच्या संस्कारात वाढलेले आव्हाड, या तरुणाला गोंजारून त्याच्यावर चांगले संस्कार करू शकत नव्हते का? त्यांना असंवैधानिक मार्ग का अवलंबावा लागला? फडणवीसांचा उल्लेख 'पेशवा' असा करून जातीयवाद रुजवून कोणते संस्कार मुलांवर होणार आहेत? सावरकर म्हणजे देशाची आणि महाराष्ट्राची अस्मिता आहे. राहुल गांधी सावरकरांवर खोटे आरोप करतात. पवार हे प्रचंड व्यासंगी आणि अभ्यासू नेते असल्यामुळे त्यांना राहुल गांधींचा खोटारडेपणा माहीत आहे. मग संस्कार करण्याच्या दृष्टीने वडिलकीचा अधिकार घेऊन ते राहुल गांधींना दोन चांगल्या गोष्टी का सांगत नाहीत? त्यांना सावरकरांचा खरा इतिहास का सांगत नाहीत? सावरकरांवर गलिच्छ आरोप केल्याने किती वाईट संस्कार मुलांवर होतील?

यावर सुप्रिया सुळे यांनी खरंच काम करण्याची व या प्रश्नांची उत्तरे देण्याची गरज आहे. त्यांना लहान मुलांची चिंता आहे. त्या स्त्री आहेत, त्यांच्यात मातृत्व आहे. या मातृत्वाला जागून त्यांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावी आणि मुलांवर चांगले संस्कार होण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत. सुप्रिया सुळेंना महाराष्ट्राच्या जनतेचा पाठिंबाच असणार आहे. सर्वांच्याच त्यांना शुभेच्छा आहेत!

आता फडणवीसांचं एक ताजं उदाहरण घेऊन लेखाचा समारोप करूया. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या मंत्रालयातील कार्यालयाबाहेर एका महिलेने तोडफोड केल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात महिलेने ही तोडफोड केली आहे. यावर आता देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस म्हणाले, आपली बहीण चिडली असेल, तिची व्यथा असेल तर आपण समजून घेऊ. कोणी जाणीवपूर्वक पाठवलं असेल, तर ते देखील समजून घेऊ. त्यामागे काही वेगळं असेल तर तेही समजून घेऊ. आपल्या मंत्रालयात आपण सर्वांना एन्ट्री देतो, कोणतीही अडवणूक आपल्या मंत्रालयात नाही. अशा परिस्थितीत कधी लोक पहिल्या मजल्यावरून जाळीवर उडी मारतात, कधी लोकं रोष प्रकट करतात; याचा अर्थ ते आपले विरोधक आहेत असं नाही. त्यांच्या काही अडचणी असतात. त्या दूर करण्याचा आपण प्रयत्न करतो.

महिलांविषयी व राज्यातल्या जनतेविषयी अशी भावना मनात ठेवणारा व अशी सभ्य प्रतिक्रिया देणारा गृहमंत्री आपल्याला लाभला आहे. याचा अर्थ फडणवीसांवर खऱ्या अर्थाने शाहू, फुले, आंबेडकरांचे संस्कार झाले आहेत. त्यांचे हे सभ्य व सज्जनतेचे वागणे हेच मुलांसाठी संस्कार ठरणार आहेत.

writerjayeshmestry@gmail.com

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# व्यथा पोपटाची!

ज्या देशाचे सरन्यायाधीश पंतप्रधानांना गणपतीचे मोदक खायला घरी बोलावतात, तेथे आम्हाला काय न्याय मिळणार? ही व्यथा व्यक्त केली आहे पाळीव पोपटाने... रोज सकाळी उठून पोपटपंची करणारा एक सर्वज्ञानी असा पोपट, दुसऱ्यांदा पिंजऱ्यात अडकण्याच्या भीतीने धास्तावलेला आहे. पूर्वीचे तुरुंगातील शौचास जाण्यापासून इतरही अनेक अनुभव पाठीशी असल्याने कदाचित पोपटराव साहेबांना यावेळी पुन्हा त्याच वातावरणात जाण्याच्या कल्पनेनेच पोटात गोळा उठल्याचे दिसते. आता बेताल बडबडीवर अंकुश लागण्याची आणि तुरुंगात जाण्याची वेळ आल्याने सैरभैर झालेले पोपटराव गरळ ओकताना दिसत आहे. 'मरता क्या न करता...' अशी परिस्थिती आता पोपटरावांची यावेळी झालेली आहे.

तुरुंगातील मागील शंभर दिवसांतील अनुभवांवर साहेबांनी पुस्तकच लिहिण्याची तयारी केली होती म्हणे. टिपण काढणे सुरू होते. बरेच टिपण काढलेले आहेत, असे पोपटराव स्वतः जामिनावर बाहेर आल्यानंतर सांगत होते. ते तुरुंगातून बाहेरही आले, पण त्यांचे पुस्तक मात्र अजून आले नाही. पण त्यांनी ज्या काही नोंदी घेतल्या आहेत, टिपण काढले आहेत, त्यावरून पोपटरावांचा तुरुंगातला अनुभव काही फार चांगला होता असे दिसत नाही, हे स्पष्ट आहे. मुळात पोपटराव हा 'एहसान फरामोश' आहे. येथे मुद्दाम हिंदी शब्द वापरलाय्. कारण 'कृतघ्न' शब्द पोपटरावासारख्या 'नॉटी' व्यक्तीची पराकोटीच्या नीच वृत्तीची महानता अधोरेखित करण्यासाठी कमी पडतो. आता असे म्हणण्याचे कारण बघा, भाजपाशी गद्दारी करून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिवावर यांचं सरकार स्थापन झालं, ते न्यायालयाच्या कृपेने. हा स्वतः पोपटराव आज तुरुंगाबाहेर स्वच्छंद वावरत आणि बेताल बडबडत आहे, तेदेखील न्यायालयाच्या कृपेनेच. कारण कोट्यवधींच्या पत्राचाळ घोटाळा प्रकरणात हा पाळीव पोपट सध्या न्यायालयाच्या कृपेनेच मोकळा श्वास घेत अनेकांवर तोंडसुख घेत आहे. एवढंच नव्हे, तर नुकताच ज्या न्यायालयाच्या निर्णयाने पोपट बावचळला आहे. त्यावर अकांडतांडव करताना, छाती बडवताना दिसत आहे. हे सगळं नाट्य करण्याचे स्वातंत्र्यदेखील निकाल देणाऱ्या त्याच न्यायालयाच्या कृपेने पोपटाला लाभलेले आहे. कारण न्यायालयाने शिक्षा ठोठावली. त्यानंतर पोपटाच्या वकिलाने वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्यासाठी मुदत मिळावी म्हणून शिक्षेला स्थगिती देण्याची विनंती करणारा अर्ज दाखल केला. तेव्हा न्यायालयाने तो अर्ज मंजूर करत सहानुभूतीने एक महिन्यासाठी शिक्षेला स्थगिती देत अपिलाची संधी दिली. न्यायालयाच्या उपकारावर जगत असताना पुन्हा न्यायालयालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करण्याचा पोपट आणि त्याच्या मालकाचा धंदा झाला आहे. यांच्या बाजूने निकाल दिला तर न्यायालये चांगली आणि यांच्या विरोधात निकाल दिला तर ''खालच्या कोर्टापासून वरच्या कोर्टापर्यंत मी एक सिनेमा काढणार आहे. 'बाई मी विकत घेतला न्याय.' कारण या देशात न्याय मिळत नाही, विकत घ्यावा लागतो. न्यायव्यवस्थेचं संघीकरण झालं आहे,'' असे आसूड ओढायचे. बरं न्यायालयांवर असे एकदा नव्हे, अनेकदा खालच्या पातळीवर वारंवार टीका करूनही न्यायालय या पोपटलालवर न्यायालयाच्या अवमानप्रकरणी 'सुमोटो' कारवाई का करत नाही, हे देखील आश्चर्य आहे. हा पोपट वाट्टेल त्याला म्हणजे मग ती महिला असो किंवा पुरुष कशाचीही तमा न बाळगता अत्यंत अश्लील भाषेत माध्यमांच्या कॅमेऱ्यांसमोर शिवीगाळ करतो. शिवाय न्यायालयांना, न्यायमूर्तींच्याबद्दलदेखील वारंवार आक्षेपार्ह वक्तव्य करतो. अशा नॉटी व्यक्तीला न्यायालय जेव्हा जामीन देतो तेव्हा त्यावर टाकण्यात येणाऱ्या बंधनात, अनुचित, आक्षेपार्ह वक्तव्य किंवा कुणाबद्दल अश्लील भाष्य केल्यास जामीन रद्द केला जाईल, अशी एक अट का टाकत नाही, हे देखील कळण्यापलीकडले आहे. आरोपी जामिनावर असताना निर्दोष मुक्त झाल्याप्रमाणे उघड माथ्याने समाजात फिरतो, शिवीगाळ करतो, याला व्यक्ती स्वातंत्र्य म्हणता येणार नाही. यावर न्यायालयेदेखील दुर्लक्ष करतात आणि याचमुळे अशा व्यक्तींना अजून जोर चढतो. काय गरज होती न्यायालयाला एका आरोपीला अपिलासाठी एक महिन्याचा वेळ देण्याची! नाही तेव्हा एका रात्रीत अपिलात जाणाऱ्यांना कशाला एक महिना लागतो. फारच कळवळा आला असेल न्यायालयाला या पोपटाचा तर दोन-तीन दिवस द्यायचे होते. एकीकडे खणखणीत निर्णय देऊन लगेच गुळमुळीत भूमिका घेतल्यानेच अशा नॉटी व्यक्ती निरंकुश होतात आणि मग समाजात सर्रास उपद्रव करत फिरतात. याचे जितेजागते उत्तम उदाहरण म्हणजे हा पाळीव पोपट होय...

एका गोष्टीचं मात्र यावेळी आश्चर्यच आहे. फडणवीस-अजित पवार सरकार पाडण्यासाठी पोपटाचे साहेब सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते. न्यायही मिळाला होता. तिघाडी सरकार पाडल्याप्रकरणी पोपटाचे साहेब सर्वोच्च न्यायालयात पोहोचले, आमदार अपात्रताप्रकरणी साहेब सर्वोच्च न्यायालयात पोहोचले, पक्ष आणि चिन्ह गोठविण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधातही पोपटाचे साहेब सर्वोच्च न्यायालयात पोहोचले, पोपट स्वतः पत्राचाळ प्रकरणी जामीन मिळविण्यासाठी कनिष्ठ न्यायालयापासून उच्च न्यायालयापर्यंत गेले होते. जामीनही मिळाला होता. आता नुकत्याच आलेल्या या निर्णयाविरोधात पोपट सेशन कोर्टात न्यायाची भीक मागायला जाणार असल्याचं सांगत आहे. आता न्यायपालिकांचे संघीकरण झाले आहे, सरकारच्या दबावाखाली न्यायालये काम करत आहेत, न्याय विकत घ्यावा लागत आहे तर मग आम्हाला न्याय कसा मिळणार, असा प्रश्न उपस्थित करणारा पोपट, जेथे न्याय मिळणारच नाही, अशी पूर्ण खात्री असताना पुन्हा त्याच न्यायालयाकडे दयेची भीक मागायला का जात आहे? ज्या न्यायालयाने पोपटाविरोधात निर्णय दिला, तो दबावाखाली किंवा विकत दिल्याचा आरोप करत असताना त्याच न्यायालयाकडे अपिलासाठी थोडा अवधी देण्याची भीक का मागितली? आणि त्याच न्यायालयाने एक महिन्याच्या टाकलेले दयेचे तुकडे का लपकले? स्वाभिमानाने सांगायचे होते. सरकारच्या दबावाखाली दिलेला हा निर्णय आहे. त्यामुळे एक महिन्याची तुमची भीक नको म्हणून! मुळात स्वाभिमान विकलेली लाचार वृत्ती असला निडरपणा दाखवूच शकत नाही. अशा प्रवृत्ती चोऱ्या करून पुन्हा सहानुभूती गोळा करण्यासाठी 'व्हिक्टिम कार्ड' खेळतात, जनतेची दिशाभूल करून राजकीय पोळी शेकण्यासाठी तमाशा उभा करतात. वास्तवात अशा प्रवृत्ती तळवे चाटणाऱ्या औलादी असतात, हेच वास्तव आहे.

९२७०३३३८८६

## वेध

**अभिजित लिखिते**

# रक्तपात ते निवडणूक; जम्मू-काश्मिरातील बदल

जम्मू-काश्मीरचा प्रश्न हा भिजत घोंगडे ठेवल्यानेच जास्त चिघळला होता. या प्रदेशाला विशेषाधिकार देणारे कलम ३७० आणि ३५ ए येथील हिंसक स्थितीसाठी कारणीभूत होते. ते निष्प्रभ करताना काश्मिरात रक्ताचे पाट वाहतील यांसारख्या धमक्या काही राजकीय पक्षांच्या नेत्यांनी दिल्या होत्या. विरोधकांनी नेहमीप्रमाणे विरोधासाठी विरोध केला. कलम ३७० मुळे काश्मिरात दहशतवाद एक व्यवसाय झाला होता. परंतु, हे कलम निष्प्रभ केल्यानंतर जम्मू-काश्मिरात आता हळूहळू शांतता परतत आहे. दहशतवादाच्या घटनांचे प्रमाण इतके कमी झाले की, काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि त्यांची बहीण प्रियांका वढेरा तेथील बर्फात मुक्तपणे खेळू शकले. येथे सुरू असलेली विधानसभा निवडणूकही जम्मू-काश्मिरात सकारात्मक बदल झाल्याचे संकेत देत आहे. काश्मीरमधील कलम ३७० ही एक तात्पुरती व्यवस्था होती. ते हटवण्याचा निर्णय अतिशय योग्य असल्याचे आज सिद्ध झाले आहे.

मुळात कलम ३७० च्या मुद्यावर काँग्रेस पक्षातच वैचारिक गोंधळ होता. काही नेत्यांनी या निर्णयाचे समर्थन केले तर काहींनी विरोध केला होता. जम्मू-काश्मिरातील नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीची राजकीय दुकानदारीच या कलमावर अवलंबून होती. त्यामुळे त्यांची टीकाही अपेक्षित होती. आता येथे निवडणुका होत आहेत. येथून आता कुटुंबाद्वारे चालवल्या जाणाऱ्या पक्षांची गच्छंती होणे अत्यावश्यक झाले आहे. या कुटुंबकेंद्रित पक्षांमुळे जम्मू-काश्मीरचे अतोनात नुकसान झाले आहे. काश्मिरात सज्जाद लोन यांच्या नेतृत्वाखालील पीपल्स कॉन्फरन्स, अल्ताफ बुखारी यांच्या नेतृत्वात जेके तसेच अनेक छोटे पक्ष उदयास आले आहेत. त्यातील अवामी पार्टी इत्तेहाद हा फुटीरतावादी पक्ष आहे. हा एक निश्चितपणे चिंतेचा विषय आहे. मुख्य हुर्रियत नेता, हुर्रियत कार्यकारिणी सदस्याचा मुलगा, जमात-इस्लामीचा नेता आणि तुरुंगातील फुटीरतावादी नेत्याचा भाऊ असे या लोकशाहीच्या उत्सवात उतरले आहेत. पण, हे फुटीरतावादी लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात सहभागी होत आहेत, असा समज करून घेणे चुकीचे राहील. निवडणुकीत त्यांना लोकांचा प्रतिसाद कसा राहील, याची उत्सुकताही आहेच. मात्र, लोकसभा निवडणुकीत ओमर अब्दुल्ला यांच्यावर राशीद इंजिनीअरने मिळविलेला विजय, मेहबुबा मुफ्ती यांचा पराभव, पीडीपीचा झालेला शक्तिपात यामुळे सध्या तरी कुटुंबकेंद्रित पक्षांमध्ये काही प्रमाणात अस्वस्थता आहे. जम्मू-काश्मिरातील दशकभरातील ही पहिलीच निवडणूक आहे. त्यात अनेक माजी फुटीरतावादी, लहान पक्ष आणि अपक्षांनी उडी घेतली. एकूण परिस्थिती पाहता जम्मू-काश्मीरची विधानसभा त्रिशंकू राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जम्मू-काश्मीरचा पूर्वइतिहास पाहता येथील मतदारांनी २००२, २००८ आणि २०१४ मध्ये खंडित जनादेश दिला होता. त्यामुळे येथे दोन पक्षांना एकत्र येऊन सरकार स्थापन करणे भाग पडले होते. २००२ मध्ये पीडीपी आणि काँग्रेस, २००८ मध्ये नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आणि २०१४ मध्ये भाजपा आणि पीडीपीची सत्ता होती.

यावेळच्या निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेसने आघाडी केली आहे. कलम ३७० च्या मुद्यावर पाकिस्तान आणि हे दोन पक्ष एकाच बाजूकडे आहेत, असे वक्तव्य पाकिस्तानने केले. त्यामुळे या दोन्ही पक्षांची अडचण झाली आहे. नॅशनल कॉन्फरन्सच्या ओमर अब्दुल्ला यांनी पाकिस्तानवर टीका केली. पण, ती टीका म्हणजे त्यांची अपरिहार्यता असल्याचे स्पष्ट झाले. या मुद्यावर काँग्रेस आपली बाजू आक्रमकपणे मांडू शकली नाही. असे असले तरी, या निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स आणि काँग्रेस आघाडी निश्चितपणे चांगली लढत देणार असल्याची चिन्हे आहेत. भाजपा जम्मूत प्रतिनिधित्व वाढविण्याचा प्रयत्न करेल. २०१४ पासून हिंदुबहुल जम्मूच्या निवडणुकीत भाजपाचे वर्चस्व आहे. २४ पैकी १९ जागांवर विजय मिळवून २०१४ मध्ये भाजपाला ४६ टक्के मते मिळविता आली. २००२ मध्ये या पक्षाच्या मतांची टक्केवारी केवळ १५ टक्के होती. मात्र, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मतांची टक्केवारी निम्म्याने कमी झाली, हा भाजपासाठी धोक्याचा इशारा आहे. भाजपाची रणनीती जम्मूत जास्तीत जास्त जागा मिळविण्याचीच आहे. काश्मीर खोऱ्यात खंडित जनादेशाची शक्यता आहे. या निवडणुकीत किमान ५० जागा जिंकण्याचे पक्षाचे उद्दिष्ट आहे. हे कितपत शक्य होते ते पाहावे लागेल. मात्र, ही निवडणूक निश्चितपणे ऐतिहासिक निकालांची साक्ष देणारी आणि गुपकारांच्या गळचेपीतून मुक्तता देणारी ठरेल, अशी अपेक्षा आहे.

९०२८०५५१४१

## वाचक पत्रे

### पथदिवे वेळेत बंद करावेत

रात्री-अपरात्री जाता-येताना पथदर्शन स्पष्ट व्हावे म्हणून शहर असो की गाव सर्वत्र पथदिवे लावले जातात. हे पथदिवे अनेक वेळा गरज नसताना दिवसाही चालू असतात. सकाळी कधी कधी लख्ख सूर्यप्रकाश असल्यानंतरही हे पथदिवे सुरूच असतात. मी रेल्वेने कामानिमित्त अनेकदा महाराष्ट्रभर प्रवासावर असतो. त्यावेळी वेगवेगळ्या भागांमध्ये सगळीकडे एकाच व्यवस्थेने पथदिवे लावलेले दिसून येतात. साधारणपणे एका पथदिव्याच्या मेनस्वीचवर ३५ ते ४० दिवे लावलेले असतात.

पथदिवे साधारणतः सकाळी ८ वाजताच्या आधी बंद करावे, असा अलिखित नियम आहे. त्यानंतर जर हे पथदिवे सुरू राहिले तर विनाकारण ऊर्जा वाया जाते. प्रयोगात्मक दृष्टिकोनातून प्रत्येक जिल्ह्यात वेळेवर पथदिवे बंद करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात आली तर आठवड्याला जवळपास ७० हजार रुपयांची बचत होऊ शकते. महानगरपालिका, ग्राम पंचायत येथील लोकप्रतिनिधी व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना विनंती आहे की, या बाबीचा गांभीर्याने विचार करून योग्य ती पावले उचवावीत.

**पद्माकर नानोटे**/७२१८८९७४५२

### इंडिगो विमान कंपनी याकडे लक्ष देईल का?



ऑस्ट्रेलियात चार-पाच महिने मुक्काम करून मी नुकताच सिडनी ते दिल्ली एअर इंडियाच्या विमानाने निघालो. नियमानुसार एअर इंडियाच्या आंतरराष्ट्रीय विमानातून बॅगमध्ये ३० किलो व हॅण्डबॅगमध्ये ८ किलो सामान भारतात आणण्यास अनुमती आहे. परंतु, दिल्लीवरून नागपूरकरिता इंडिगो विमानातून बॅगमध्ये फक्त १५ किलो आणि हॅण्डबॅगमध्ये ७ किलो सामान वाहून नेण्याची परवानगी आहे. इंटरनॅशनल फ्लाईटमधून प्रवास करून आलेल्या प्रवाशांना इंडिगो कंपनीने बॅगमध्ये ३० किलो व हॅण्डबॅगमध्ये ८ किलो सामान वाहून नेण्याची परवानगी दिली पाहिजे. परंतु असे न करता इंडिगो कंपनी जास्तीच्या १५ किलो सामानाचे ५ हजार रुपये घेते. इंटरनॅशनल फ्लाईटमधून आलेल्या प्रवाशांकडून इंडिगो कंपनीने ३० किलो सामानाचे ५ हजार रुपये घेऊ नये. कारण परदेशातून येणाऱ्या प्रत्येक प्रवाशाजवळ भारतीय चलन (रुपये) असतेच असे नाही. इंडिगो कंपनीने याप्रमाणे बदल केल्यास इंटरनॅशनल फ्लाईटमधून प्रवास करून आलेल्या प्रवाशांना भुर्दंड सहन करावा लागणार नाही, असे वाटते.

**केशव कुकडे**/९०११०६६७२६

### गप्पीमासे आणि सुखद अनुभव

गप्पीमासे डासांच्या निर्मूलनासाठी उपयोगी असल्यामुळे ते कुठे मिळतील, अशी चौकशी नागपूर मनपाच्या विभागात कलोडेंकडे केली असता त्यांनी दवंडे यांच्याशी बोलण्यास सांगितले. दवंडे साहेबांनी आमचा पत्ता विचारून दुसऱ्या दिवशी गप्पी मासे पाठवतो, असे सांगितले. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता आम्हाला मासे मिळाले, हा आमच्यासाठी एक सुखद अनुभव होता. या तत्परतेसाठी नागपूर महानगर पालिका व साहेबांचे आभार.

**डॉ. रजनी काळे**/नागपूर

### डॉ. कळणावत आणि डॉ. फडकुले : एक आठवण

बहुधा १९९८ मधील प्रसंग आहे. यवतमाळच्या दत्त मंदिराचे तत्कालीन विश्वस्त अरुण भिसे यांच्या पुढाकाराने एक व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. मी सुचविल्यानुसार आयोजकांनी साहित्यिक आणि मराठीचे प्राध्यापक सोलापूरचे डॉ. निर्मलकुमार फडकुले हे वक्ते निमंत्रित केले होते. 'जीवनातील आनंद' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. व्याख्यानमालेतील एका व्याख्यानाला अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. शरद कळणावत तर दुसऱ्या दिवशी पुसदचे प्राचार्य, मराठी वाङ्मयाचे शिक्षक डॉ. उत्तम रुद्रवार हे अध्यक्ष म्हणून होते. फडकुले यांनी मानवी जीवन भरभरून कसे जगावे आणि दैनंदिन जीवनातील लहान-मोठ्या गोष्टीतून कसा आनंदानुभव घेता येतो, हे सांगितले तर कळणावत यांनी त्यांच्या आक्रमक शैलीत पुरुषार्थयुक्त जीवन जगण्यातील मर्म भाषणातून उलगडले. एकाच दिवशी संयत, साक्षेपी, ऋजू व्याख्यान आणि आवेशपूर्ण असे अध्यक्षीय भाषण अशी दोन वेगवेगळ्या शैलीतील व्याख्याने यवतमाळकरांनी ऐकली. अमरावती विद्यापीठाच्या प्राधिकरणावर असताना डॉ. कळणावतांनी प्राध्यापकांच्या प्रश्नांवर सदनात विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरलेले अनेकांनी पाहिले आहे.

**डॉ. विवेक रा. विश्वरूपे**/८८०५१५७४७५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### फायनान्सच्या वसुलीवाल्यांकडून रिक्षाचालकाला पैशाची मागणी करीत मारहाण

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

बजाज फायनान्सच्या वसुलीवाल्यांकडून रिक्षाचालकला पैशाची मागणी करीत जबर मारहाण करून जखमी करण्यात आली. ही घटना २६ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास घडली. मोहसिन सलीम पठाण (वय ३५, रा. होटगी रोड, सोलापूर) असे जखमी रिक्षाचालकाचे नाव असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मोहसिन पठाण हा २६ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास शिवाजी चौक ते रेल्वे स्टेशन अशी रिक्षा क्र. एमएच १३ सीटी ५७७८ ही चालवित जात असताना नवी वेस पोलिस चौकीसमोर विकि कांबळे व एका अनोळखी व्यक्तीने पठाण याची रिक्षा अडवून त्यास रिक्षा बुधवार पेठेतील जी एम ऑफीसच्या बोळात घेऊन गेले. सायंकाळी साडेदहाच्या सुमारास बोलावल्यानंतर विकि कांबळे व तो अनोळखी व्यक्तीने बजाज फायनान्सचे अधिकारी आहेत असे सांगितले. रात्री साडेदहाच्या सुमारास त्या दोघांनी पठाण याच्याकडे पैशाची मागणी करून त्यास दगडाने व लाथाबुक्क्याने जबर मारहाण केली. त्यामध्ये पठाण याच्या डोक्यास मुका मार लागला असून सर्वांगास मार लागला आहे. त्यामुळे पठाण यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### घरगुती वादातून तरूणीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

घरगुती वादातून तरूणीने गोळ्या खाऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. निशा आण्णा पवार (वय १९, रा. शेळगाव आर, ता. बार्शी) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरूणीचे नाव असून तिच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. निशा पवार या तरूणीने २६ सप्टेंबर रोजी दुपारी राहत्या घरी घरगुती वादामुळे कसल्यातरी गोळ्या खाल्ल्याने तिला त्रास होऊ लागला. त्यामुळे रोहित पवार यांनी निशा हीस उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## निधन वृत्त...

### शिवप्पा कोरे

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**



सन्मित्र नगर, शेळगी येथील रहिवासी शिवप्पा आणप्पा कोरे (वय ७७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुली, एक मुलगा, सूना, नातवंडे असा परिवार आहे. ते निवृत्त उपकोषागार अधिकारी होते.

### यमुनाबाई केदारी

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**



जुना घरकुल येथील यमुनाबाई पांडुरंग केदारी (वय ८२) यांचे शुक्रवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यामागे दोन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

### पुतळाबाई आहेरवाडी

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**



केगांव बु. (ता. अक्कलकोट) येथील पुतळाबाई भीमशा आहेरवाडी (वय ९५) यांचे शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता निधन झाले. ते माजी सरपंच स्व. राम आहेरवाडी यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# सेंट जोसेफ शाळेमध्ये नववीतील मुलाला मारहाण

## क्रूरतेची वागणूक दिल्याचा शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

शहरातील सेंट जोसेफ शाळेमध्ये इयत्ता नववीमध्ये शिकणाऱ्या मुलाला मारहाण करून जखमी केल्याप्रकरणी शाळेतील शिक्षकाविरुध्द बाल न्याय कायदा २०१५ च्या कलम ७५ नुसार सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत फहद खालीद खान (वय ३९, रा. घर नं. ०५, रेल्वे लाईन, हाजी हजरत खान बंगलो, मुळे हॉस्पीटलशेजारी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शाळेतील हिंदीचे शिक्षक हक्के यांच्याविरुध्द (जे जे ७५ ॲक्ट) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आहद फहद खान (वय १५) असे जखमी मुलाचे नाव आहे.

आहद खान हा डफरीन चौकातील सेंट जोसेफ शाळेमध्ये इयत्ता नववी अ मध्ये शिकत आहे. २६ सप्टेंबर रोजी सकाळी आहद हा वर्गात असताना सकाळी १० ते साडेदहाच्या दरम्यान वर्गातील हिंदी शिक्षकांनी वर्गात आहद हा त्याच्या मित्रासोबत बोलत असल्याच्या कारणावरून हाताने मारहाण केली व मानेला धरून ढकलून दिले. त्यामुळे आहद याच्या उजव्या हातास जखम व कमरेला मुक्का मार लागल्याने त्यास उपचारासाठी असलम कुडले यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

दरम्यान, शुक्रवारी सायंकाळी याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात शाळेतील शिक्षकाविरुध्द बाल न्याय कायदा कलम ७५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार संतोष शिंदे पुढील तपास करीत आहेत.

### सार्वजनिक वाचनालयात आज कार्यशाळा

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक वाचनालयांकरीता जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर, सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ सोलापूर व श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि.२८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत किर्लोस्कर सभागृह, श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, मुरारजी पेठ येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेस महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ अध्यक्ष वर्धा गजानन कोटेवार यांचे प्रमुख उपस्थिती असणार आहे.

### आमच्याकडे बघतो का म्हणून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

आमच्याकडे बघतो का असे म्हणत तरूणास मारहाण करून जखमी करण्यात आले. ऋषिकेश देवानंद शिंदे (वय २७, रा. तेलंगवाडी, ता. मोहोळ) असे जखमी तरूणाचे नाव असून त्याच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ऋषिकेश हा तेलंगवाडी येथे कॅनॉलमध्ये म्हशी हाकलून देत होता. त्यावेळी आमच्याकडे का बघतो असे म्हणून सतिश महावीर पवार व इतर तीन जणांनी मिळून ऋषिकेश यास लोखंडी पाईपने मारहाण करून जखमी केले. त्यामुळे ऋषिकेश यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.


## बार्शी नगरपरिषद, बार्शी

**पाणी पुरवठा विभाग**

**जाहीर ई-निविदा सुचना क्र. १**

**सन २०२४-२०२५**
**Main portal : http://mahatenders.gov.in**

बार्शी नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागासाठी योग्य त्या नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांच्याकडून १ ते ५१ परसेंटेज दराची कामाच्या ई निविदा विहीत नमुन्यात मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहे. सदर निविदेचे विस्तृत नमुने महाराष्ट्र शासनाच्या Main portal: http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) दिनांक २७/०९/२०२४ पासून उपलब्ध आहेत. बयाणा रक्कम व टेंडर फॉर्म फी नेट बैंकिंग पध्दतीने स्वीकारली जाईल. मागविण्यात आलेल्या निविदेची कागदपत्रे अटी व शर्ती प्रमाणे अपलोड करणे बंधनकारक आहेत. जर अटी व शर्तीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता न झालेस आपली निविदा उघडण्यात येणार नाही. तसेच मागविण्यात आलेल्या कामाची कमी अथवा जादा दराची निविदा मंजूर करणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

सही/-
(बाळासाहेब चव्हाण)
मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी



### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे अक्कलकोट, ता. अक्कलकोट येथील जनतेस आमचे अशिल श्री. गौसमहमद आसिफ काझी, रा. स्टेशन रोड, निअर खाजा दाऊद दर्गा अक्कलकोट यांचेवतीने या जाहीर नोटीसीने सुचीत करणेत येते की,

मौजे अक्कलकोट, ता.अक्कलकोट येथील नगरभूमापन नं. ९९० यांसी क्षेत्र ३५.७० आर फेरफार नं. २७१२ ही दुकान जागा अमर चंद्रशेखर बिराजदार रा. सावरकर चौक, अक्कलकोट यांचे प्रत्यक्ष मालकी व कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. यांसी चतुःसिमा, पूर्वेस - सिमेंट रोड, पश्चिमेस - ओपन प्लॉट, दक्षिणेस -उण्णद यांचे दुकान, उत्तरेस-दर्गा यांचे दुकान जागेची येणेपूर्वक चतुः सिमेतील ही दुकान जागा वर नमूद कारणास्तव विक्रीस काढल्याचे समजले असता, आमचे अशिलांनी श्री. गौसमहमद आसिफ काझी ही दुकान जागा घेत आहेत.

तथापि वर नमूद दुकान जागेबाबत कोणाचा कांही हक्क, हितसंबंध, कब्जा, करारमदार, वहिवाट हक्क, पोटगीहक्क, दान, लीज, कर्ज, इतर तत्सम व्यवहार खाजगी अगर वित्तीय संस्था यांचे कर्ज, देणे वगैरे प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून खालील नमूद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह समक्ष भेटून माहिती द्यावे अन्यथा सदरची मिळकत निर्वेध व निजोखमीची असल्याचे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत चालणार नाही, कळावे ही नोटीस दिली.
दि.२७/०१/२०२४

अशिल

सही/-
**ॲड. अमोल एम.बनसोडे**
बी.ए. एलएल.बी., एल एल एम
रा. कोन्हाळी, ता. अक्कलकोट जि. सोलापूर मो.नं. ९६३७१८४३९८



**महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात संकलन अभिलेख कक्ष**
दुरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalkot@gmail.com

जा.क्र. २०२४/अभिलेख/कावि/४७६/२०२४ दि.१९/०९/२०२४

**-: जाहिर प्रसिध्दीकरण :-**

प्रति,
श्री. गंगाबाई कलप्पपा कुंभार
रा. आंदेवाडी बु. ता. अक्कलकोट — अर्जदार
**विरुध्द**
जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय
ग्रामपंचायत, आंदेवाडी बु. ता अक्कलकोट — सामनेवाला

ज्याअर्थी, यातील गंगाबाई कलप्पपा कुंभार ता. अक्कलकोट जि. सोलापूर यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि.०१/०६/१९६८ रोजी मौजे आंदेवाडी बु. ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन गंगाबाई शिवण्णा कुंभार या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.१५/०५/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १९/०१/२०२४ रोजी आमचे साहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

शिक्का

सही/-
**विनायक मगर**
तहसीलदार अक्कलकोट



### जाहीर प्रसिध्दीकरण

**दि. कि. अर्ज नं. ३८/२०२४ नि.नं. ०५**
पुढील नेमलेली तारीख २१/१०/२०२४

**बार्शी येथील मे. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश सो. यांचे कोर्टात**
**(मा. एल.एस. चव्हाण सो.)**

१) **श्री. सुर्यकांत निवृत्ती भडकुंबे,** वय ५४ वर्षे, धंदा- शेती, रा. सारोळे, ता. बार्शी, जि. सोलापूर, हल्ली रा. हराळवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर
२) **चार्वाक सुर्यकांत निवृत्ती भडकुंबे,** वय २५ वर्षे, धंदा- काही नाही, (मतीमंद हिचे पालनकर्ता जनक वडील अर्जदार नं. १ सुर्यकांत निवृत्ती भडकुंबे) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**महाराष्ट्र सरकार** — **सा. वाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. २ ही मतीमंद असून तिचे नावे मौजे सारोळे, ता. बार्शी येथे जमीन गट नं. ७८/७ क्षेत्र ०१ हे. १२ आर, आकार १ रु. ३० पैसे आहे. अर्जदार नं. २ ही मतीमंद असून तिस काहीही व्यवहारिक ज्ञान नसल्यामुळे नमूद मिळकती संदर्भाने शासकीय कार्यालयात आवश्यक त्या ठिकाणी सह्या करणे, माहिती देणे याबाबतची काहीही जाण नाही. अर्जदार नं.२ हिचे जनक वडील अर्जदार नं. १ हेच आजपावेतो सर्व कामे, कर्तव्य करीत आलेले आहेत. परंतु सदरची नमूद जमीन वहिवाटणे अर्जदार नं. २ ही मतीमंद असल्याने शक्य नाही. त्यामुळे नमूद शेतजमीन विक्री करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. सदरची मौजे सारोळे, ता. बार्शी येथील शेतजमीन श्री. गोवर्धन नरहरी जाधव, रा. सारोळे, ता. बार्शी यांना विक्री करण्याची आहे. त्याकामी अर्जदार नं. २ हिचे जनक वडील अर्जदार नं. १ हिचे पालनकर्ता म्हणून नेमणूक करणेकामी तसेच सदरची मिळकत श्री. गोवर्धन नरहरी जाधव यांना विक्री करण्यास परवानगी मिळण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत विक्री व्यवहार करण्याबाबत तसेच मतीमंद अर्जदार नं. २ चार्वाक हिचे पालनकर्ता म्हणून अर्जदार नं. १ यांची नेमणूक करण्याबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलेली तारीख २१/१०/२०२४ रोजी स्वतः अथवा योग्य त्या प्रतिनिधीमार्फत मे. कोर्टाचे वेळेत सदरकामी हजर राहून योग्य ती लेखी हरकत अथवा तक्रार मांडावी. अन्यथा कोणाचीही कसलीही हरकत नाही असे समजून मे. कोर्ट सदर अर्जाची एकतर्फा चौकशी घेवून योग्य तो हुकूम व निकाल करतील. तारीख : २७/०९/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक**
अति. जिल्हा न्यायालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



### जाहीरनामा

**दि. कि. अर्ज नं. ४७/२०२४ नि.नं.०६**
पुढील नेमलेली तारीख १८/१०/२०२४

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

**कविता विजय जाधव,** वय ५९ वर्षे, धंदा- घरकाम, रा. विजय, डब्ल्युआयटी कॉलेजजवळ, घर नं. ब ६४७, कर्णिकनगर, सोलापूर — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा.वाला**

**अर्ज- वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळणेबाबत-**

ज्याअर्थी, यातील अर्जदाराची आई काशीबाई त्रिंबक शेलार ही दि. १०/०८/२०११ रोजी मयत झालेली आहे. तसेच अर्जदाराचे वडील त्रिंबक सदाशिव शेलार हे देखील दिनांक १९/०१/२००८ रोजीच मयत झालेले आहेत. मयत काशीबाई त्रिंबक शेलार व त्रिंबक सदाशिव शेलार यांना अर्जदार यांनीच मुलाप्रमाणे मयत काशीबाई त्रिंबक शेलार यांची सेवा- सुश्रुषा केलेली होती. अर्जा'र हिस मयत काशीबाई त्रिंबक शेलार हिची एकमेव कायदेशीर वारस असून, अर्जदाराशिवाय मयत काशीबाई त्रिंबक शेलार हिस अन्य कोणीही कायदेशीर वारस नव्हते व नाहीत. अर्जदाराची आई मयत काशीबाई त्रिंबक शेलार हिचे नांवे मौजे काटेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे जमीन गट नं!र ३० मध्ये क्षेत्र ०० हे. ६२ आर आकार ०० रु. ४५ पैसे ही शेतजमीन आहे. सदरील शेतजमिनीची अर्जदाराची आई नामे कै. काशीबाई त्रिंबक शेलार ही कायदेशीर मालक होती. अर्जदार हिच मयत काशीबाई त्रिंबक शेलार हिची कायदेशीर वारस असल्याने, अर्जदाराने सदर जमिनीस वारस नात्याने अर्जदाराची नोंद घेण्याची दिनांक ०३/१०/२०२३ रोजी मौजे काटेगांव, ता. बार्शी या गावचे संबंधित तलाठी यांना विनंती केली असता, त्यांनी अर्जदारास मे. कोर्टातून वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) आणलेशिवाय वरील नमूद जमिनीस वारसाची नोंद लावता येणार नाही असे सांगितले. त्यामुळे यातील अर्जदार ही मयत काशीबाई त्रिंबक शेलार हिची जवळची व कायदेशीर वारस (Legal heirs) आहे असे जाहीर होवून त्याप्रमाणे अर्जदार हिचे नांवे (Heirship Certificate) मिळणे जरुरीचे आहे व त्यासाठी अर्जदाराचा हा अर्ज आहे.

सदर अर्जदार हिचे व्यतिरिक्त मयत काशीबाई त्रिंबक शेलार हिचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क, हितसंबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिद्धीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली तारीख १८/१०/२०२४ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावी. मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे, हे प्रसिद्धीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता. : ०३/०९/२०२४

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहा. अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME **SOUDAGAR MOHASIN FAREEDSAHEB** HAS BEEN CHANGED TO NEW NAME **MOHSIN FARID SOUDAGAR** (ADDRESS - 1480, MANGALWAR PETH, BARSHI -413401) KINDALY NOTE THE SAME.

**Adhar no - 390208533286**



Classifieds

**शेतीविषयक**

**नर्सरी (शेती) काम करणारे जोडपे, ड्रायव्हर पाहिजेत. राहण्याची उत्तम सोय. पगार : १८ ते २२ हजार महिना जोडीला.**

**संपर्क**
**9922004242**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



## अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

जा.क्र.२०२४/न.प.अ.कोट/आरोग्य १०/संकलन-आरआर/कावि ६९२ दि. २६/०९/२०२४

**निविदा सूचना**

अक्कलकोट नगरपरिषदेकडील खालील नमुद केलेल्या कामाकरिता संबंधित मक्तेदाराकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कामाबाबतचा संपूर्ण तपशील व अटी शर्ती कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत (सुट्टीच्या दिवसा व्यतिरिक्त) नगरपरिषद आरोग्य विभागाकडे पहावयास मिळू शकेल. कोरे निविदा फॉर्म अभिलेख कार्यालयात मिळतील. त्याकरिता ठेकेदारांनी रोख रक्कम भरणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव/ वाहनाचा प्रकार | अंदाजित रक्कम (रु.) | बयाणा रक्कम (रु.) | निविदा फार्म |
|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकोट नगरपरिषद आरोग्य विभागातील घंटागाड्यांना फॅब्रिकेशन वर्क करणे. | २,००,०००/- | २,०००/- | ५००/- |
| २ | अक्कलकोट नगरपरिषद आरोग्य विभागाकडे अमोनियम बायकार्बोनेट औषध पुरवठा करणे. | ५,००,०००/- | ५,०००/- | ५००/- |

वरील कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ३०/०९/२०२४ पासून दि. ०८/१०/२०२४ अखेर पर्यंत नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी १.०० वाजेपर्यंत मिळतील. बयाणा रक्कम स्विकारणेची अंतिम तारीख ०८/१०/२०२४ दुपारी २.०० वाजेपर्यंत राहील. बयाणा रक्कम रोखीने भरणेची आहे. बयाणा रक्कम भरल्याशिवाय निविदा स्विकारले जाणार नाही. सिलबंद निविदा दि. / /२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारले जाईल. सिलबंद निविदा नगरपरिषद कार्यालयात आवक-जावक लिपिक यांचेकडे समक्ष आणून देणेत यावे. निविदेसंबंधी आवश्यक असलेली सर्व तांत्रिक कागदपत्रे एका लिफाप्या मध्ये (लिफाफा - अ) सिलबंद करणेचे आहे व भरलेली निविदा फॉर्म दुसऱ्या लिफाप्यामध्ये लिफाफा-ब) सिलबंद करून सादर करणेचे आहे व दोन्ही लिफाफे मिळून मोठ्या लिफाफ्यामध्ये एकत्रितरीत्या सिलबंद करून देणेची आहे. मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. दाखल झालेल्या निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सायं. ५.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क नगरपरिषदेला राहील. त्याची कारणे देणे नगरपरिषदेवर बंधनकारक राहणार नाहीत. निविदासंबंधी लागू असलेले नगरपरिषदेचे सर्व नियम मक्तेदारांवर बंधनकारक राहतील. बयाणा रक्कमेची मूळ पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. आवश्यक ते सर्व कागदपत्रे निविदासोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदेचा विचार केला जाणार नाही. वरील कामांकरिता निधी उपलब्धतेनुसार बिले अदा करणेत येतील.

सही/-
**रमाकांत डाके**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगरपरिषद, अक्कलकोट**



स्थापना : १९६२



## रतनचंद शहा सहकारी बँक लि.



**हेड ऑफिस : बाजार चौक, मंगळवेढा, जि.सोलापूर. फोन : ०२१८८-२२०३५५, २२१४५५**
email : rssbankmangalwedha@gmail.com

**नमुना झेड**

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस (नियम १०७ पोटनियम ((११)(ड)-१)२ पहा)**

ज्याअर्थी खाली सही केलेल्या वसुलीअधिकारी द्वारा **रतनचंद शहा सहकारी बँक लि., मंगळवेढा** महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये खालील नमुद यादीतील ऋणाको धकबाकीदार) यांना थकबाकी मागणी नोटीस खालील नमुद दिनांकास ऋणको यांना देऊन सदरचे नोटीसीमध्ये नमुद रक्कम सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून ऋणको यांने रक्कम जमा करण्यास कसुर केले आहे. त्याअर्थी खाली सही करणाऱ्याने खालील नमुद यादीतील ऋणको यांना खालील नमुद दिनांकास स्थावर मिळकत जप्तीची नोटीस देऊन पुढे निर्दोष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला आणि सर्व नागरीकांना जाहीर नोटीस देण्यात येते की खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकरी संस्था नियम १०७ (११(ड-१) अन्वये दिलेल्या आधिकरानुसार **प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा** खालील नमुद दिनांकास घेतला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरीकांना या द्वारे सावध करण्यात येते की, खाली नमुद केलेल्या यादीतील मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास रतनचंद शहा सहकारी बँक लि., मंगळवेढा या संस्थेच्या खाली नमुद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यातील इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | वसुली दाखला क्र. दिनांक | मिळकत क्र./क्षेत्र/आकार/हे. आर./चौ.मी. | थकबाकीदाराचे नाव | मागणी नोटीस दिनांक | स्थावर मालमत्ता जप्ती आदेश दिनांक | प्रतिकात्मक ताबा घेतलेली तारीख | दिनांक ३१/०८/२०२४ अखेर एकूण येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०१/८३/२०१५ दि. २९/०३/२०१६ | मौजे. उपळवटे, ता. माढा. जि. सोलापूर गट नं. ९४/१ क्षेत्र ०.२० हे. आर. | प्रशांत भैरवनाथ खुपसे | २९/०५/२०१६ | ०५/१०/२०२१ | २५/०९/२०२४ | रु. ५,४५,१५२/- अधिक व्याज |
| | | मौजे. उपळवटे, ता. माढा, जि. सोलापूर गट नं. १४७/२/ब पैकी हिस्सा क्षेत्र १.०० हे. आर | भारत रंगनाथ घोरपडे | | | | |
| २ | १०१/१०६०/२०२२/२३ दि. २४/०३/२०२३ | मौजे. परिते, ता. माढा, जि. सोलापूर गट नं. १७५/३ पै. हिस्सा. क्षेत्र १ ९८ हे. आर. यांसी | मोहन ज्ञानदेव झांबरे | २७/०७/२०२३ | १७/०२/२०२४ | २४/०९/२०२४ | रु. ७,४६,६००/- अधिक व्याज |
| | | मौजे, परिते, ता. माढा, जि. सोलापूर गट नं. १७५/३ पै. हिस्सा. क्षेत्र ०.५० हे. आर. | ज्ञानदेव / ज्ञानोबा तुकाराम झांबरे | | | | |
| | | मौजे. परिते, ता. माढा, जि. सोलापूर, गट नं. २३२/१२ क्षेत्र ०.४१ हे. आर. | रसुल गफुर सय्यद | | | | |
| ३ | १०१/७०२/२०१५ दि. ०१/०३/२०१६ | मौजे. सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर, १) गट नं. ५८४/३ क्षेत्र १.३३ हे. आर. २) गट नं. ७८३/३ क्षेत्र ०.१५ हे. आर. ३) गट नं. ६२८/३ क्षेत्र १.१६ हे. आर. ४) १) गट नं. ६३४/४/अ क्षेत्र ०.०७ हे. आर | अरुण मुरलीधर बिले | ३०/०४/२०१६ | २७/०१/२०२३ | २०/०९/२०२४ | रु. ३,४९,००४/- अधिक व्याज |
| ४ | १०१/६९५/२०१५ दि. ११/०७/२०१६ | मौजे. पुळुजवाडी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर १) गट नं. २०५ क्षेत्र २.११ ५० हे. आर. २) गट नं. ११० क्षेत्र ०.०३ हे. आर. | रामचंद्र दिगंबर मदने | १८/०९/२०१६ | २८/०६/२०२३ | २१/०९/२०२४ | रु. १२,२२,३४६/- अधिक व्याज |
| ५ | १०१/५०८/२०१५ दि. २८/०७/२०१६ | मौजे. तिर्थ, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर गट नं. ७८/१ क्षेत्र २.६० हे. आर. | जयप्रकाश विश्वनाथ मदने | १८/०९/२०१६ | १०/०१/२०२३ | २१/०९/२०२४ | रु. ९,८२,२९६/- अधिक व्याज |

वरील सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा पत्रावर सही करुन खाली नमुद वसुली अधिकारी त्यांच्याकडे द्यावा अन्यथा तसे न केल्यास सदर मालमत्तेचा ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रीया मा. जिल्हाधिकारीसो सोलापूर यांच्याकडे अर्ज करुन पार पाडले जाईल. व होणाऱ्या परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल. याची नोंद घ्यावी.

**स्थळ :- मंगळवेढा**
**दिनांक :- २६/०९/२०२४**

सही/-
**वसुली अधिकारी**
**(म.सह. संस्था अधिनियम १९६० कलम १५६ अन्वये अधिकार प्रदानित द्वारा रतनचंद शहा सहकारी बँक लि. मंगळवेढा)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भारताचे वर्चस्व गाजवण्याचे लक्ष्य

## मायदेशात सलग १८ व्या मालिका विजयाच्या उंबरठ्यावर ● भारत-बांगलादेश दुसरी कसोटी आजपासून

◆ **कानपूर, २६ सप्टेंबर**

शुक्रवारपासून येथे सुरू होत असलेल्या दुसऱ्या व अंतिम कसोटी सामन्यात बांगलादेशविरुद्ध क्लीन स्वीप करण्याचे बलाढ्य यजमान भारतीय संघाचे लक्ष्य आहे.मात्र त्याकरिता विराट कोहली व कर्णधार रोहित शर्मांने भारतासाठी लौकीकाप्रमाणे तडाखेबंद फलंदाजी करणे आवश्यक असेल.

चेन्नई येथे पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात रविचंद्रन अश्विनचा अष्टपैलू खेळ, शुभमन गिलचे शानदार शतक, रवींद्र जडेजाची दर्जेदार फलंदाजी व ऋषभ पंतचे दमदार पुनरागमन केल्यामुळे भारताने बांगलादेशच्या वेगवान गोलंदाजांच्या दबावावाला न जुमानता चेन्नईत आरामात विजय मिळवून दिला.

भारतीय संघाने या कसोटीत ज्यापद्धतीने जोरदार मुसंडी मारली, ती बघता या मालिकेत ते वर्चस्व गाजवतील असा विश्वास निर्माम झाला आहे, विशेषतः भारतीय संघ मायदेशात विक्रमी सलग १८ व्या मालिकाविजयाच्या उंबरठ्यावर आहे.

आपण अजूनही कसोटी क्रिकेट मैदान प्रभावीपणे गाजवू शकतो, हे यशस्वीपणे कसोटी पुनरागमन करणाऱ्या ऋषभ पंतला दाखवण्याची वेळ आली आहे.

तथापि, बांगलादेशचे वेगवान



कानपूर येथे भारत व बांगलादेश दरम्यानच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यापूर्वी खेळपट्टीचे निरीक्षण करताना भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर व कर्णधार रोहित शर्मा

गोलंदाज हसन महमूद व तस्किन अहमदने आश्वासक खेळपट्टीवर अचूक मारा केल्यामुळे त्यांना पहिल्या कसोटीत दिग्गज रोहित व विराटला बाद करण्यात यश मिळाले. मात्र आता दुसऱ्या कसोटीत हे दोघेही धावांचा पाऊस पाडण्यास उत्सुक असतील.

**ग्रीन पार्कची खेळपट्टी फिरकीपटूंसाठी अनुकूल**

ग्रीन पार्क स्टेडियमची खेळपट्टी पारंपारिकपणे फिरकीपटूंना मदत करणारी खेळपट्टी आहे. मात्र उन्नाव येथून आणलेल्या काळ्या मातीने तयार केलेल्या खेळपट्टीचे मूळ स्वरूप फारसे बदलण्याची अपेक्षा नाही. सामन्याच्या प्रारंभी वेगवान गोलंदाजांना थोडी फायदेशीर ठरण्याची अपेक्षा आहे, परंतु सामना जसजसा खेळ पुढे जाईल तसतशी खेळपट्टी संथ होईल. याचा अर्थ, भारत तीन वेगवान गोलंदाजांऐवजी तीन फिरकीपटू मैदानात उतरवू शकतात. तसे झाल्यास आकाश दीप, कुलदीपला संधी मिळू शकते.

**बांगलादेश संघात बदल अपेक्षित**

दुसरीकडे, कसोटी मालिकेतील सलामीच्या सामन्यात दमदार फलंदाजी करण्यात अपयशी ठरलेल्या बांगलादेशने आता दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी आपल्या अंतिम एकादशमध्ये बदल करणे अपेक्षित आहे. चेन्नईच्या कसोटीत बांगलादेशने आपल्या पहिल्या डावात उच्च दर्जाच्या वेगवान आक्रमणाविरुद्ध जोरदार संघर्ष केला, परंतु दुसऱ्या डावात अशक्य लक्ष्याचा पाठलाग करताना त्यांना अश्विन व जडेजा या गोलंदाजांना हाताळता आले नाही.

> **स्थळ : ग्रीन पार्क स्टेडियम, कानपूर**
> **वेळ : सकाळी ९.३० वाजतापासून**
> **थेट प्रसारण : स्पोर्ट्स १८ नेटवर्कवर**

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत** : रोहित शर्मा (कर्णधार), यशस्वी जयस्वाल, शुभमन गिल, विराट कोहली, के. एल. राहुल, सर्फराज खान, ऋषभ पंत (यष्टिरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक), आर. अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद. सिराज, आकाश दीप, जसप्रीत बुमराह, यश दयाल.

**बांगलादेश** : नजमुल हुसेन शांतो (कर्णधार), महमुदुल हसन जॉय, झाकीर हसन, शादमान मोमिनुल हक, मुशफिकुर रहीम (यष्टिरक्षक), शाकिब अल हसन, लिटन कुमेर दास, मेहदी हसन मिराझ, तैजुल इस्लाम, नईम हसन, नाहिद राणा, हसन महमूद, तस्किन अहमद, सय्यद खालेद अहमद, जाकेर अली अनिक. ◀*(वृत्तसंस्था)*



# सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये उद्या राज्य कराटे स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

ओकिनावा मार्शल आर्ट्स कराटे अकॅडमी सोलापूरच्या वतीने रविवार दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी सिंहगड इन्स्टिट्यूट येथे राज्यस्तरीय कराटे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती कमिटीचे अध्यक्ष प्रभूराजेंद्र भीमदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रविवारी सकाळी सिंहगड इन्स्टिट्यूट च्या इनडोअर हॉलमध्ये या स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपमहापौर पद्माकर काळे, माजी नगरसेवक केदारनाथ उंबरजे, संतोष पवार, सिंहगडचे संजय नवले, क्रीडा मार्गदर्शक सत्यन जाधव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ६ वाजता या ठिकाणीच पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे ९०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. ओकिनावा मार्शल आर्ट्स इंटरनॅशनल बिनोरीयो स्टाईलचे ग्रँडमास्टर एस. श्रीनिवासन यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि राष्ट्रीय पंचांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा होत आहे. विविध कलर बेल्ट व विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार ही स्पर्धा होणार आहे. प्रामुख्याने सुलो, काता , कुमेते , वेपन काता , ग्रुप काता या प्रकारात घेण्यात येणार आहे. विजेत्या स्पर्धकांना प्रथम, द्वितीय, तृतीय यानुसार सुवर्णपदक, रौप्य पदक व कांस्यपदक तसेच संघटनेचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे

या पत्रकार परिषदेस शिवशरण वाणी परीट, मनीषा भीमदे, सुनिता वाणी परीट, सचिन स्वामी आदी उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### लॅकोस्टे लेडीज गोल्फसाठी प्रणवी, त्वेसा मलिक सज्ज



**ड्यूविल** : येथे प्रारंभ होणाऱ्या लॅकोस्टे लेडीज ओपन डी फ्रान्स गोल्फ स्पर्धेसाठी त्वेसा मलिक व प्रणवी उर्स भारताचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी सज्ज आहे. या दोघींनी ला सेला ओपनमध्ये अव्वल दहा गोल्फरमध्ये स्थान मिळवत या ५४ होलच्या स्पर्धेसाठी आपत्री पात्रता सिद्ध केली. २९ देशांतील एकूण ९६ खेळाडू गोल्फ बॅरिएर येथील डियान बॅरियर कोर्समध्ये खेळतील. गत आठवड्यात या स्पर्धेसाठी पात्रता सिद्ध करताना प्रणवीने जबरदस्त सहा-अंडर ६६ अशी कामगिरी करत सहावे स्थान मिळविले. ही तिची लेडीज युरोपियन टूरमधील कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी ठरली. त्वेसा मलिकने चार फेऱ्यांनंतर टी-५७ स्थान मिळविले. प्रणवी ऑर्डर ऑफ मेरिटमध्ये २४व्या, तर त्वेसा ४७व्या स्थानावर आहे. अव्वल भारतीय गोल्फपटू १८ वर्षीय दीक्षा डागर दोन आठवड्यांचा ब्रेक घेत आहे. हिरो वुमेन्स प्रो-गोल्फ टूरमधील विजेती प्रणवी ऑस्ट्रियाच्या एम्मा स्पिट्झ व फ्रान्सच्या पॉलीन रुसिन-बुचार्ड यांच्यासोबत खेळणार आहे. त्वेसा सुद्धा हिरो डब्ल्यूपीजीटी विजेती आहे व ती आयर्लण्डच्या सारा बायर्न व इंग्लंडच्या लिली हम्फ्रे मेस यांच्यासोबत खेळेल. स्वीडनची जोहाना गुस्तावसन आपल्या लॅकोस्टे लेडीज ओपन डी फ्रान्सच्या विजेतेपदाचे रक्षण करण्यासाठी परतली आहे. ■

### नाओमी ओसाका, केनिन, टाऊनसेंडची विजयी सुरुवात



**बीजिंग** : येथे सुरू असलेल्या चायना ओपन टेनिस स्पर्धेत पहिल्या फेरीत माजी अव्वल मानांकित नाओमी ओसाकाने इटलीच्या लुसिया ब्रोंझेट्टीवर ६-३, ६-२ असा विजय मिळविला. ओसाकासह सोफिया केनिन, टाऊनसेंडनेही आपल्या पहिल्या विजयाची नोंद केली. चार वेळची ग्रॅण्ड स्लॅम विजेती ओसाकाने ८३ मिनिटांत हा सामना जिंकला. माजी ऑस्ट्रेलियन ओपन विजेती सोफिया केनिनने रोमानियाच्या अना बोगदानवर ७-५, ६-२ असा विजय मिळवला. आता २५ वर्षीय केनिन पुढील फेरीत १२ व्या मानांकित डायना श्नायडरशी खेळेल. अमेरिकेची टेलर टाऊनसेंड मार्टिना ट्रेव्हिसनचा ६-२, ४-६, ६-३ पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. चीनच्या वांग झिन्युने जपानच्या माई होन्तामाचा ६-१, ६-३ असा पराभव केला तर युलिया स्टारोडबत्सेवाने लॉरा सिगेमुंडचा ६-४, ७-६ (३) असा पराभव केला. अमेरिकन ओपन विजेती व अव्वल मानांकित आर्यना सबालेन्का थेट दुसऱ्या फेरीत झरिना दियास किंवा मनाचाया सवांगकावशी खेळेल. या हंगामातील चार डब्ल्यूटीए विजेती व अव्वल विश्वमानांकित इगा स्वियातेक वैयक्तिक कारणांमुळे या आठवड्यात खेळत नाही.

### आर्सेनलसाठी दोन गोल स्वप्नवत : एथन



**लंडन** : लीग चषक फुटबॉल स्पर्धेत प्रथमच आर्सेनल क्लबसाठी खेळताना १७ वर्षीय एथन नवागेरी याने उत्स्फूर्त खेळाचे प्रदर्शन करत दोन गोल नोंदवले. किशोरवयीन एथनच्या दोन गोलच्या बळावर आर्सेनलने प्रतिस्पर्धी बोल्टन वँडरर्स संघावर ५-१ अशा गोलफरकाने शानदार विजय नोंदविला. बोल्टन वँडरर्सविरुद्ध विजय नोंदवताना पदार्पणातच दोन गोल नोंदवणे, हे माझ्यासाठी रात्रीचे स्वप्न पाहत असल्यासारखे वाटले, मात्र अनेक वर्षांचे स्वप्न आज साकारले गेले. मला आणखी गोल करायचे आहे, असे एथन म्हणाला. रविवारी प्रीमियर लीगमध्ये मॅन्चेस्टर सिटीविरुद्धची लढत २-२ गोलने बरोबरीत राहिल्यानंतर व्यवस्थापक मिकेल अर्टेटा यांनी संघात बदल केला आणि नवानेरी व १६ वर्षीय गोलरक्षक जॅक पोर्टर या दोघांना पदार्पणाची संधी दिली. नवागेरीने या संधीचे सोने केले. दोन वर्षांपूर्वी अर्टेटाने नवागेरीला प्रीमियर लीगचा सर्वात तरुण खेळाडू बनवले होते. तेव्हा त्यांनी ब्रेंटफोर्डविरुद्धच्या सामन्यात अखेरीस पर्याय म्हणून तत्कालीन १५ वर्षीय खेळाडूला म्हणजे नवागेरीला पाठवले होते. नवानेरी संपूर्ण सामन्यात अनुभवी खेळाडूच्या बरोबरीने खेळला व आर्सेनलला लीग चषकाच्या चौथ्या फेरीत स्थान मिळवून दिले. ■

# बार्शीच्या सिद्धांत कोठारीची विजयी सलामी

## मेघराज रोडगे स्मृती चषक ९ वर्षाखालील राज्य बुद्धिबळ स्पर्धा

### सोलापूरच्या श्रेयश कुदळे, नैतिक होटकर, पृथा ठोंबरे यांचेही विजय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

"स्व. मेघराज (विकी) रोडगे स्मृती चषक" ९ वर्षाखालील खुला व मुलींच्या राज्यस्तरीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत अग्रमानांकित आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू अर्जुन सिंग (मुंबई), दर्श पोवार (अ. नगर), राघव पावडे व सर्वज्ञ बालगुडे (पुणे), देवांश डेकटे (ठाणे), श्रेयश कुदळे, नैतिक होटकर (सोलापूर) सिद्धांत कोठारी (बार्शी) यांनी तसेच मुलींमध्ये मुंबईची आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू त्वीशा जैन, भूमी ढगढगे (नंदुरबार), गिरीशा पै (मुंबई), पृथा ठोंबरे या मानांकित खेळाडूंनी विजयी सलामी दिली.

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटना यांच्या मान्यतेने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशन व पोलीस कल्याण केंद्राच्या सहकार्याने सोलापुर चेस अकॅडमीने सदर स्पर्धा उद्योजक अरुण रोडगे यांनी प्रायोजित केलेल्या आहेत. या स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त २२०




नामांकित खेळाडूंनी खेळाडूंनी विक्रमी सहभाग नोंदवला. यापैकी ४३ बुद्धिबळपटू आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू आहेत. पोलीस कल्याण केंद्र येथील ड्रीम पॅलेस येथे आजपासून सुरु झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन सहाय्यक पोलीस उपायुक्त राजन माने व नामवंत उद्योजक भाऊसाहेब रोडगे यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाली. यावेळी महाराष्ट्र राज्य बुद्धीबळ संघटनेने नियुक्त केलेले प्रमुख पंच कोल्हापूरचे आंतरराष्ट्रीय पंच भरत चौगुले, अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर, संघटनेचे सचिव सुमुख गायकवाड, उद्योजक दिनेश जाधव, अतुल कुलकर्णी, विद्यापीठ खेळाडू संतोष पाटील, सुभाष उपासे, वरिष्ठ राष्टीय पंच उदय वगरे, शशिकांत मक्तेदार, युवराज पोगुल, प्रशांत पिसे, रोहिणी तुम्मा, जयश्री कोंडा, विजय पंगुडवाले, यश इंगळे, प्रज्वल कोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुमुख गायकवाड व सूत्रसंचालन संतोष पाटील यांनी केले. या स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार एकूण आठ फेऱ्यात स्पर्धा संपन्न होणार असुन मुले व मुलींच्या आकर्षक लढती उपस्थितांना पहावयास मिळत आहेत. तसेच संभाजी नगरचा पाच वर्षीय गिरीक पाटील, पुण्याचा सहा वर्षीय शौर्य मक्तेदार व सोलापूरचा विवेक स्वामी हे बाल खेळाडू आकर्षक खेळ करत सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत.

# संध्याराणी बंडगरला दोन उपविजेतीपदे

## वरिष्ठांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

वरिष्ठांच्या जागतिक मानांकन आय.टी.एफ. एमटी ४०० लॉन टेनिस स्पर्धेत संध्याराणी बंडगरने एकेरी व दुहेरीमध्ये उपविजेतेपद पटकाविले.

झज्जर येथे हरियाणा राज्य लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व आय टी एफ यांच्या अधिपत्याखाली आयोजित केलेल्या स्पर्धेत ४० वर्षांपुढील महिलांच्या एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात द्वितीय मानांकित नोएडाच्या सोनल व्होराने सोलापूरच्या बिगर मानांकित संध्याराणी बंडगारचा ७-५ , ६-४ असा तर दुहेरीच्या अंतिम सामन्यात



प्रथम मानांकित सोनल व्होरा (नोएडा) व विभा चौधरी (दिल्ली) या जोडीने बिगर मानांकित संध्याराणी बंडगर (सोलापूर) व नाझनीन रहमान (आसाम) या जोडीचा ६-३,६-३ असा पराभव करुन विजेतेपद पटकावले. सुधीर सालगुडे हे संध्याराणी बंडगर हिचे प्रशिक्षक आहेत. संध्याराणीच्या या कामगिरीमुळे त्यांना एकूण १४०० जागतिक मानांकन गुण प्राप्त झाले असून त्यामुळे त्यांचा भारतीय संघात प्रवेशाबाबतचा मार्ग सुकर झाला आहे. संध्याराणीच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी व मानद सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले .

# बॉल बॅडमिंटन स्पर्धेत सहिने प्रशालेस दुहेरी मुकूट

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

शालेय शहरस्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत १७ वर्षाखालील मुली व १४ वर्षाखालील मुलींच्या गटात सकुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेने विजेतेपद पटकावित दुहेरी मुकूट पटकावला. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात उपविजेतपद तर १९ वर्षाखाली मुलांच्या गटात तृतीय स्थान मिळवले. १७ वर्षाखाली मुलीच्या गटात अंतिम फेरीत स. हि. ने प्रशालेने काडादी प्रशालेचा ११-७, ११-८ असा पराभव केला. १४ वर्षांखालील मुलींच्या गटातही त्यांनी काडादी प्रशालेवर ११-५, ११-४ अशी मात



केली. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात चुरशीत झालेल्या अंतिम सामन्यात स.हि.ने. प्रशालेस गांधी नाथा स्कूलकडून ७-११, ११-७ (तिसरा सेट १०-१०, ११-११, ११-१२, ११-१३) असा पराभव स्वीकारावा लागला १९ वर्षाखालील मुलांच्या गटात त्यांनी श्राविका प्रशालेचा ११-८, ११-६ असा पराभव करत तृतीय स्थान मिळविले. त्यांना क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी, शिक्षिका विद्या माने रोहिणी कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड रघुनाथ दामले, सचिव प्रिती चिलजवार, मुख्यध्यापिका नीता येरमाळकर यांनी अभिनंदन केले.

# शंकरनगरच्या लक्ष्मीबाई कन्या प्रशालेची तालुका मैदानी स्पर्धेत चमकदार कामगिरी

## २८ खेळाडूंची जिल्हा स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२७ सप्टेंबर-**

तालुका मैदानी स्पर्धेत शंकरनगर येथील लक्ष्मीबाई कन्या प्रशालेतील मुलींनी चमकदार कामगिरी केली. ४२ पैकी २८ खेळाडूंची जिल्हा तर एका खेळाडूंची विभागसतरावर निवड करण्यात आली.

माळेवाडीच्या शंकरराव मोहिते महाविद्यालय येथे झालेल्या या स्पर्धेत धनुर्विद्या प्रकारात एका खेळाडूची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या सर्व यशस्वी खेळाडूंचे मंडळाचे मार्गदर्शक जयसिंह मोहिते-पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील,सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे, मुख्याध्यापिका अनिता पवार यांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक अर्जुन बनसोडे व संजय झंजे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पत्रकार चंद्रकांत कुंभार, शिवाजी पालवे, नागेश लोंढे, अनिल पिसे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नामदेव कुंभार यांनी केले.

**तालुका स्पर्धेची कामगिरी :**

**१४ वर्षांखालील** : दिया दिपक माने (१०० मीटर धावणे प्रथम, ४०० मीटर धावणे प्रथम, ४ बाय१०० मीटर रिले प्रथम). नंदिनी बाळासो इंदलकर (६०० मीटर धावणे प्रथम, ४ बाय १०० मीटर रिले प्रथम). वैष्णवी रविंद्र सुळे (४ बाय १०० मीटर रिले प्रथम, ८० मीटर अडथळा द्वितीय) २०० मीटर धावणे तृतीय). अपर्णा अमोल शिंदे (४बाय१०० मीटर रिले प्रथम)प्रेरणा जगन्नाथ शिंदे (४ बाय १०० मीटर रिले प्रथम). भावना भागवत रणदिवे (थाळी फेक प्रथम). सानिका महादेव साखरे (थाळी फेक द्वितीय). श्रद्धा सचिन मस्के (गोळा फेक द्वितीय)



**१७ वर्षांखालील** : रचना दादा लोखंडे (थाळी फेक प्रथम, १०० मिटर अडथळा, ४ बाय ४०० मीटर रिले प्रथम, ४ बाय १०० मीटर रिले द्वितीय). कामिनी अतुल यादव (४ बाय४०० मीटर रिले प्रथम, १००० मीटर धावणे द्वितीय, ४ बाय १०० मीटर रिले द्वितीय, ४०० मी. अडथळा प्रथम). श्रावणी सचिन मस्के (४ बाय ४०० मीटर रिले प्रथम ,४०० मीटर अडथळा द्वितीय, ४ बाय १०० मीटर रिले द्वितीय). श्रेया शंकर बंडलकर (४ बाय ४०० मीटर रिले प्रथम, ४ बाय १०० मीटर रिले द्वितीय). पूनम विनोद ओव्हाळ (४ बाय ४०० मीटर रिले प्रथम), ४ बाय १०० मीटर रिले द्वितीय). ज्ञानेश्वरी धनाजी शिंदे (थाळी फेक द्वितीय). पृथ्वी विजय तोरणे (भाला फेक द्वितीय), आकांक्षा कांतीलाल मारकड (३ कि.मी. चालणे प्रथम ). प्रज्ञा नवनाथ हेगडे (३ कि. मी. चालणे द्वितीय). प्रणाली शहिनाथ लोखंडे (भाला फेक तृतीय).

**१९ वर्षांखालील मुली** : वैष्णवी नानासो काळे (३००० मीटर धावणे प्रथम, क्रॉस कंट्री चौथा, ४ बाय १०० मीटर रिले द्वितीय). श्रावणी संतोष पाटोळे (३००० मीटर धावणे द्वितीय , क्रॉस कंट्री पाचवा). पार्वती दत्तात्रय खुडे (८०० मीटर धावणे प्रथम, क्रॉसकंट्री तृतीय, ४ बाय १०० मीटर रिले द्वितीय ,४ बाय ४०० रिले तृतीय). कल्याणी योगेश भालके (१०० मीटर अडथळा द्वितीय, क्रॉसकंट्री द्वितीय, ४ बाय १०० रीले द्वितीय, ४ बाय ४०० रिले तृतीय). राधिका सुधिर ओव्हाळ (२०० मीटर धावणे द्वितीय, क्रासकंट्री सहावा). श्रावणी शंकर काळे (क्रासकंट्री प्रथम, ४ बाय १०० रिले द्वितीय, ४ बाय ४०० मीटर रिले तृतीय). वृंदा भरत बागल ( ३ कि.मी. चालणे प्रथम). प्रतिक्षा महादेव लांडगे (३ कि.मी.चालणे द्वितीय). सोनाली दिपक शेंडगे (थाळी फेक द्वितीय). आकाशी संजय गौड ( भाला फेक) वैष्णवी नागेश कांबळे ( १०० मीटर धावणे तृतीय). मोनाली सिध्देश्वर इंगळे (भाला फेक तृतीय).

# खो-खो च्या १० आंतरराष्ट्रीय खेळाडूंना सात लाख रुपयांचे पारितोषिक जाहीर

## राज्य शासनाकडून प्रशिक्षकांनाही प्रत्येकी १.८७ लाख रुपये मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २७ सप्टेंबर-**

आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तसेच राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्र राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक म्हणून मंजूर करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. यात खो-खोतील १० आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश आहे. सुवर्णपदक विजेत्या या खेळाडूंना प्रत्येकी सात लाख व प्रशिक्षकांना १ लाख ८७ हजार ५०० रुपयाचे पारितोषिक मिळणार आहेत. पारितोषिक प्राप्त खेळाडू व प्रशिक्षकांचे महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांनी अभिनंदन केले.

**नेमबाजी, स्कॅश व दिव्यांग खेळाडूंचाही समावेश**

खोखो बरोबरच नेमबाजी व स्कॅश या खेळातील प्रत्येकी एक व दिव्यांगातील बॅडमिंटनच्या २ व ॲथलेटिक्समधील एक अशा ५ खेळाडूचा समावेश आहे. ते खेळाडू याप्रमाणे (कंसात खेळाडूंना व मार्गदर्शकांना मिळणारी रक्कम : नेमबाजी : रूद्रांक्ष बाळासाहेब पाटील (सुवर्ण, ठाणे, ३ लाख व ७५ हजार ), स्कॅश : उर्वशी जोशी (कास्य, ३ लाख व ७५ हजार). दिव्यांग खेळाडू : बॅडमिंटन : लताताई परमेश्वर उमरेकर (नांदेड, कांस्य, १ लाख व २५ हजार), सुकांत इंदूकांत कदम (पुणे, कांस्य१ लाख व २५ हजार), ॲथलेटिक्स : सचिन सर्जेराव खिलारी (सांगली, सुवर्णपदक ३ लाख व ७५ हजार).

**पारितोषिकप्राप्त खो-खो खेळाडू**

अरूण अशोक गुणकी (सांगली), अमित वरुण पाटील, अवधुत भरत पाटील. (दोघे कोल्हापूर), सुयश विश्वास गरगटे, अक्षय प्रशांत गणपुले (दोघे पुणे ) अनिकेत भगवान पोटे (मुंबई), अक्षय संदिप भांगरे ( मुंबई उपनगर), अपेक्षा अनिल सुतार (रत्नागिरी), गौरी राजेश शिंदे,निकीता चक्रधर पवार (दोघी धाराशिव).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### माजी आ. राजन पाटील यांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मोहोळ येथे राष्ट्रवादी काँग्रेसची जनसंवाद यात्रा यशस्वी करणाऱ्या मोहोळच्या माजी आमदार राजन पाटील यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर पाटील यांना आपल्या पक्षनिष्ठेचे फळ मिळाले. महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेच्या (राज्यमंत्री दर्जा) अध्यक्षपदी मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांची निवड करण्यात आली आहे. राज्याचे उपसचिव एपी शिंगाडे यांनी पाटील यांच्या निवडीचा अध्यादेश जारी केला आहे. अनगर अप्पर तहसीलच्या विरोधासाठी मोहोळ बंदचे आवाहन केलेले असतानाही या काळात माजी आमदार राजन पाटील यांनी राष्ट्रवादीच्या जनसंवाद यात्रेचे जोरदार स्वागत केले. या यात्रेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हजेरी लावली होती. ही यात्रा यशस्वीपणे पार पडल्यानंतर लगेच राजन पाटील यांना हे बक्षीस मिळाल्यामुळे मोहोळ तालुक्यात जल्लोष साजरा करण्यात येत आहे.





### ३२३ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

जश्ने ईद-ए-मिलादुन्नबी मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्त सर्व रोग निदान व डोळ्यांची मोफत तपासणी शिबीर आोजित जामे मस्जिद मुस्लिम जमात ट्रस्ट कुमठे यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडले. या शिबीरामध्ये डोळ्यांचे तपासणी करून मोफत शस्त्रक्रिया व मोफत चष्मा देण्यात आले. या शिबिरात जोहरा आय हॉस्पिटलचे डॉ. सलमान हैदर पटेल व डॉक्टर नोमान पटेल यांनी ३२३ रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले. याचे उद्घाटन आ. दिलीप माने व जयकुमार माने यांच्या हस्ते झाले. यावेळी जामा मस्जिद मुस्लिम ट्रस्ट अध्यक्ष हाजी रसूल शेख, हाफीज सलमान उस्ताद,बुद्दू हनीफ शेख, गुरुसिध कस्तुरे, अजित माने, सुभाष अवताडे, राजू मायनाळे, तानाजी सिनगारे,नबिलाल मुल्ला, हजरत शेख, इलाही शेख, हुसेन नदाफ, हाजी पिरसाब, हाजी जमीर, हसन शेख, ॲड. इक्बाल, सलीम शेख, सैपन तांबोळी, जावेद मंडप, सोहेल शेख, जाविद जमादार, गफुर पठाण, वसीम पठाण, असिफ शेख, फय्याज शेख, साकिब जमादार, काशिम टेलर, सत्तार शेख, सिकंदर शेख, इस्माईल शेख, नजीर शेख, महिबुब शेख, रशीद शेख आदी मान्यवर होते. प्रास्ताविक फिरोज शेख यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहील मुल्ला यांनी केले.

### 'मुख्यमंत्री योजनादूत' अर्ज करण्यास मुदतवाढ

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या योजनेला मिळणारा प्रतिसाद पाहता मुदतवाढ देण्यात आली असून आता इच्छुक उमेदवारांना ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर अर्ज करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत करण्यात आले आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे/प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. दि. ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. योजनादूत पोर्टलवर ज्या उमेदवारांनी नोंदणी केली आहे अशा उमेदवारांनी श्रि बटन दाबून अर्ज डीलाळीं करायला विसरू नये. तरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

# बापू, तुम्ही एवढं छान पर्यटन केलंय...

● दक्षिण मतदारसंघातील नागरिकांची प्रतिक्रिया

● पर्यटन परिसंवादात विकासकामांच्या मागण्या पूर्ण करण्याचा बापूंनी दिला शब्द

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

बापू, तुम्ही होटगी गावच्या या तलावाभोवती इतकं छान पर्यटन स्थळ उभारलं आहे...कधी आम्ही स्वप्नातही याची कल्पना केली नव्हती...इतकं सुंदर पर्यटन...या चिल्लारीच्या झाडीत उभं केल्यानं आम्हाला तुमच्या कर्तत्वाचा स्वाभीमान वाटतो...आम्ही घंटाभर या परिसरात फिरलो अन् फोटोज्, सेल्फीचा आनंद लुटला... पायही मोकळे केले...निसर्गरम्य वातावरणात फिरल्याने तितकेच आल्हाददायक वाटले...आता बापू, या पर्यटनाभोवती छोट्या मुलांना चौपाटी अन् जेष्ठ नागरिकांना आपला आनंद द्विगुणीत करण्यासाठी या निसर्गरम्य परिसरात विविध शिबिरं घ्यावीत, अशी हक्काची साद या मतदारसंघातील नागरिकांनी केली. यावेळी आ. सुभाष देशमुखांनी तुम्हा सर्वांची अपेक्षा पूर्ण करतो, असा शब्दही दिला.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी येथील साईबाबा मंदिराजवळील तलावाचे मोकळे क्षेत्र आ. सुभाष देशमुखांनी काही वर्षांपूर्वी पाहिले आणि या ठिकाणी गावकरी आणि शासकीय यंत्रणांच्या सहकार्यातून निसर्गाचा पुरेपूर फायदा घेत सुंदर असे पर्यटन स्थळ निर्माण केले आहे. आज (दि. २७) पर्यटन दिन असल्याने या मतदारसंघातील काही नागरिकांना आणि मिडीया, सोलापूर शहरातील विविध पक्षीय नेत्यांना पर्यटन दिनानिमित्त परिसंवाद कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवतण दिले. प्रारंभी आमदार सुभाष देशमुख यांनी सर्वांचे मनोगत जाणून घेतले. यावेळी या होटगीच्या वन डे पर्यटनस्थळी बापूंनी केलेल्या विकासकामांचे सर्वांनी तोंडभरून कौतुक केले आणि यातील अनेक सुधारणा सुचविल्या. इतकेच नव्हेतर या ठिकाणी चौपाटी, रात्रीची विद्युत रोषणाई, काही बेरोजगार युवकांना काम कसे मिळेल आदी विविध विषयांवर परिसंवाद चांगलाच रंगला. या सर्वांच्या भावना समजल्यावर आ. देशमुख यांनी आपल्या पॅटर्नमध्ये वनविहाराचे महत्व उपस्थितांना समजावून सांगितले. त्यांनी शहराभोवतीच्या अडचणीच्या ठिकाणी असलेल्या जागांचे कसे नंदनवन केले याचीही सविस्तर माहिती दिली. तर आता मतदारसंघातील सर्व नागरिकांनी या मतदारसंघातील विविध ठिकाणी उभारलेल्या अशा ६ पर्यटन स्थळी जावून निसर्गाचा आनंद लुटावा आणि आपल्या भोवती निर्माण केलेले हे वैभव टिकविण्यासाठी मतदारसंघातील बांधवांनी सहभाग दर्शवावा, वृक्षवेलींची जपणूक करावी, अशी अपेक्षाही आ. देशमुख यांनी व्यक्त केली.

तर या पर्यटनातून समृध्द गाव करण्यासाठी रोजगार निर्मितीही करणार असल्याची आ. देशमुख यांनी शेवटी ग्वाही दिली. या छोटेखानी आयोजित कार्यक्रमाच्या विचारमंचावर साई मंदिर विश्वस्त कवी सागर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी, विशाल गायकवाड, अतुल गायकवाड, हनमंत कुलकर्णी, राम काका जाधव, आनंद बिराजदार, अंबिका पाटील, नीलिमा गायकवाड, जगन्नाथ गायकवाड शितोळे, वृषाली पवार अतुल आदींची उपस्थिती होती.






**● पर्यटनाची कनसेप्टही आता बदलली**

दळणवळणाच्या अनेक सुविधा निर्माण झाल्यामुळे पर्यटन करणे आता सोपे झोले आहे. आधी फक्त धार्मिक पर्यटनाला महत्व होते. आता पर्यटनांची कनसेप्टही बदलत आहे. यात कृषिपर्यटन, निसर्ग पर्यटन अशा विविध संकल्पना पुढे येत आहे. आ. सुभाष देशमुख यांच्याकडे उद्योग व्यवसायाच्या अनेक संकल्पना आहेत. पर्यटनाच्या माध्यमातून छोटे छोटे उद्योग उभारून बेरोजगारीवर मात करता येवू शकते हे लक्षात घेत बापूंनी आपल्या मतदारसंघात ६ पर्यटन केंद्रं विकसित केली आहेत. यामध्ये धर्मवीर संभाजी तलाव, सिद्धेश्वर वन विहार, वडकबाळचं श्री कट्यावादेवी मंदिर परिसर, नांदणीचे वन उद्यान, हत्तरसंग कुडल- भीमा-सीना नदीच्या संगमावर कर्नाटक सीमेवर वसलेले निसर्गरम्य हत्तरसंगकुडल आणि होटगी तलाव, साईमंदिर व होटगी तलावाजवळ निसर्गरम्य परिसरात आ. सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नातून पर्यटन केंद्र लवकरच साकारत आहे. २४ हजार ६४५ चौ.मी. क्षेत्रफळात हे भव्य प्रादेशिक पर्यटन केंद्र साकारत असून पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे.

**● होटगीच्या सौंदर्यातही पडली भर**

होटगी तलावाभोवती साकारलेल्या या पर्यटन स्थळामध्ये निसर्गाचा पुरेपूर वापर केला आहे. वृक्षांच्या लागवडीने पर्यावरणाचे रक्षण, स्थानिकांना रोजगार उपलब्ध, होटगी गावच्या सौंदर्यातही भर पडणार आहे. ग्रीन आयलँड प्रवेशद्वार, नक्षीदार बाग, नाना नानी पार्क, डव्हेंचर पार्क, गुलाब बाग, बांबू बाग, सुगंधी फुलांची बाग, औषधी वनस्पती वन, कमळ तळे, नक्षत्र वन, राशी वन, रॉक वॉटरफॉल, बोटींग स्टेशन, खुले म्फी थिएटर, गॅ हजयेबो, फूड प्लाझा प्रादेशिक पर्यटन केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. हे सर्व पाहू उपस्थितांनी समाधान व्यक्त केले आणि या ठिकाणी नेहमी येवून आम्ही पर्यटनाचा आनंद लुटू अशी ग्वाहीही दिली.

**● १००८ झाडांचे केले वृक्षारोपण**

यावेळी उद्योजक राम रेड्डी, कुलगुरू प्रकाश महानवर, व्यंकटेश नेतन, निलेश शहा, अभय दिवाणजी, सिध्देश्वर सर्जे, संजय थोरात, प्रल्हाद कांबळे आदिंसह आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते १००८ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

**● व्यावसायिक दृष्टीकोनातून शेतीकडे वळा**

शेतकरी बांधवांनी कृषी पर्यटनासाठी पुढाकार घ्यावा. शेतीमध्ये हुरडा निर्मितीस महत्व देऊन हुरडयाबरोबर शेतीत इतर आकर्षक गोष्टींचा विकास करावा. पर्यटकांच्या आवडीनिवडीनुसार रोजगार केल्यास आर्थिक स्वावलंबन होते. म्हणून शेतकऱ्यांनी व्यावसायिक दृष्टीकोनातून शेतीकडे पाहण्याचे आवाहन देशमुख यांनी केले.

## ठोकळ प्रशालेत गुड टच बॅड टचवर कार्यशाळा

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**



वाढती गुन्हेगारी व आसपास होणारे अत्याचाराच्या घटना यामुळे कोणत्या व्यक्तीवर विश्वास ठेवावा असा प्रश्न आज उपस्थित झालेला आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः चीं काळजी घेतली पाहिजे आणि अशा व्यक्ती पासून सावध राहिले पाहीजे यासाठी इंदिरा ज्ञानवर्धिनी संचलित श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेत गुड टच बॅड टच या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून उदयसिंग साळुंके तेजस्विनी खराटे यांची उपस्थिती होती.

साळुंके यांनी विद्यार्थी -विद्यार्थिनींना आपल्या शरीराचे कोणते भाग/अंग हे संवेदनशील आहेत खाजगी आहेत याची माहिती दिली तसेच कोणी अनोळखी अथवा ओळखीतील व्यक्ती स्पर्श करण्याचा प्रयत्न करीत असल्यास त्यास विरोध करणे व तशी कल्पना आपल्या आई वडिलांना देण्याची सूचना त्यांनी विद्यार्थ्यांना केली. तसेच काही वेळेस अनोळखी व्यक्ती जवळची असल्याची भासवून मुला-मुलींना काही खाण्याच्या वस्तू देत असल्यास ते न घेण्याचा सल्लाही यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. बाललैंगिक अत्याचार विरुद्ध अस्तित्वात असलेला पोस्को कायदा तसेच लहान मुलांसाठी असणारी चाईल्ड लाईन (१०९८)या कायदा व संस्था व त्यांचे कार्य याविषयीं माहिती दिली. एकंदरीत आपली सुरक्षितता ही आपल्या हाती आहे याची जाणीव त्यांनी विद्यार्थ्यांना करून दिली. उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य श्री डी. डी. गाजरे यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमाबद्दल संस्थापक अध्यक्षा निर्मलाताई ठोकळ, संस्थेचे अध्यक्ष विपिन ठोकळ, उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, संचालिका शिल्पा ठोकळ यांनी कौतुक केले. सूत्रसंचालन पी. एच. चव्हाण यांनी केले.

## जलजीवनच्या १५० कामांना मुदतवाढ

● झेडपी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची जिल्ह्यात १००९ कामे सुरु

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा वतीने जिल्ह्यात १००९ जलजीवनची कामे सुरू आहेत. त्यातील ४०० पेक्षा जास्त कामांची मुदत संपली आहेत. त्यामुळे ती कामे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे मुदतवाढीसाठी आली आहेत. त्यातील जवळपास १५० कामांना मुदतवाढ दिली आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून मुदतवाढीच्या कामांना तत्काळ मंजुरी देण्यात येत आहे.

जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या अनेक काम ांची मुदत संपली आहे. त्या कामांना मुदतवाढ घेतल्याशिवाय बिले न काढण्याचा निर्णय तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी घेतला होता. त्यामुळे काम ांची मुदत संपलेल्या ठेकेदारांनी जिल्हा परिषदेकडे तत्काळ मुदतवाढीसाठी प्रस्ताव पाठविले आहेत. आलेल्या प्रस्तावांना तातडीने मंजुरी मिळावी, यासाठी ग्रामीण पाणीपुरवठ्याचे कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी प्रयत्न करत आहेत. आतापर्यंत १५० पेक्षा जास्त कामांच्या प्रस्तावांना मुदतवाढ दिली आहे.

**● कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे**

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठ्याचे कार्यकारी अभियंता धनशेट्टी यांनी जलजीवन मिशनची किती कामे मुदतवाढीसाठी आली आहेत, याविषयी कर्मचाऱ्यांना माहिती देण्यासाठी सांगितले होते. त्यावेळी त्यांच्याच विभागातील कर्मचाऱ्यांनी आमच्याकडे माहिती उपलब्ध नाही, असे सांगत उडवाउडवीची उत्तरी दिली आहेत. त्यामुळे धनशेट्टी यांचा कर्मचाऱ्यांवर वचक नसल्याची चर्चा जिल्हा परिषदेत होत आहे.

**● शंभरपेक्षा जास्त कामे अर्धवट**

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या तत्कालीन कार्यकारी अभियंत्यांनी क्षमता नसणाऱ्या जिल्ह्यातील बऱ्याच ठेकेदारांना जलजीवनची कामे दिली आहेत. त्यांनी निधी मिळत नसल्याने कामे बंद ठेवली आहेत. जिल्ह्यातील शंभरपेक्षा जास्त कामे अर्धवट आहेत. ती कामे पूर्ण करण्यास ठेकेदारांकडून टाळाटाळ होत आहे. त्यामुळे ती कामे कधी सुरू होणार, असा प्रश्न सरपंच विचारत आहेत.



## वालचंदमधील तीन विद्यार्थ्यांना लॅपटॉपचे पारितोषिक

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

आंतरमहाविद्यालयीन कोड-ए-थॉन स्पर्धेत वालचंद शिक्षण समूहातील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजीचे दोन विद्यार्थी आणि हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सचा एक विद्यार्थी असे एकूण तीन विजेत्या विद्यार्थ्यांना लॅपटॉपचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

'ईश्वर फाउंडेशन' आणि 'सावली फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कोड-ए-थॉन स्पर्धेचे उद्घाटन प्रभारी प्राचार्य डॉ. एम. एल. आर. जे. लोबो, व्हीव्हीपीआयटीचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड, आणि ईश्वर फाउंडेशनचे अध्यक्ष श्रीहरी कुरापाटी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. या स्पर्धेत विविध २२ महाविद्यालयातील ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेची यशस्विता साधण्यासाठी ईश्वर आणि सावली फाउंडेशनच्या सोमराज अवधूत, रात्नशील शिवशरण, श्रावणी येरगुंटला आणि त्यांच्या संघाने मेहनत घेतली. वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त, प्राचार्य डॉ. विजय आठवले, समन्वयक डॉ. रोहिणी मेरगु आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**विजेते विद्यार्थी (प्रथम तीन)**

▸ प्रियांका सुंदाळम (डब्ल्युआयटी, सीएसई अंतिम वर्ष), ▸ प्रियांका अंधेली (एचएनसीसी, बीसीए तृतीय वर्ष), ▸ सौबान शेख (डब्ल्युआयटी, सीएसई तृतीय वर्ष)

## मौलाना आझाद पॉलिटेक्निकमध्ये महिला सुरक्षाविषयी जनजागृती

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**




मौलाना आझाद पॉलिटेक्निक संस्थेमध्ये महिला तक्रार निवारण समिती यांच्यामार्फत महिला सुरक्षा विषयी जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

वळसंग पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल सनगल्ले व पोलिस हवालदार अशोक पाटील यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. प्राचार्य शेख एस.एन यांनी त्यांचे स्वागत केले. अनिल सनगल्ले यांनी महिला, तरुणी, विद्यार्थिनी यांची सार्वजनिक ठिकाणी होणारी छेडछाड, विविध समस्या, मंगळसूत्र हिसकावणे, शाळा, महाविद्यालय ठिकाणी तरुणांकडून होणारा त्रास कमी व्हावा, महिलांना सुरक्षित वाटावे यासाठी महिला मार्शल पथक 'दामिनी' सुरू झाले आहे. आता महिलांनी एक पाऊल पुढे टाकत आपल्या शाळा, महाविद्यालय, खासगी शिकवणी, सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठा, सोसायट्या, कॉलन्यांमध्ये समस्या असल्यास माहिती देण्याची जबाबदारी आहे, तरच अप्रिय घटनांना आळा बसेल. प्राचार्य शेख यांनी महिला सुरक्षा जनजागृतीपर माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिल गंवडी व नदाफ दवालमा यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला तक्रार निवारण समितीचे समन्वयक आस्मा तांबोळी, आरती काळे, हिना शेख यांनी परिश्रम घेतले.

## उपमुख्य कार्यकारी अधिकारी शेळकंदे यांची बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ सप्टेंबर -**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात तीन वर्ष सेवा झालेले जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे यांच्यासह जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेल्या पाच गटविकास अधिकाऱ्यांच्या ग्रामविकास विभागाने बदल्या केल्या आहेत. यात मोहोळ, उत्तर सोलापूर, करमाळा, सांगोला व दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांचा समावेश आहे.



विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधिन शेळकंदे यांचा सोलापूर जिल्ह्यात तीन वर्षे कार्यकाल पूर्ण झाल्यामुळे त्यांची दर्यापूर (जि. अमरावती) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे. दक्षिण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांची पदोनतीने लातूर जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली केली आहे. त्यांच्या जागी सातारा ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे यांची नियुक्ती केली आहे.

मोहोळ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आनंद मिरगणे यांची धाराशिवच्या रोजगार हमी योजनेच्या उपजिल्हा कार्यक्रम समन्वयकपदी बदली झाली असून त्यांच्या जागी अंबड (जि. जालना) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व्ही. व्ही. जमदाडे यांची नियुक्ती केली आहे. उत्तर सोलापूर तालुक्याच्या गटविकास अधिकारी जस्मिन शेख यांची खटाव (जि. सातारा) पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. करमाळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मनोज राऊत यांची धाराशिवच्या जल जीवन मिशन प्रकल्प संचालकपदी बदली झाली असून त्यांच्या जागी घनसांगवी (जि. जालना) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ए. टी. कदम यांची नियुक्ती केली आहे. सांगोला पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ए. आर. लोकरे पो यांची जत (जि. सांगली) पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कि म्हणून बदली करण्यात आली आहे.

# मुख्याध्यापकांनो सावधान; अन्यथा कारवाई


● थकीत देयके पाठविण्याच्या सूचना

● शिक्षण संचालकांचे माध्यमिक, प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र

**तभा, वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ सप्टेंबर-**

शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची थकीत देयके येत्या दहा दिवसांत पाठवावीत; अन्यथा कर्मचाऱ्यांच्या आर्थिक नुकसानीस मुख्याध्यापकांना जबाबदार धरून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पत्र शिक्षण संचालकांनी माध्यमिक, प्राथमिकचे शिक्षणाधिकाऱ्यांना काढले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक व प्राथमिक शाळांतील कर्मचाऱ्यांची थकीत देयके ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यासाठी २५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदत होती. मात्र, शालार्थ प्रणाली वारंवार बंद राहत असल्याने देयके सादर करण्यासाठी ५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्या मुदतीमध्ये मुख्याध्यापकांनी सर्व देयके पाठवावीत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. थकीत देयके वेळेत न दिल्याने शिक्षकांचे आर्थिक नुकसान होत आहे. याबाबत प्रशासनाने प्रशासनाने माध्यमिक व प्राथमिकच्या शिक्षणाधिकाऱ्यांना थकीत देयके देण्याबाबत पत्र काढले आहे. जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकारची देयके वेतन पथक प्राथमिक, माध्यमिक यांच्याकडून मंजूर करून घ्यावे लागते. यामध्ये वैद्यकीय देयके, न्यायालयीन प्रकरणाची देयके, विविध प्रकारच्या वेतनश्रेणीमध्ये बदल झाल्यामुळे मिळणारी फरक देयके यांचा समावेश आहे. यासाठी मुख्याध्यापकांमार्फत वेतन पथकाकडे देयके सादर करण्यात येतात.




**● थकीत देयकांपासून अनेक कर्मचारी वंचित**

शालार्थ प्रणालीमध्ये थकीत देयके ऑनलाईन सादर करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. देयके ऑनलाईन सादर करून वेतन पथकाकडून मंजूर करून घ्यावे लागते. आर्थिक वर्ष २०२२-२३ व त्या अगोदरची थकीत देयके अद्यापही अनेक कर्मचाऱ्यांना मिळालेली नाहीत. यासाठी मुख्याध्यापक व वेतन पथक यांच्याकडे वारंवार मागणी होत आहे.

**● या शिक्षकांचे थकले वेतन**

सन २०२२ मधील आंतरजिल्हा बदलीने जिल्हा परिषदेकडे हजर झालेल्या २९ उपशिक्षकांचे थकीत वेतन अद्यापही मिळालेले नाही. त्या शिक्षकांना मुदतवाढीमध्ये थकीत वेतन मिळण्याची अपेक्षा शिक्षकांतून व्यक्त केली जात आहे. आंतरजिल्हा बदलीने हजर झालेले शिक्षकांना सप्टेंबर २०२२ पासून २०२४ पर्यंत विविध तारखांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.

थकीत देयकांसाठी मिळालेल्या मुदतवाढीमध्ये कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही, याची दक्षता शाळाप्रमुखांनी घ्यायची आहे. देयकांबाबत अनेक कर्मचाऱ्यांच्या तक्रारी संघटनेकडे प्राप्त आहेत. मुदतीनंतर कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्यास शासन निर्णयाप्रमाणे शाळाप्रमुखांवर कारवाई करण्यात यावी. जाणीवपूर्वक कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान करणाऱ्या शाळाप्रमुखांवर कारवाई करण्यासाठी संघटनेकडून पाठपुरावा करण्यात येईल.

**-विजयकुमार गुंड,** जिल्हा प्रवक्ता, शिक्षक पारती, सोलापूर

# रेल्वे लाईन, जुना एम्प्लॉयमेंट चौक परिसरातील अतिक्रमण मनपाने काढले!

## ● चारचाकी हात गाडी, तीन लोखंडी टपरीसह इतर साहित्य जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील रेल्वे लाईन जुना एम्प्लॉयमेंट चौक आणि महापालिका कंपाउंड लगतचे अतिक्रमण काढण्यात आले. यावेळी रस्त्यावरील चार चाकी हात गाडी, तीन लोखंडी टपरी सह इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रहदारीस अडथळा ठरणारे तसेच फुटपाथवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गतच आज डॉ. आंबेडकर चौक येथील महापालिका कंपाउंड लगत असलेले अतिक्रमण काढण्यात आले. त्यांनतर रेल्वे लाईन जुना एम्प्लॉयमेंट चौक येथील हायस्कूल समोरील अतिक्रमण हटविण्यात आले. या कारवाईत एक चारचाकी हात गाडी, तीन लोखंडी टपऱ्या, सात वजन काटे , २ प्लास्टिक टेबल, एक लोखंडी छत्री व इतर साहित्य जप्त करण्यात आले. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.



# जखमी रिक्षाचालकाचा उपचारावेळी मृत्यू

## ● बहिणीच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याच्या रागामुळे चाकूने केला वार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

बहिणीच्या मृत्यूला कारणीभूत असल्याचा राग मनात धरून जीवाभावाचा मित्र असलेल्या रिक्षाचालकावर चाकूने वार करून त्यास गंभीर जखमी करण्यात आले. त्या जखमी रिक्षाचालकाचा शुक्रवारी उपचारावेळी मृत्यू झाल्याने याबाबत एम आयडीसी पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणाच्या गुन्ह्यात खूनाचे कलम वाढविण्यात आले.



बाबूलाल जब्बार शेख (वय २५, रा. मसरे वस्ती, मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) असे मरण पावलेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. याबाबत मयत बाबूलाल शेख याची आई हसिनाबी जब्बार शेख (वय ५५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन २३ सप्टेंबर रोजी एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात पोलिसांनी सज्जाद सय्यद (रा. नई जिंदगी, सोलापूर) यास अटक केली असून तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

बाबूलाल शेख व सज्जाद सय्यद हे दोघे जीवाभावाचे मित्र होते. दोघांचेही एकमेकांच्या घरी येणे-जाणे असल्याने त्यातून बाबूलाल याचे सज्जाद याच्या बहिणीशी अनैतिक संबंध निर्माण झाले. सज्जाद याच्या बहिणीचे गेल्या काही दिवसापूर्वी निधन झाले आहे. बहिणीशी असलेले संबंधदेखील सज्जाद यास माहिती झाले. त्यामुळे आपल्या बहिणीच्या मृत्यूला बाबूलाल हाच कारणीभूत असल्याचा राग सज्जाद याच्या डोक्यात होता. त्यातूनच २३ सप्टेंबर रोजी दुपारी बाबूलाल शेख हा नई जिंदगी परिसरात रिक्षा चालविण्यासाठी गेल्यानंतर सज्जाद सय्यद याने चंद्रकला नगरात बाबूलाल शेख याच्या अंगावर तसेच डोक्यावर चाकूने वार करून त्यास गंभीर जखमी केले. त्यामुळे जखमी बाबूलाल यास शासकीय रुग्णालयात दाखल करून पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान, याबाबत जमखी बाबूलाल याची आई हसिनाबी शेख यांच्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात पोलिसांनी सज्जाद सय्यद यास अटक केली. न्यायालयाने सय्यद यास न्यायालयीन कोठडी सुनावली. दरम्यान, शुक्रवारी खासगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या जखमी बाबूलाल शेख याचा उपचार सुरु असताना मृत्यू झाला. त्यामुळे पोलिसांनी या खूनाचा प्रयत्नप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात खूनाचे कलम वाढविले. सहायक पोलिस निरीक्षक भारत चंदनशिवे पुढील तपास करीत आहेत.

# नागरिकांनीही पर्यावरण संवर्धनासाठी कृतिशील झाले पाहिजे

● ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक बी. एस. कुलकर्णी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

पर्यावरण संवर्धनासाठी महापालिका प्रशासन आणि शासन पातळीवर वेगवेगळे प्रयत्न होत आहेत.आता सर्व नागरिकांनीही पर्यावरण संवर्धनासाठी कृतिशील झाले पाहिजे, असे आवाहन ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक बी.एस. कुलकर्णी यांनी केले.

माझी वसुंधरा अभियान अंतर्गत राज्यात प्रथमच सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पहिले वसुंधरा संमेलन शुक्रवारी उत्साहात पार पडले. ज्येष्ठ पर्यावरण अभ्यासक बी.एस. कुलकर्णी यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून या संमेलनाचे उद्घाटन झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले होत्या. या प्रसंगी उपायुक्त तैमूर मुलाणी, उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखापरीक्षक रुपाली कोळी, नगररचना सहसंचालक मनीष भिष्णुरकर, सर्पतज्ञ नीलमकुमार खैरे, वनरक्षक रमेश खरमाळे, जल अभ्यासक रजनीश जोशी, अर्चना मोरे, गार्गी गीध, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, सहाय्यक आयुक्त अर्जुन सुरवसे, सहाय्यक आयुक्त मनीषा मगर आदी मान्यवर उपस्थित होते. पहिल्या सत्रात सोलापुरात पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या विविध संस्थांचा सन्मान करण्यात आला. आयुक्त तेली-उगले म्हणाल्या, महापालिकेच्या वतीने पर्यावरण संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. धर्मवीर संभाजी महाराज तलाव प्रदूषण मुक्त करण्यात आला आहे. पहिल्या सत्रामध्ये ज्येष्ठ सर्पतज्ञ नीलीमकुमार खैरे यांनी सापांविषयीच्या रंजक गोष्टी अतिशय सुंदर पद्धतीने सांगितल्या. जुन्नर वनविभागातील वनरक्षक, पर्यावरण अभ्यासक रमेश खरमाळे यांनी पर्यावरण संवर्धनातील माझा सहभाग या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान दिले. मिशन शून्य कचरा या विषयावर पुण्याच्या मिशन शुन्य कचरा अभियानाच्या प्रमुख अर्चना मोरे यांनी संवाद साधला. त्यानंतर ग्रीन फाउंडेशन मुंबई येथील गार्गी गीध यांनी विघटनशील प्लास्टिक या विषयावर मार्गदर्शन केले. महापालिकेचे उपायुक्त तैमुर मुलाणी यांनी प्रास्ताविक केले. अश्विनी मोरे- वाघमोडे यांनी सूत्रसंचालन केले. सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील यांनी आभार मानले.



### शहरात चारही भागात स्मृतीवन करण्याची गरज

बी.एस. कुलकर्णी म्हणाले, धर्मवीर संभाजी महाराज तलाव हे सोलापूरचे फुफुस आहे. हा तलाव प्रदूषणमुक्त राहण्यासाठी महापालिका प्रशासन विभागाने सातत्याने पाठपुरावा केला. प्रशासनाकडून आता विविध उपायोजना केल्या जात आहेत. ही चांगली बाब आहे. सोलापुरात या ठिकाणी जसे स्मृतीवन आहे त्याचप्रमाणे शहरात चारही भागात स्मृतीवन करण्याची गरज आहे. रोपवाटपाचा कार्यक्रम प्रत्येक शाळेत घेतला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### जलाशय प्रदूषणमुक्त व्हायला हवेत : जोशी

आपल्या आयुष्यामध्ये पाण्याला खूप महत्त्व आहे. त्यामुळे पाणी जपून वापरायला हवे. नद्या आणि इतर जलाशय प्रदूषण मुक्त व्हायला हवीत. यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत असे आवाहन करताना ज्येष्ठ जलतज्ञ रजनीश जोशी यांनी पाण्याचे महत्त्व पटवून दिले.

# पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे रविवारी सोलापुरात अधिवेशन

## ● विविध मागण्यांचे करण्यात येणार ठराव : कोठे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे रविवार दि. २९ सप्टेंबर रोजी सोलापुरात अधिवेशन आयोजित केले आहे, अशी माहिती पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष महेश कोठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हे अधिवेशन रविवारी सकाळी ८:३० ते सायंकाळी ६ या वेळेत अक्कलकोट रोड गांधीनगरनजीकच्या मार्कंडेय शॉपिंग सेंटर येथील बोमड्याल मंगल कार्यालयात होणार आहे. दोन सत्रात हा कार्यक्रम होणार आहे. सकाळी ८:३० वाजता ध्वजारोहणाने अधिवेशनाची सुरुवात होणार आहे. सकाळी ९ वाजता माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते व खा. प्रणिती शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी अखिल भारतीय पद्मशाली संघाचे गौरव अध्यक्ष श्रीधर सुंकरवार, अध्यक्ष कंदागटला स्वामी, जालन्याचे आमदार कैलास गोरंट्याल, माजी आ. नरसय्या आडम, ज्येष्ठ सहकार नेते सत्यनारायण बोल्ली, आयएएस अधिकारी पी. नरहरी, तेलंगणाचे माजी आ. अनिल इरावश्री, अखिल भारतीय पद्मशाली संघाचे उपाध्यक्ष प्रल्हाद सुरकुटवार, राम कृष्ण कोंड्याल, महासचिव गड्डम जगन्नाथ, कोषाध्यक्ष कोक्कुला देवेंद्र, महासचिव वनम विश्वनाथ, अ. भा. पद्मशाली संघ महिला विभागाच्या अध्यक्षा वनम दुष्यंतला, अ.भा.पद्मशाली युवजन संघाचे अध्यक्ष प्रथमेश कोठे, अ.भा.पद्मशाली संघ राजकीय विभागाचे अध्यक्ष बोला शिवशंकर, अखिल भारतीय पद्मशाली संघाचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य लक्ष्मीकांत गोणे, सामाजिक व वैवाहिक विभागाचे अध्यक्ष सतीश राखेवार, महासचिव अशोक श्रीमनवार, अ. भा. पद्मशाली संघाचे सचिव व्यंकटेश जिंदम, महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष भूपती कमटम तसेच प्रसिद्ध तेलुगू कलावंत वैभव सूर्या व मराठी सिनेसृष्टीत काम करणाऱ्या पद्मशाली समाजाच्या अभिनेत्री बी.अन्नपूर्णा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.



या अधिवेशनास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष महेश कोठे तसेच पद्मशाली ज्ञाती संस्था सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली युवजन संघ, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली महिला संघ, पद्मशाली शिक्षण संस्था सोलापूर, पद्मशाली युवक संघटना सोलापूर यांच्यावतीने करण्यात आले आहे. सोलापूरच्या पूर्व भागाचे गतवैभव मिळवून देण्याचा निर्धारही या अधिवेशनात करण्यात येणार आहे, असेही महेश कोठे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस माजी आ. नरसय्या आडम, पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे सरचिटणीस दयानंद मामड्याल, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, विश्वस्त मुरलीधर अरकाल, महांकाळ येलदी, अंबादास बिंगी, अशोक इंदापुरे, प्रथमेश कोठे आदी उपस्थित होते.

### मार्कंडेय आर्थिक विकास महामंडळाची मुख्य मागणी

या अधिवेशनात विविध मागण्यांचे ठराव करण्यात येणार आहेत.महाराष्ट्रातील पद्मशाली समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारने महर्षी मार्कंडेय यांच्या नावाने आर्थिक महामंडळ स्थापन करावे व याकरिता ५०० कोटींची तरतूद करावी या मुख्य मागणीचा ठराव या अधिवेशनात करण्यात येणार आहे. विडी व यंत्रमाग उद्योग अडचणीत असल्याने या उद्योगांना शासनाच्या योजनांचा लाभ देऊन उर्जितावस्था देणे, सध्या काम नसलेल्या रेडिमेड-गारमेंट कामगारांना रोजगार मिळवून देणे, सुशिक्षित-उच्चशिक्षित तरुणांना रोजगाराअभावी सोलापूर सोडून परगावी जावे लागत आहेत, अशांसाठी सोलापुरात नवीन उद्योगधंद्यांची निर्मिती करून स्थलांतर रोखणे, पूर्व भागातील बंद पडलेल्या बँकांना पुनरुज्जीवित करणे यासह विविध समस्यांवर मंथन करून उपाय शोधण्यात येणार आहे.

# राजन पाटलांची निवड म्हणजे सहकाराची चेष्टा : उमेश पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २७ सप्टेंबर-**

गोरगरीब शेतकऱ्यांनी कष्टाच्या घामाच्या पैशातून उभा केलेला लोकनेते सहकारी साखर कारखाना स्वतःची प्रॉपर्टी समजून हडप करणाऱ्या व्यक्तीलाच राज्य सहकार परिषदेचा अध्यक्ष करणे म्हणजे सहकार चळवळीची चेष्टा केल्यासारखी आहे, असा घणाघाती आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चे राज्याचे मुख्य प्रवक्ते उमेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला.



मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांची महाराष्ट्र राज्य शासनाने राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी केल्यानंतर ते बोलत होते. उमेश पाटील म्हणाले की, राजन पाटील यांना सहकार बुडविण्याचा अनुभव आहे. ते डीसीसी बँकेचे अध्यक्ष असताना त्यांनी योग्य तारण न घेता ज्यांना कर्ज दिले ते कर्ज न भरणारे निघाले. सहकार परिषदेचा उद्देश राज्यातील सहकारी संस्थाच्या अडीअडचणी सोडवणे, सहकारी संस्थांचे बळकटीकरण करणे, सहकारी संस्थांचा समन्वय साधणे त्यांना कार्पोरेट संस्थांच्या बरोबरीने आणणे हा उद्देश आहे. परंतु सहकारी संस्था, खासगी आणि व्यक्तिगत प्रॉपर्टी कशी करायची याचेच मार्गदर्शन राजन पाटील यांच्याकडून राज्यातील सहकार संस्थांना अपेक्षित आहे का? असा उपरोधिक सवाल उमेश पाटील यांनी केला. पक्षात माझे ऐकलं जात नाही हे खरे आणि दुर्दैवी बाब आहे. पण मी मोहोळ तालुक्याच्या जनतेसोबत आहे आणि राजन पाटील स्वतः तीनवेळा आणि राखीव जागेवर तीनवेळा त्यांनी दिलेला उमेदवार विजयी झाला. त्यामुळे पक्षाला असे वाटत असेल की राजन पाटील हेच जास्त प्रभावी आहेत, असाही टोला उमेश पाटलांनी लगावला.

# चंद्रिका चव्हाण यांचे व्याख्यान

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

देशांतर्गत व देशाबाहेर अनेक समस्या उभ्या असताना विद्यार्थ्यांनी स्वतावर नियंत्रण ठेवत, स्व अस्मिता जागृत करून पुढे वाटचाल करावी, असे मत हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात ज्येष्ठ समाजसेविका चंद्रिका चव्हाण यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर कला शाखेचे पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप फुटाणे उपस्थित होते. चंद्रिका चव्हाण पुढे म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी निवडलेल्या क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन काम करत राहावे. आपल्या आयुष्यात येणाऱ्या समस्यांवर मात करून पुढे चालत जाणारेच इतिहास घडवू शकतात. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर वेळ वाया न घालविता, आपले चारित्र्य अबाधित ठेवून कार्य करावे.

# हरिभाई महाविद्यालयात ६ ऑक्टोबरला वक्तृत्व स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे संचलित सोलापुरातील हरिभाई देवकरण प्रशालेशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयाचे यंदाचे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्याने वर्षभरातील नियोजित अनेक उपक्रम व स्पर्धांअंतर्गत जिल्हास्तरीय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा रविवार दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता मुळे सभागृह, हरिभाई देवकरण कनिष्ठ महाविद्यालय येथे घेण्यात येणार आहेत.

या स्पर्धा शालेय गट (इयत्ता नववी व दहावी) व कनिष्ठ महाविद्यालयीन गटात घेण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी वक्तृत्व स्पर्धेच्या शालेय गटात माझ्या स्वप्नातील भारत, पुढील युद्ध पाण्यासाठी!, आदर्श विद्यार्थी असा असावा..! तर कनिष्ठ महाविद्यालयीन गटासाठी सोशल मीडियाच्या विळख्यात तरुणाई, शिक्षणातून वाढत चाललेली बेरोजगारी, पुन्हा बदलापूर नको...! असे विषय आहे. वादविवाद स्पर्धेसाठी शालेय गटात गुरुजींच्या हाती छडी द्यावी का? आणि कनिष्ठ महाविद्यालय गटासाठी चित्रपटांमुळे तरुण बिघडत आहे का? असे विषय आहेत. शालेय गटासाठी पाच मिनिटे तर कनिष्ठ महाविद्यालय गटासाठी सात मिनिटांचा वेळ वक्तृत्व स्पर्धेत देण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी दोन हजार , पंधराशे व अकराशे रुपये याप्रमाणे प्रत्येक गटात अनुक्रमे प्रथम , द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके व प्रशस्तीपत्रके देण्यात येणार आहेत. सहभागी प्रत्येक स्पर्धकास प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या स्पर्धा विनामूल्य असून जिल्ह्यातील प्रत्येक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने या स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना सहभागी करून सहकार्य करावे. इच्छुक विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी ९८८१६९३९२८ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन, प्राचार्या दीपा फाटक, नियंत्रक जेष्ठ पर्यवेक्षक हणमंत मोतीबने आणि सुवर्णमहोत्सव स्पर्धा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# हौसे वस्ती येथे उद्यापासून विपश्यना ध्यान साधना शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. २६ सप्टेंबर-**



विपश्यना आचार्य गोयंका गुरुजी यांच्या ११ व्या स्मृती दिनानिमित्त दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया सोलापूर महिला शाखा व वेळुवन बुद्ध विहार, सिद्धार्थ तालीम संघ यांच्या संयुक्त विद्यमाने हौसे वस्ती आमराई येथे विपश्यना ध्यान साधना शिबिराचे आयोजन २९ व ३० सप्टेंबर रोजी केले आहे. २९ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते ४ या वेळेत बुद्ध वंदना शिबिर होणार आहे. त्यांनतर विपश्यना ध्यान शिबीर (फक्त जुन्या साधकांकरीता) घेण्यात येणार आहे. यावेळी २८ बुध्दमुर्तींची पुजनदेखील करण्यात येणार आहे. रात्री ८ वाजता विपश्यनेवर आधारीत भिक्खुसंघाचे व उपासकांचे प्रवचन होणार आहे. त्यानंतर सिद्धार्थ तालीम संघाच्या बुद्ध विहार येथे रात्री ११ ते सकाळीं ६ वाजे पर्यंत त्रिसरणासह, पंचशिल संपूर्ण महापरित्राण पाठ होणार आहे. ३० सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून अन्नदानाचा कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. या दोन्ही कार्यक्रमांसाठी उपासक-उपासिकांनी शुभ्र वस्त्र परिधान करुन यावे. सर्वांनी श्रद्धायुक्त भावेने धम्मदान द्यावे, असेही आवाहन यावेळी दि बुद्धिस्ट सोसायटी व सिद्धार्थ तालीम संघाने केले आहे. भिक्खुणी संघ भन्ते रट्टपाल (अमरावती), येथील भन्ते सारिपुत्त थेरो, भिक्षुणी धम्मचारणी, भिक्षुणी धम्मदिना (अणदूर) आदी मान्यवरांची या शिबिरात उपस्थित राहणार आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### वृध्द डॉक्टरला शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

प्लॉट खरेदीच्या कारणावरून वृध्द डॉक्टराला शिवीगाळ करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ११ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास असेंट टॉवर मुस्लिम पाच्छा पेठ येथे घडली. याप्रकरणी डॉक्टर अब्दुल कादिर बुजुर्गसाहेब पटवेगर (वय ७१, रा. उत्तर सदर बझार, विद्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अल्ताफ विजापुरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ ऑगस्ट २०२४ रोजी साडेदहाच्या सुमारास डॉ. अब्दुल कादीर पटवेगार हे असेंट टॉवर अपार्टमेंट मधील चौथ्या मजल्यावरील प्लॉट नंबर ४०२ च्या समोर आले आले व त्यांनी याठिकाणी अनाधिकृतपणे राहात असलेल्या अल्ताफ विजापुरे याला प्लॉट खरेदी केल्याबाबत विचारणा केली. त्यावेळी त्याने होय मी प्लॉट खरेदी केला आहे असे म्हणाल्यानंतर डॉ. पटवेगर यांनी त्यास कागदपत्रे दाखवा असे सांगितले. त्यावेळी अल्ताफ याने कागदपत्रे न दाखवता डॉ. पटवेगर यांना शिवीगाळ करून त्यांना धक्का देऊन जमिनीवर पाडले. या घटनेत डॉ. पटवेगर यांच्या उजव्या पायाच्या करंगळीवर मार लागून फॅक्चर झाला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार खान हे करीत आहेत.

### गाडीचे हप्ते न भरल्याने मारहाण करणाऱ्या चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

गाडीचे हप्ते न भरल्याने तरूणास मारहाण करणाऱ्या चौघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विशाल राजू जाधव (वय-२३, रा. कल्लप्पा नगर, नीलम नगर रोड, एमआयडीसी) याच्या फिर्यादीवरुन समर्थ गायकवाड, लक्ष्मण जाधव, विजय जाधव व आकाश धुमाळ (सर्व रा. सेटलमेंट) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दुचाकी क्र. एमएच १३ ईडी ९२८६ या गाडीच्या फायनान्सचे हप्ते भरले नसल्याने २३ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास जूना विजापूर नाका परिसरात समर्थ गायकवाड व त्याचे साथीदार हे ती दुचाकी उचलून घेऊन जात होते. त्यावेळी विशाल जाधव यास शिवीगाळ करून ठार मारण्याची धमकी देऊन मारहाण केली. लक्ष्मण जाधव याने खाली पडलेली फरशी विशाल जाधव याच्या डोक्यात मारून जखमी केले. पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

### सरकारी कामात अडथळा; नऊ जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

सोलापूर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना धाक देऊन लेप्रसी हॉस्पिटलचे कामकाज होऊ न देता सरकारी कामात अडथळा निर्माण करत महापालिकेच्या जागेमध्ये बेकायदेशीरपणे अतिक्रमण करणाऱ्या ९ जणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत डॉ. प्रसाद मरेप्पा कुमार (वय ४५, रा. सोलापूर महानगरपालिका सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नोंदणीकृत निगेटिव्ह ख्रिश्चन स्मशान भूमीचे विश्वस्त, रवींद्र सॅम्युअल साळवी, निक्सन फिलीप अडसुळे, राजू हरिश्चंद्र गायकवाड, प्रवीण डेव्हिड जोंबाडे, अनंत अमृत भोसले, अशोक सॅमसन ससाने, सुनील सुमंतराव जाधव व मोजेस प्रदीप बनसोडे (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### संशय घेऊन पत्नीचा छळ करणाऱ्या पतीवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

पत्नीचा संशय घेऊन तिचा छळ करणाऱ्या पतीविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबबात कांचन दत्तात्रय चौगुले (वय ४०, रा. अक्षत पाम सोसायटी, डोणगाव रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती दत्तात्रय बंडु चौगुले (रा. अक्षत पाम सोसायटी, डोणगाव रोड, सोलापूर सध्या रा. १०८, गुलमोहर अपार्टमेंट बालाजी नगर, पुणे) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ जानेवारी २०२० ते १६ जून २०२४ या कालावधीत कांचन या पतीच्या घरी सासरी नांदत होत्या. या कालावधीत पती दत्तात्रय याने संशय घेऊन पत्नी कांचन व तिच्या दोन्ही मुलांचा सांभाळ करणार नाही असे म्हणून हाताने मारहाण केली. तसेच कांचन यांचा शारीरीक व मानसिक छळ केला. महिला पोलिस हवालदार क्षिरसागर पुढील तपास करीत आहेत.

# दोन्ही देशमुखांची दिलजमाई जिल्हा भाजपासाठी बेरजेची!

## दोन्ही आमदारांनी मिळून केली विमानतळाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**





होटगी रोडवरील विमानतळ डागडुजी झाली आणि नव्याने ते सुरू होत असल्याने या विमानतळाची पाहणी भारतीय जनता पार्टीचे आमदार सुभाष देशमुख आणि आमदार विजयकुमार देशमुख यांनी आज (दि. २७) एकत्रित केली. विमानतळाचे काम पूर्णत्वास आले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने या विमानतळाचे उद्घाटन २६ सप्टेंबर रोजी होणार होते मात्र मोदी यांचा पुणे दौरा पावसाळी वातावरणाच्या बिघाडामुळे रद्द झाला आणि आता लवकरच पंतप्रधान म ोदी हे पुन्हा पुणे दौऱ्यावर आहेत. यामुळे काही दिवसात मोदींच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने या विमानतळाचे उद्घाटन होणार आहे. याबाबत विमानतळ प्रशासनाने केलेल्या तयारीची या दोन्ही आमदारांनी आज एकत्रितपणे पाहणी केली.



दरम्यान,कधी नाही तो दोन्ही देशमुखांचा एकत्र विमानतळ पाहणीचा योग काही राजकीय नेत्यांनी पाहून आश्चर्यही व्यक्त केले...तर ही एकी भाजपासाठी बेरजेचीच असल्याचाही निर्वाळा त्यांनीच दिला.

भाजपच्या दोन देशमुख आम दारांबरोबर शहराध्यक्ष नरेंद्र काळे, रोहिणी तडवळकर, पांडुरंग दिंडी, संजय कोळी, विशाल गायकवाड, रामप्पा चिवडशेट्टी यांनी एकत्रित या नूतनीकरण झालेल्या विमानतळाची पाहणी केली. लोकसभा निवडणुकीनंतर उत्तर आणि दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात अनेक जण भाजपमध्ये नवे इच्छुक आले आहेत. त्यामुळे या दोनही देशमुख आमदारांसाठी ही धोक्याची घंटा मानली जाते. या एकूणच वातावरणाच्या पार्श्वभूमीवर हे दोघेही एकत्र येणे पक्षासाठी अतिशय गरजेचे असल्याचे भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमधून बोलले जात आहे. तर या दोघांच्या एकीमुळे जिल्हा भाजपाचे बळही वाढणार आहे, यात शंकाच नाही.

### आता भविष्यातही मालक-बापू जोडी कायम सोबत राहील

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच विमानतळ उद्घाटन ऑनलाईन पध्दतीनेच होणार आहे. या ठिकाणची उद्घाटनाची तयारी, विमानतळात केलेले विविध बदल आदी गोष्टींची एकत्रितपणे पाहणी करण्याचे दोघांचेही मोबाईलवरुन ठरले. मालक आणि बापू हे एकाच पक्षाचे जेष्ठ नेते असल्याने त्यांनी एकत्रित येवून ही पाहणी केली आणि विमानतळ प्रशासनाशी चर्चा करून काही सुचनाही केल्या. दोन्ही नेते एकाच पार्टीचे असल्याने भविष्यातील निवडणुकांतही एकत्रितपणे काम करणार आहेत.

**नरेंद्र काळे, शहराध्यक्ष, भाजपा**

### रविवारी होणार उद्घाटन : जिल्हाधिकारी आशीर्वाद

केंद्रीय स्तरावरून रविवार, दि. २९ सप्टेंबर रोजी पुन्हा पंतप्रधानांच्या पुणे दौऱ्याची माहिती आली असून, याच कार्यक्रमात सोलापूर विम ानतळाचा उद्घाटन सोहळा पार पडणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज (दि. २७) दिली.

# स्वयंम शिक्षा फाउंडेशनचा उद्योग मार्गदर्शन व रोजगार मेळावा २ आक्टोबरला

## युवक-युवतींना संधी देण्यासाठी ॲड. वैद्य यांचा पुढाकार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक ॲड. सोमनाथ वैद्य यांच्या वतीने बुधवार दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ ते ४ यावेळेत सोलापुरातील युवक - युवतींसाठी मोफत उद्योग मार्गदर्शन व रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.



जुळे सोलापुरातील मयूर क्लासिक म ल्टिपर्पज हॉल येथे हा मेळावा होणार आहे या मेळाव्याचे उद्घाटन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कामगार नेते कुमार करजगी, प्रवचनकार बसवराज स्वामी यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाच्या विविध आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांची माहिती देण्यासाठी स्टॉल या ठिकाणी उपलब्ध करण्यात येत आहेत. महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ माहिती लिंगायत सम ाजातील युवकांना व्हावेत यासाठी सोलापुरात प्रथमच हा कार्यक्रम होत आहे विशेष म्हणजे युवकांना विविध कंपनीत रोजगार मिळून देण्यासाठी सर्वंकष विकासाचे व्हिजन असलेले ॲड. सोमनाथ वैद्य यांनी पुढाकार घेतला आहे. या कार्यक्रमास पुणे , पिंपरी - चिंचवड येथील विविध कंपन्या व सोलापूर मधील विविध कंपन्यामध्ये रोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच युवकांना मुलाखत तयारी, नोकरी, कौशल्यविकास यावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेती, सेवा क्षेत्र, पर्यटन, प्रक्रिया उद्योग, ग्रामीण उद्योग सुरू करण्यासाठी नामांकित उद्योजकांचे अनुभव यावेळी ऐकता येणार आहे. युवक - युवतींना विविध आवडीचे उद्योग सुरू करण्यासाठी व रोजगार मिळविण्यासाठी यातून प्रेरणा मिळेल, तसेच नवीन स्टार्टअपसाठी स्वयंम शिक्षा फाउंडेशनच्या वतीने विशेष मदत मिळणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी मोफत असून तरी यासाठी नाव नोंदणी करण्यासाठी ७२१९०९९९५५ / ऑफिस ९९७५९०९७९० या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

### हे मान्यवर करणार मार्गदर्शन

ज्येष्ठ गांधीवादी अभ्यासक प्रा. नरेश बदनोरे, अमरावतीच्या अग्निपंख फाऊंडेशनचे सचिव विक्रम सिंग मगर, महात्मा बसेवश्वर वचन साहित्य अभ्यासक प्रा. डॉ. भिमाशंकर बिराजदार, व्हीव्हीपी कॉलेज प्राचार्य प्रा. डॉ. राहुल गायकवाड, वक्ते अमोल तळेकर (पुणे), माजी सैनिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे, कौशल्यविकास प्रशिक्षक अमित कामतकर, ट्रेनर अँन्ड कौन्सिलर प्रा.आय. आय. मुजावर.

# सिंहगड कॉलेजमधील खूनी हल्ल्याप्रकरणी तिघांना २९ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**

सोलापूर-पुणे महामार्गावरील नविन पूना नाक्याजवळील सिंहगड कॉलेजमध्ये शिपायाचा चाकूने मारून खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी तिघांना न्यायालयाने २९ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.



अमोघ अरूण कुलकर्णी (वय ३२), दीपक दगडू गरड (वय २८), श्रीकांत माणिक वाघमारे (वय २३, तिघे रा. बाळे, सोलापूर) अशी पोलिस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. प्रकाश दत्तू माळी (वय ३५, रा. सिंहगड कॉलेज कॉटेज, नविन पूना नाका, केगाव, ता. उत्तर सोलापूर) असे जखमीचे नाव असून माळीवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. तर कॉलेजचे दत्तात्रय ईश्वर नवले (रा. सिंहगड कॉलेज) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमोघ कुलकर्णी, दीपक गरड, रोहित वाडेकर, रोहित मंडलिक, गणेश कोडे, शुभम भोईट, संजय उफाडे, श्रीकांत वाघम ारे, अरमान शेख (सर्व रा. बाळे) यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापैकी यातील संजय उपाडे याची बहिण व भाऊ यांना सिंहगड कॉलेजमध्ये ते चालवित असलेले कॅन्टीन बंद का करत नाहीत या कारणावरून उपाडे व त्याच्या साथीदारांनी कॉलेजम धील महिला हॉस्टेलजवळील आतील मेनगेटजवळ क्रुझर जीपमधून येऊन दत्तात्रय नवले यांना व महिला सुरक्षा रक्षक यांना लाथाबुक्क्याने व दगडाने मारहाण केली. तसेच नवले यांच्या गळ्याला चाकू लावून नवले यांना चाकूने मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी नवले यांना वाचवायला आलेला कर्मचारी प्रकाश माळी याला ठार मारण्याच्या उद्देशाने चाकूने पोटात मारून त्यास गंभीर जखमी केले. तसेच परत इतरांना चाकूने मारण्याचा प्रयत्न केला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात खूनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील तपास करीत आहेत. गुन्हा दाखल झाल्यानंतर फौजदार चावडी पोलिसांना तिघांना अटक करून शुक्रवारी दुपारी न्यायालयात हजर केले होते. इतर आरोपींचा शोध पोलिसांकडून सुरु आहे.




**सोलापुर : नवरात्रनिमित्त मंडळाच्या देवी मुर्ती चांदीचे अलंकार, शस्त्र, अभुषणे पॉलिश कामात कारागीर संतोष येरंकोल्लू परिवार अहोरात्र व्यस्त आहेत. या कामास तीन ते चार महिने आधीच सुरुवात होते. (छायाचित्र : केवल तिवारी)**

# नवरात्रीची लगबग; हिंदू-मुस्लिम एकतेचे घडते दर्शन

## घटस्थापनेच्या पार्श्वभूमीवर आडणी बनविण्यात मुस्लिम कारागीर व्यस्त

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्रौत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागात नवरात्रीची लगबग सुरू झालेली आहे. पंचकट्टा येथे मुस्लिम कारागीर सलीम शेख हे गेल्या तीस वर्षांपासून घटस्थापनेसाठी लागणारे लोखंडी आडणी बनवण्यात व्यस्त आहेत. नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर एक महिन्या अगोदरपासूनच सदरचे कामकाज सुरू होते. शेख यांच्या आडणी खरेदी करण्यासाठी सोलापूर शहर तसेच जिल्ह्यातील ग्राहक येत असतात. त्यामुळे शेख हे हिंदू मुस्लिम त्याचे प्रतीक मानले जात आहेत.

अवघ्या महाराष्ट्राची कुलस्वामिनी असणाऱ्या श्रीतुळजाभवानी मातेचा शारदीय नवरात्र महोत्सव दृष्टिक्षेपात आला आहे. पहिली माळ ही तीन नोव्हेंबर रोजी असून घटस्थापनाकडून पहिली माळ चढवली जाणार आहे. त्याच अनुषंगाने शहरात घटस्थापनेसाठी लागणाऱ्या लोखंडाच्या आडण्या बनवण्याचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. घटस्थापनेच्या पार्श्वभूमीवर सलीम शेख हे आपल्या वैविध्यपूर्ण कारागिरीच्या माध्यमातून हिंदू मुस्लिम एकतेचे आनोखे दर्शन घडवत आहेत. घटस्थापना झाल्यानंतर माळ लावण्यासाठी लागणारे लहान- मोठे आडणी बनविण्यात शेख गेल्या अनेक दिवसांपासून व्यस्त असल्याचे दिसत आहेत. तत्पूर्वी शेख यांनी गौरी गणपती सणासाठी लागणारे श्रीमहालक्ष्मीचा मंडप सुद्धा मागणी प्रमाणे तयार करून ग्राहकांना सुपर्द केले आहे.



दरम्यान नवरात्रीमध्ये नऊ दिवस आदिशक्ती देवी मातेचा जागर उत्सवाच्या माध्यमातून केला जातो. तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे कोजागिरी पौर्णिमेपर्यंत भाविकांचा मोठा राबता असतो. पूर्ण राज्यातील भाविक भक्त नवरात्री काळात श्रीतुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूरला येत असतात. सोलापूर शहर जिल्ह्यात देखील नवरात्रीचा मोठा उत्सव साजरा केला जातो. शहरातील विविध भागात सार्वजनिक पद्धतीने नवरात्रोत्सव साजरा केला जातो. आदिमाया आदिशक्तीच्या मूर्तीचे विधिवत प्राणप्रतिष्ठापना केली जाते. यावेळेस भव्यसभा मंडपामध्ये घटस्थापनासुद्धा केली जाते. याच घटस्थापनेसाठी लहान मोठ्या आकाराचे आडणी यांची आवश्यकता असते. हीच गरज ओळखून अनेक कारागीर घटस्थापनेचे आडणी बनवतात. त्यामध्ये सलीम शेख हे मुस्लिम असून त्यांनी त्यांच्या कारागिरीच्या माध्यमातून सामाजिक एकता आणि बंधुता टिकून ठेवली आहे. दरम्यान शेख यांच्याकडे सोलापूर शहरातील तसेच इतर तालुक्यातील हिंदू ग्राहक विशेषत्वाने खरेदीसाठी येत असतात. ग्राहकांना पाहिजे त्या आकारामध्ये आणि पाहिजे त्या रंगांमध्ये सदरचे वस्तू बनवून देत असतात. सध्या लहान आणि मोठे अशा दोन आकारामध्ये आडणी बनवले जात आहेत. त्यावर ओमकार , स्वस्तिक आणि आकर्षक नक्षीकाम केले जात आहेत. त्यास सोनेरी आणि गुलाबी रंग देऊन विक्रीसाठी सज्ज केले आहेत.

### सामाजिक एकता टिकण्यास मदत

लोखंडांपासून विविध प्रकारचे वस्तू साहित्य बनवण्याचा व्यवसाय आहे. गेल्या वीस ते तीस वर्षांपासून हे कामकाज करत आहे. ग्राहकांच्या मागणीनुसार गौरी गणपतीसाठी श्रीमहालक्ष्मीचे मंडप तयार केले जातात. त्यानंतर येणाऱ्या नवरात्रीनिमित्त देवीमातेचे घटस्थापचे आडणी बनवतो. यावस्तू ग्राहकांच्या पसंतीस उतरतात, त्यामुळे दरवर्षी ऑर्डर येते, त्यानुसार महालक्ष्मी मंडप आणि आडणी या वस्तू एक महिना अगोदर पासून बनवल्या जातात. या माध्यमातून हिंदू मुस्लिम एकता टिकून राहत आहे. लहान आडणी ३०० ते ५०० रुपये तर मोठी आडणी ही १५०० ते १८०० रूपये इतके आहेत.

**- सलीम शेख, कारागीर**

# अज्ञात कारणावरून आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर -**




रऊळगाव (ता. बार्शी) येथील तरूणाने अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. गोवर्धन कल्याण भोसले (वय ३५) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरूणाचे नाव असून त्याच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी राहत्या घरात गोवर्धन भोसले यांनी अज्ञात कारणावरून विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी धाराशिवच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पुढील उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.


गुरु सौ. यशोदामाई इनामदार यांचा 45 वा पुण्यतिथी महोत्सव



कार्यक्रम
शनिवार दि. २८ / ९ /२०२४ रोजी
सकाळी ११ ते १२ भजन
दुपारी १२ वा. गुलाल, नंतर प्रसाद वाटप
तरी सर्वांनी कृपादर्शनाचा
लाभ घ्यावा ही विनंती...
विश्वस्त मंडळ

श्री सद्गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर ट्रस्ट
बुधवार पेठ, प्रभाकर महाराज रोड, सम्राट चौक, सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८९८

### तुका म्हणे धर्म रक्षाया करणें । छाया इच्छी उन्हें तापला तीं ।।

धर्म म्हटल्याबरोबर आपल्या नजरेसमोर किंवा मनात हिंदू, मुस्लिम, शीख, ईसाई आदि धर्म म्हणून येतात. पण प्रत्यक्षात धर्म या शब्दाचा अर्थ यापेक्षाही वेगळा आहे, असे आपले अध्यात्म सांगते. ध म्हणजे धारण करणे किंवा ज्याने प्रजेचे रक्षण होते, त्याला धर्म म्हणतात. निती नियमांची गोळा-बेरीज म्हणजे धर्म होय. निती नियमाला अनुसरुन होणारे वर्तन म्हणजेच धर्माला अनुसरून आचरणहोय. धर्म अर्थात नीती नियम लागू पडत नाहीत, असा व्यक्ति असूच शकत नाही. धर्माचा जो आधारस्तंभ नीती नियम आहे, तोच मानवी जीवनाचा आधार-स्तंभ आहे. या आधारस्तंभाची मजबुती टिकवून ठेवणे व या मजबुतीमध्ये भर घालणे, हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य असते. धर्माचे रक्षण आपोआप होत नसते तर ते करावे लागते. धर्माचे रक्षण करण्याची जबाबदारी ही प्रत्येकाची असते.



तुकाराम महाराज

प्रत्येकाने नीती नियमाचे पालन करणे म्हणजेच धर्माचे रक्षण करणे होय. उन लागत असेल तर माणूस सावली शोधतो. सावली त्याचे उन्हापासून संरक्षण करते. त्याचप्रमाणे संसारात माया, मोह, ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोधाचे उन लागू नये म्हणून धर्माचा आधार घ्यावा, त्याचे रक्षण करावे. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे धर्म रक्षाया कारणें । छाया इच्छि उन्हे तापला तो ।। धर्म या शब्दाचा अर्थ अतिशय व्यापक असतांनाही माणसाने स्वार्थापोटी म्हणा किंवा इतर कारणास्तव म्हणा पण धर्माला संकुचित केले आहे हे सत्य आहे. धर्म म्हणजे जात, वंश किंवा विशिष्ट लोकांचा समूह नाही तर नीती नियमाला अनुसरुन होणारे कर्तव्य होय. हे उदाहरणादाखल सांगायचे झाले तर पुढीलप्रमाणे सांगता येईल. कुरुक्षेत्रावर कर्णाच्या रथाचा चाक निखळल्याने तो रथाच्या खाली उतरला व धनुष्यबाण बाजुला ठेवून तो रुतलेला चाक बाहेर काढू लागला. तेवढयात अर्जुनाने कर्णाचा शिरच्छेद करण्यासाठी रथावर उभे राहून धनुष्य उचलले. तेव्हा कर्ण अर्जुनाला म्हणाला, निहत्या योध्दयावर रथावर उभा राहून शस्त्र उचलणे हे अधर्म आहे. त्यावर श्रीकृष्ण म्हणाले, हे राधेसुता, तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म ! तेव्हा म्हणजे द्रोपदीचे वस्त्रहरण होत होते ती वेळ होय. त्यावेळी कर्ण द्रोपदीला मदत करण्याऐवजी नको ते बोलला होता. यावरून आपल्या लक्षात येते की, नीती नियमाला अनुसरुन कर्तव्य पार पाडणे म्हणजेच धर्म होय. परिस्थितीनुरुप धर्म (वर्तन)वेगळा दिसत असला तरीही तो नीती नियमाच्या विरुध्द नसतो. उदा. मी कार्यालयात असतांना संबंधित नियमाचे पालन करतो, घरी आल्यास कौटुंबिक जबाबदारी पार पाडतो, फावल्या वेळेत प्रवचन, कीर्तन, लिखाण करतो. हे सर्व त्या त्या ठिकाणी निती नियमला अनुसरून म्हणजेच धर्माला अनुसरुन असते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शनिवार
दि. २८ सप्टेंबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - भाद्रपद
कृ. एकादशी (१४.४९)
ऋतु - वसंत
नक्षत्र- आश्लेषा (२७.३७)
योग - सिद्ध (२३.४९)
करण - कौलव (२७.४५)
सुर्योदय - ०६.३१
सूर्यास्त - १८.२७

दिनविशेष -
इंदिरा एकादशी
आप्पा महाराज पुण्यतिथी

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा:पश्चिम
आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# राणाप्रताप नगरातील नागरिकांचे हाल बनले बेहाल!

## ● ड्रेनेज चेंबरचे सांडपाणी घरात शिरल्याने रोगराईस मिळतेय आमंत्रण; महापालिका प्रशासनाचे होते दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ सप्टेंबर-**

विजापूर रोडवरील राणा प्रताप नगरामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून ड्रेनेजचे सांडपाणी नागरिकांच्या घरात शिरत असल्याने नागरिकांना मरण यातना सोसाव्या लागत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून ही परिस्थिती कायम असल्याने नागरिकांचे घराबाहेर पडणे देखील मुश्किल बनले आहे. घराच्या वरांड्यामध्ये अर्धा फूट भरलेल्या सांड पाण्यातून नागरिकांना वाट काढावी लागत आहे. यामुळे ऐन पावसाळ्यात रोगराईला आमंत्रण मिळत आहे.

विजापूर रोड येथील राणा प्रताप नगरमध्ये गेल्या चार ते पाच वर्षांपासून ही समस्या भेडसावत आहे. ड्रेनेज चेंबर लाईन मधून सांडपाणी ओव्हर फ्लो होऊन नागरिकांच्या घरामध्ये आणि वरांडांमध्ये साचत आहे. सांडपाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होत नसल्याने सदरचे सांडपाणी अंतर्गत रस्ते, तसेच नागरिकांच्या घरामध्ये शिरत आहे. सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था सध्या पूर्णपणे बंद झाल्याने सांडपाण्याचा योग्य पद्धतीने निचरा होत नाही. राणा प्रतापनगर मधील ड्रेनेज चेंबरची लाईन नैसर्गिक उताराच्या दिशेने करण्यात आली होती. परंतु नर्सरी सुरू केलेल्या प्लॉटधारकाने ड्रेनेज चेंबर लाईन स्वतःच्या जागेतून नेण्यास मज्जाव केल्याने, सांडपाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.

दरम्यान या समस्यावर महापालिका प्रशासनाने गेल्या दोन ते तीन वर्षांपासून पाठपुरावा करत असल्याचे सांगण्यात आले. परंतु यावर अद्याप पर्यंत कोणतीच ठोस उपाययोजना करण्यात आली नाही.

### समस्याची फाईल वरिष्ठ विभागाकडे

विजापूर रोडवरील राणा प्रतापनगर मध्ये गेल्या अनेक वर्षांपासूनची ही समस्या कायम आहे. ड्रेनेज चेंबर लाईन करताना समस्या निर्माण झाली आहे. यासंबंधी वरिष्ठ कार्यालय आणि अधिकाऱ्यांकडे फाईल पाठवली आहे. यावर वरिष्ठ स्तरावरून निर्णय घेण्यात येणार आहे. सध्या पाणी नसण्याचे कामकाज सुरू केले आहे.

**- नवनाथ बाबर,**
झोन अधिकारी सोलापूर महानगरपालिका



**बरे वाईट झाले तर कोण जबाबदार? :** गेल्या अनेक वर्षांपासून राणा प्रताप नगरमध्ये हीच परिस्थिती कायम असल्याने आमच्यासारख्या वयोवृद्ध नागरिकांना जगणे मुश्किल बनले आहे. घरामध्ये मी एकटीच राहते सांडपाण्यामुळे माझ्या जीवाला काही बरे वाट झाले तर यासाठी कोण जबाबदार असेल? घरामध्ये सांडपाणी साचून सर्वत्र दुर्गंधी पसरून रोगराई वाढत आहे. महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी केवळ बघायची भूमिका घेत आहेत यावर तात्काळ तोडगा काढावा.

**- शैलजा दुबे,** स्थानिक पीडित वयोवृद्ध महिला

दिवसेंदिवस सांडपाणी साचत राहील्याने सर्वत्र दुर्गंधी पसरून डेंग्यू मलेरिया सारख्या साथीच्या रोगांचे प्रमाण वाढत आहे. अंतर्गत रस्त्यावर देखील सांडपाण्याचे तळे चाचल्याने नागरिकांना रस्त्यांवरून येणे जाणे देखील मुश्किल बनले आहे. या नगरात राहणाऱ्या वयोवृद्ध तसेच चिमुकल्यांना यासांडपाण्यामुळे रोगराईचे फुकटचे आमंत्रण मिळत आहे. महापालिका प्रशासन केवळ काम करण्याच्या बहाण्याने, लाव लीजाव टिमकी बजाव! करून निघून जातात परंतु वास्तविक पाहता त्यावर तोडगा काढला जात नाही.



# शिवाजी महाराज चौकातील रस्त्यावरील खड्डे बुजवण्याची मागणी

### ● संभाजी आरमारने दिले उपायुक्त लोकरे यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ सप्टेंबर-**

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावेत, अशी मागणी संभाजी आरमारच्या वतीने महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे गेल्या काही दिवसांपासून रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. पुणे - सोलापूर रस्त्याकडून येणारी सर्व वाहने तसेच बाळीवेस आणि सम्राट चौकाकडे जाण्यासाठी शहरातील मुख्य चौक म्हणून छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून येतात. सामान्य नागरिक,विद्यार्थ्यांना या खड्ड्यांचा नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने उपायुक्त आशिष लोकरे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपायुक्त लोकरे यांनी तात्काळ प्रतिसाद देत संबंधित ठेकेदार यांना खड्डे बुजवण्याची कार्यवाही करण्याचे आदेश दिले. पाऊस असल्याने काम थांबले असून पाऊस थांबल्यानंतर काम सुरु करण्याचे आश्वासन दिले. निवेदन देताना जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, सरचिटणीस गजानन जमदाडे , शहरप्रमुख सागर ढगे, रिक्षा संघटनेचे सचिन गायकवाड, राजू आखाडे, द्वारकेश बबलादीकर, स्वप्नील इराबत्ती, सागर दासी, अक्षय सिरसाल उपस्थित होते.

# वसुंधरा संमेलनानिमित्त वृक्षदिंडीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

### ● पथनाट्याद्वारे केली जनजागृती, महापालिका आवारात रोपवाटिकांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिका पर्यावरण विभाग विभागाच्यावतीने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत महाराष्ट्र राज्यात प्रथमच सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पहिल्या वसुंधरा संमेलनाच्या निमित्ताने गुरुवारी वृक्ष दिंडी काढण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यात हजारो विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. महापालिका परिसरात रोपवाटिकांचे प्रदर्शनही भरवण्यात आले. चार हुतात्मा पुतळा परिसरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेश देवर्षी यांच्या हस्ते वृक्षदिंडीचे उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांनी झाडे वाचवा.. झाडे जगवा.. यासह पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, श्री सिद्धरामेश्वर मंदिर, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला चौक मार्गे वृक्षदिंडीचा समारोप महापालिका इंद्रभुवन परिसरात समारोप करण्यात आला. विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने पथनाट्य सादर केले. या वृक्षदिंडीत सोलापूर शहरातील खाजगी आणि महानगरपालिकेच्या शाळांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या हस्ते रोपवाटिकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या रोपवाटिकांच्या प्रदर्शनामध्ये तुळस, सब्जा, कापूर तुळस, वैजयंती, मारवा यासह इतर आयुर्वेदिक रोपे पाहण्यास उपलब्ध करून देण्यात आले आहे.




यावेळी उपायुक्त आशिष लोकरे, मुख्य लेखापाल रूपाली कोळी,सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, उद्यान विभागाचे अधीक्षक किरण जगदाळे, पर्यावरण विभागाचे अधिकारी अक्षय मोरे, स्वप्नील सोलनकर, शहर अभियान व्यवस्थापक समीर मुलाणी यांच्यासह पर्यावरण क्षेत्रातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दिल्लीच्या केंद्रीय पथकाची सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील कामकाजाची पाहणी

### ● केंद्रीय कृषी मंत्रालयातील पथकाने दिल्या मार्गदर्शक सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ सप्टेंबर-**

राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मधील शेतमालाच्या खरेदी-विक्रीच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय पथक सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात दाखल झाले होते.




दिल्लीच्या केंद्रीय कृषी किसान कल्याण मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी सोलापूर बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आलेल्या शेतमालाच्या बाजारभावासह, उत्पादनक्षमता आणि खरेदी - विक्रीसह बाजार समितीत कार्यरत असणाऱ्या विविध विभागांची तपासणी केली. दरम्यान या केंद्रीय पथकामध्ये केंद्रीय कृषी किसान कल्याण मंत्रालय विभागातील अव्वर सचिव जे.के. मनोज , कृषी विभागाचे उपसंचालक पंकज कुमार , सहायक संचालक मुकेश कुमार , पुण्याचे वरीष्ठ विपणन अधिकारी अच्युत सुरवसे , सोलापूर जिल्हा परिषदेचे विशेष घटक योजना कृषी अधिकारी नंदकुमार पाचकूडवे आदींचा समावेश होता. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये परजिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात कांदा विक्रीसाठी दाखल होत असतो. बाजारात आवक झालेल्या कांद्याला मिळणारा योग्य दर, आडत आणि खरेदीदार व्यापाऱ्यांचा फायदा, सद्यस्थितीतील पीकपद्धती, शेतमालाची उत्पादन क्षमता, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी, कांद्याला मिळणारा उत्तम दर, उच्चप्रतीचा कांदा लागवडीसह साठवणूक यांसह इतर विषयावर मार्गदर्शक तत्वानुसार चर्चा करण्यात आली. यावेळी बाजार समिती मधील विविध विभागप्रमुखांनी आपल्या विभागाची सविस्तर माहिती केंद्रीय पथक अधिकाऱ्यांना दिली. तत्पूर्वी बाजार समितीच्या वतीने केंद्रीय पथकातील अधिकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी माजी सचिव चंद्रशेखर बिराजदार, नामदेव शेजाळे, सचिन ख्याडे, महिबूब शेख,रजपूत यांच्यासह विभाग प्रमुख उपस्थित होते.

### भविष्यात कांदा उत्पादक, अडते, व्यापारी यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न

केंद्रीय पथक समिती सदस्यांनी सोलापूर बाजार समिती मधील सद्यपरिस्थिती बद्दल आढावा घेतला. तसेच अडते आणि खरेदीदार व्यावसायिक यांच्याबद्दल सविस्तर चर्चा केली. बाजार समितीबाबत योग्य ती प्रतिक्रिया शासन स्तरावरून कळविण्यात येणार आहे. भविष्यात कांदा उत्पादक शेतकरी, कांदा अडते आणि व्यापारी यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केंद्रीय स्तरावरून राहणार आहे.

**- मोहन निंबाळकर,**
प्रशासक सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर

# शोएब महागामी फ्रेंड सर्कल संस्था मतदारस्लिप काढून देणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ सप्टेंबर-**

शोएब महागामी फ्रेंड सर्कल सामाजिक संस्थेच्या वतीने सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातील मतदारांना मतदार स्मार्ट स्लीप काढून देण्याचा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक शोएब महागामी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



मतदारांनी आपले नाव सांगितल्यानंतर त्यांना एक मिनिटांमध्ये त्यांचे मतदान कार्डाची स्लिप डाऊनलोड करून ती लॅमिनेट करून मोफत स्वरूपात दिली जाणार आहे. रविवार दि. २९ सप्टेंबर पासून मुस्लिम पाच्छा पेठ सोशल हायस्कूल जवळील संस्थेच्या संपर्क कार्यालयात हा उपक्रम सुरू करण्यात येणार आहे. सध्या अनेक मतदारांना आपले मतदार यादीत नाव कुठे आहे? अनुक्रमांक काय आहे? याबाबत स्लिप नसल्याने माहिती नाही. ओळखपत्र स्वरूपात त्या संगणकावर निवडणूक आयोगाने लोड केल्या आहेत. त्याची कॉपी काढून देण्यात येणार आहे. सध्या या कामासाठी ई-महा सेवा केंद्र मध्ये पैसे खर्च होतात. यासाठी ही मोफत स्वरूपात मोहीम हाती घेतली आहे, असेही शोएब महागामी यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस शाहिद महागामी, तोफिक गुलबर्गावाले उपस्थित होते.

# नाट्यकलेचे ध्येयवेडे शिक्षक : पद्माकर देव

**सोलापुरातल्या हरीभाई देवकरण प्रशालेतील माजी मुख्याध्यापक आणि शासन सन्मानित आदर्श शिक्षक, संगीततज्ञ, नाट्य दिग्दर्शक, स्व. पद्माकर देव यांच्या जन्मशताब्दि वर्षाला आज शनिवार दिनांक २८ सप्टेंबर २०२४ पासून सुरुवात होत आहे त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा...**

हरिभाई देवकरण प्रशालेतून इयत्ता अकरावी पास होवून सन १९७० साली आम्ही बाहेर पडलो ते शिक्षकांनी आमच्यावर केलेल्या अनेक संस्कारा सोबतच. हीच शिदोरी आजही आम्हाला क्षणोक्षणी उपयोगी पडते. तसे पाहिले तर आम्ही आता सत्तरीला पोहचलो आणि आम्हांला ज्यांनी शिकवले त्यापैकी काही शिक्षकांची आता शताब्दी आम्ही साजरी करत आहोत. त्यापैकीच एक म्हणजे पद्माकर देव सर.

पद्माकर देव सरांनी आम्हांला मराठी आणि इतिहास हे विषय शिकवले. इतर वर्गावर त्यांनी इंग्रजी देखील शिकवले. देव सरांचा मुख्य पिंड होता तो नाटककाराचा, त्यामुळे प्रत्येक गोष्ट व्यवस्थित, जेथे ज्याची गरज तेथे असणं गरजेचं, बारीक-सारीक गोष्टींचं नियोजन हे त्यांच्या स्वभावात पुर्णपणे भिनलेलं आणि ते शिकवतांना आम्हांला पदोपदी जाणवायचं, आमच्या वेळेस प्रत्येक शिक्षकांबद्दल आम्हांला एक भीतीयुक्त आदर होता, तसाच तो पद्माकर देव सरांबद्दलही !

देव सरांच्या हाताखाली एखाद्या नाटकात भुमिका करावी ही जशी अनेकांची इच्छा तशीच माझी देखील. अशी इच्छा फलद्रुप होण्याची शक्यता निर्माण झाली ती शाळेच्या सुवर्ण महोत्सवाच्या वेळेस. सुवर्ण महोत्सव दणक्यात साजरा करावा या दृष्टीने त्याचे पडघम वाजू लागले होते. रोज नव-नवीन कल्पना, बैठका, समित्या नेमणे वगैरे काम सुरू होते. दिग्गज लोकांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवण्याचे मनोरथ रचले जात होते. तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांचा कलाविष्कार उत्तम व्हावा या साठी देखील वेगवेगळे विचार सुरू होते.



याप्रसंगी भव्य दिव्य असे दोन नाटकं बसवावीत असे ठरले आणि देव सर आणि रानडे सर यांनी शाकुंतल मराठीत आणि हॅम्लेट इंग्रजीत करायचे नक्की केले. ही दोन्ही नाटके शाळेतल्या विद्यार्थ्यांकडून बसवून घ्यायची म्हणजे शिवधनुष्य पेलण्या सारखेच होते. दोन्ही नाटकात आमच्या ''सी'' तुकडीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग फार मोठा होता. या दोन नाटकांबरोबर एखादे विनोदी नाटक असावे असे काहींनी सुचवले पण नंतर तो विचार मागे पडला, पण विषय संपला नाही. हे नाटक विद्यार्थ्यांनीच बसवून सादर करायचे या विचाराने ''सी'' तुकडीचे विद्यार्थी कामाला लागले आणि नाटक करायचे ते पुलंचे ..विनोदी ..यामुळे अंमलदार नाटक करायचे नक्की झाले. शाळा सुटल्यावर वर्गातच तालीम करायचे ठरले आणि सर्व काही जोमाने सुरू झाले. पद्माकर देव सरांना याची कल्पना दिली त्यावेळेस भरगच्च कार्यक्रमात वेळ मिळाला तर त्यावर विचार होईल असे आश्वासनही सरांनी दिले.

रोज संध्याकाळच्या तालीमींना रंग चढत होता. हळूहळू इतर वर्गाची मुले पण हजर राहून प्रोत्साहन देऊ लागली. शाळेत हा एक चर्चेचा विषय झाला. आमचं नाटक गाजणार याची आम्हां सर्वांची खात्री झाली होती. पण वेळे अभावी सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमात नाटकाचा नंबर लागला नाही आणि देव सरांच्या हाताखाली काम करण्याची आमची संधी हुकली. त्यावेळची अजून एक आठवण म्हणजे सुवर्ण महोत्सवी अंकासाठी मी आणि वर्गमित्र रविंद्रनाथ एका वर्गात बसून आलेखाचे काम करत असू. के. पी. कुलकर्णी सर देखरेख करत असत. मात्र अधून मधून देवसर पण चक्कर मारायचे. काम व्यवस्थीत चालले आहे. हे पाहिल्यावर त्यांना समाधान वाटे ते त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत असे. करारी चेह-यामागचा तो एक मृदु चेहरा आम्ही पाहिला होता.

देव सरांचं नाटकाच्या प्रती असलेलं प्रेम व आस्था सर्वश्रुतच..! आपले राहते घर त्यांनी नाटकाच्या उन्नतीसाठी, तालमीसाठी आणि खास करुन नवीन कलावंत तयार व्हावेत या भावनेने श्रुती मंदीर या संस्थेस कायमस्वरुपी वापरण्यास दिले हा त्यांचा मनाचा थोरपणाच !

श्रुती मंदीर या संस्थेने देव सरांच्या नावाने स्व. पद्माकर देव स्मृति-गौरव पुरस्कार देण्याचे ठरवले. या अभियानात मला सोबत घेण्याचे श्रुती मंदीरच्या अध्यक्षा आणि आमच्या शिक्षिका विद्याताई काळे बाईंनी ठरविले आणि त्यामुळे मला देव सरांच्या नावाशी माझे नाव जोडले गेले याचा मला खूप आनंद झाला. स्व.पद्माकर देव सरांची यावर्षी जन्मशताब्दी आहे. वर्षभरात अनेक कार्यक्रम त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ होणार आहेत या सर्वांमध्ये माझा सहभाग निश्चितच राहणार आहे याचे मला अप्रुप आहे. माझ्याकडून ही सर्व कामे व्यवस्थित होतील याची ही मला खात्री आहे. अशा या आमच्या पद्माकर देव सरांना मन:पुर्वक अभिवादन..!

**- किशोर चंडक, सोलापूर.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कर्जासाठी 'पांडुरंग' एनसीडीसीच्या दारात कधीही उभा राहिला नाही

## कारखान्याचे अध्यक्ष प्रशांत परिचारक : पांडुरंग कारखान्याचे १३ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ सप्टेंबर-**

पांडुरंग कारखान्याने येत्या गळीत हंगामामध्ये सुमारे तेरा लाख मे. टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जिल्ह्यातील अनेक साखर कारखाने सध्या ऊसाला जादा दर देत आहेत. मात्र पांडुरंग कारखान्याला कासव किंवा सशाची स्पर्धा करावयाची नसून कारखान्याच्या माध्यमातून आपण शेतकरी सभासदाच्या हिताला प्राधान्य देत आहे. कर्जासाठी कारखान्याने कधीही एनसीडीसीच्या दारात उभा राहिला नसल्याचे अध्यक्ष प्रशांत परिचारक यांनी सांगितले.

श्रीपूर येथील पांडुरंग कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचा वार्षिक अहवाल कोणत्याही बँकेने पाहिला तर पांडुरंग कारखान्याला पाचशे, साडेपाचशे कोटी रुपयाचे कर्ज सहज मिळू शकते ऐवढी कारखान्याची आर्थिकस्थिती भक्कम आहे. प्रत्येक गळीत हंगामाला परिसरातील कारखान्याचे सभासद, शेतकरी आपला ऊस आवर्जून कारखान्यास देतात. सभासद, शेतकऱ्यांच्या विश्वासावर कारखान्याचे व्यवस्थापन उत्तम प्रकारे सुरु आहे. चांगल्या प्रकारे कारखाना सुरू असल्यामुळे आतापर्यंत आपल्या पांडुरंग कारखान्याला राष्ट्रीय व राज्य पातळीवरील ३५ पुरस्कार मिळाले असल्याचे देखील परिचारक यांनी सांगितले. यावेळी पांडुरंग कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास खुळे, युटोपियन शुगर्सचे अध्यक्ष उमेश परिचारक, पंढरपूर अर्बन बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, दिनकर मोरे, सुभाष माने, बाळासाहेब देशमुख उपस्थित होते.




### परिचारकांच्या कार्याच्या माहितीसाठी खास चित्रफित

गेल्या अनेक वर्षापासून माजी आमदार प्रशांत परिचारक राजकारणात सक्रीय आहेत. आतापर्यंत त्यांनी जिल्हा दूध संघ, जिल्हा परिषद, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पंचायत समिती, नगरपरिषद आणि विधान परिषद या ठिकाणी उत्कृष्ठ काम केलेले आहे. त्यांनी केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कामांची नागरिकांना माहिती व्हावी तसेच येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचारासाठी उपयुक्त ठरावी म्हणून प्रशांत परिचारक यांच्यावर खास चित्रफीत तयार करण्यात आली आहे. ही चित्रफितदेखील पांडुरंग कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दाखविण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त




### हरळय्यावस्ती शाळा जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्काराने सन्मानित

**मंद्रुप, दि. २७ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर यांच्या वतीने जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार अक्कलकोट तालुक्यातील कल्लकर्जाळ येथील हरळय्यावस्ती जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेस संस्थेचे चेअरमन रामचंद्र यादव यांच्या अध्यक्षतेखाली देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष राणी व्हनमाने, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे माजी अध्यक्ष तथा राज्य शिक्षक संघाचे सल्लागार बाळासाहेब काळे व महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीचे माजी अध्यक्ष अंकुश काळे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे कार्यकारी अध्यक्ष म. ज. मोरे, माजी चेअरमन तथा जिल्हाध्यक्ष शिक्षक संघ वीरभद्र यादवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण सदरखेड व उपशिक्षक प्रकाश विजापुरे यांना प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह, धनादेश, शाल, पुष्पहार घालून गौरवण्यात आले. यावेळी बाबुशा कोडते, सिद्धाराम कोळी, विवेक ईश्वरकट्टी, जितेंद्र ईश्र्वरकट्टी, श्रीशैल उमदी, आपाशा कोडते, समीर शेख, मैनोद्दीन बिराजदार, आकाश कोडते, सुभाष कोळी, महेश ईश्वरकट्टी आदी उपस्थित होते.

### जळगाव येथे ग्राहक पंचायतीच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रम

**पंढरपूर, दि.२७ सप्टेंबर-**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ २८,२९ सप्टेंबर रोजी गांधी तीर्थ, जैन हिल्स, जळगाव येथे जलसंपदा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी सांगितले. ग्राहक हितासाठी देशभर कार्य करणारी अखिल भारतीय ग्राहक पंचायत ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांनी स्थापन केली. या कार्यक्रमाला जलसंपदा मंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, खासदार स्मिता वाघ, जैन उद्योग समुहाचे चेअरमन अशोक जैन, अ. भा ग्राहक पंचायतीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सूर्यकांत पाठक उपस्थित राहणार आहेत. २९ रोजी राष्ट्रीय सचिव अरूण देशपांडे, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य धनंजय गायकवाड, विजय सागर, विलास लेले, प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी, संघटक प्रसाद बुरांडे, सचिव संदीप जंगम, कोषाध्यक्ष विनोद भरते, समन्वयक दीपक इरकल, प्रांत सदस्य सुभाष सरदेशमुख, विजय मोहरीर, तुषार झेंडे पाटील, डॉ. अशोक काळे मार्गदर्शन करणार आहेत. यात मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल देशमुख व जिल्हा सचिव सुहास निकते यांनी सांगितले.



### सोलंकरवाडी येथे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत बियाण्यांचे वाटप

**मोडनिंब, दि. २७ सप्टेंबर-**

सोलंकरवाडी (ता. माढा) येथे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत रब्बी ज्वारी प्रात्यक्षिक योजनेचे बियानांचे वितरण करण्यात आले. शेतकऱ्यांना सरपंच बाबासाहेब पांढरे, मोडनिंब मंडळ कृषी अधिकारी जाधव यांच्या हस्ते बियाणांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कृषी पर्यवेक्षक पवार, कृषी सहाय्यक शिंदे, इंगळे, बादगुडे, मामडगे, राजाभाऊ भांगीरे, अनंता गलांडे, वामन यादव, अनिल शेंडगे, ऋतुराज माळी, साहेबराव माळी, संदिप गलांडे, शकुंतला शेंडगे, बाबासाहेब शेंडगे, संभाजी पाटील, विठ्ठल झाडकर, धनाजी राजगे, गोपाळ माळी, सोमनाथ शेंडगे यासह शेतकरी बांधव उपस्थित होते.

### उसने दिलेले पैसे मागितल्याने एकास गजाने मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**मंगळवेढा, दि.२७ सप्टेंबर-**

पत्राशेड मारण्यासाठी दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरुन एकास लोखंडी सळईने कपाळावर मारुन जखमी केल्याप्रकरणी सुहास राजकुमार पवार,सुशांत राजकुमार पवार व अन्य अज्ञात दोघाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी दीपक पवार (रा.भोसे) याने वरील आरोपीला एक वर्षांपूर्वी शेतात पत्राशेड मारणे कामी २५ हजार रुपये दिले होते. सदरचे पैसे परत मागितल्याच्या कारणावरुन वरील आरोपींनी दि.२५ रोजी ७ वाजता भोसे येथील भोसले किराणा जवळ फिर्यादीच्या कपाळावर लोखंडी सळईने मारुन गंभीर जखमी केले. तसेच इतरांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### कृष्णांत पाटील यांचे अपघातात निधन

**टेंभुर्णी, दि. २७ सप्टेंबर-**



उजनी येथील कृष्णांत सोपानराव पाटील (वय ७२) यांचे अपघाती निधन झाले. मयत कृष्णात पाटील हे माढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष रमेश पाटील यांचे वडील होत. गावामध्ये अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे म्हणून ओळखले जात. सामाजिक व धार्मिक कार्यात त्यांचा सहभाग असे. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. याबाबत टेंभुर्णी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, तपास सपोफौ माळी तर तपासिक अंमलदार पोहेकॉ तांबोळी करीत आहेत.

# 'सहकार महर्षि'चा नऊ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट

## अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील : सभासदांनी जास्तीत जास्त ऊस देऊन सहकार्य करावे

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, ता. २७ सप्टेंबर-**

सहकार महर्षी कारखान्याने या हंगामात नऊ लाख मे. टन उद्दिष्ट ठेवले असून सभासदांनी जास्तीत जास्त ऊस गाळपास देऊन सहकार्य करावे असे आवाहन अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांनी केले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याची ६४ वी विधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील बोलत होते. यावेळी कारखान्याचे जेष्ठ संचालक तथा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, उपाध्यक्ष शंकरराव माने-देशमुख, माजी उपाध्यक्ष रामचंद्र सावंत पाटील, प्रताप पाटील, दत्तात्रय भिलारे, आजी-माजी संचालक, कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले उपस्थित होते. अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील पुढे म्हणाले, सहकार महर्षी कारखान्याने सभासद व कारखान्याच्या हिताचे निर्णय घेतले, ऊस विकास, ठिबक सिंचन आदी कार्यक्रमराबवले. त्याचबरोबर दुष्काळात पाणीवाटप, कोरोना काळात मदत असे अनेक सामाजिक उपक्रम राबविले असल्याचे सांगत कारखान्याने केवळ उसापासून साखर निर्मिती हा उद्देश डोळ्यापुढे न ठेवता सामाजिक हित जपण्याचाही प्रयत्न केला आहे शेतकरी कल्याण निधी व कामगार कल्याण निधी मधून अनेकांना लग्नकार्य तसेच औषध उपचारासाठी उपयोग झाला आहे. ज्यादा ऊस दर देऊन कारखाना मोडीत काढण्यापेक्षा सहकारी साखर कारखाना सुस्थितीत टिकावा यासाठी योग्य नियोजन करून चांगला दर देणार असून अजून दोन वर्षानंतर कारखाना एकदम सुस्थितीत जाणार आहे असल्याचे सांगितले. ज्यादा दर देण्याच्या स्पर्धेत अनेक कारखाने मोडीत निघाले असून भांडवलदारांच्या घशात गेले आहेत.



खासदारपदी निवड झाल्याबद्दल धैर्यशील मोहिते पाटील यांचा कारखान्याच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला तसेच एकरी जादा उस उत्पादन केल्याबद्दल मोहन पवार (मळोली), आगतराव गायकवाड (पिसेवाडी), माधव चव्हाण (तोंडले), माधवराव ताटे (संगम), नामदेव ठवरे (डोंबाळवाडी), लक्ष्मण मगर, रावसाहेब मगर (निमगाव मगराचे), दीपक जाधव (बाभुळगांव), विराज पाटील (बोरगांव), बंडू निकम (चौंडेश्वरवाडी), लालासाहेब मिसाळ (वाघोली), डिस्टलरी विभागात वसंतदादा इस्टिट्युटचा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल कारखान्याचे डिस्टलरी मॅनेजर धैर्यशील रणवरे व बेस्ट चिफ इंजिनीअर पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल चिफ इंजिनीअर सूर्यकांत गोडसे यांचा प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. आभार डॉ सुभाष कटके यांनी मानले.

### ११ विषय एकमताने मंजूर

विषयाचे वाचन कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी केले. विषय पत्रिकेवरील सर्व ११ विषय एकमताने मंजूर करण्यात येऊन वार्षिक सभा अत्यंत खेळीमेळीचे वातावरणात संपन्न झाली.

# वैराग नगरपंचायतीकडून भाडेवाढीचा निर्णय मागे

### व्यापाऱ्यांच्या विरोधानंतर प्रशासनाचा निर्णय; सर्वस्तरातून समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २७ सप्टेंबर-**

वैराग नगरपंचायतीने दुप्पट भाडेवाढ केल्यामुळे व्यापाऱ्यांवी लाक्षणिक उपोषण करण्याची घोषणा केली होती. दरम्यान, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांनी २५ सप्टेंबर रोजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांसोबत एक बैठक आयोजित केली. या बैठकीत गाळाधारकांचे मुद्दे ऐकून भाडेवाढ रद्द करण्याचा निर्णय घेतला गेला.

पत्रात उल्लेख करण्यात आले आहे की, १ एप्रिल २०२४ पासून मूळ भाडे रक्कमेला १० टक्के वाढ करून एकूण रक्कमेस जीएसटी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव आगामी सर्वसाधारण सभेत चर्चिला जाईल. यामुळे व्यापाऱ्यांनी त्यांच्या उपोषणाची योजना रद्द केली आहे.वैराग नगरपंचायतीच्या भाडेवाढीच्या निर्णयामुळे त्यांचे व्यवसाय मोठ्या प्रमाणात कमी झाले आहेत. विशेषतः संतानाथ सहकारी साखर कारखाना बंद झाल्यामुळे या शहरावर मोठा आर्थिक दबाव आला आहे. गाळाधारकांनी या प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे आणि या समस्येची यथाशीघ्र सोडवणूक होईल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.




# अक्कलकोट पंचायत समितीसमोर कडाडल्या हलग्या

## अपहाराची चौकशी करा, भ्रष्टाचारी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ सप्टेंबर-**

अक्कलकोट पंचायत समितीमध्ये भ्रष्टाचार बोकाळला असून, त्याची चौकशी करावी आणि अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मुसक्या आवळून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी पंचायत समितीसमोर गुरवारी दुपारी महविकास आघाडीने हलगीनाद आंदोलन केले.

पंचायत समिती, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बांधकाम कार्यालय आणि सार्वजनिक बांधकाम कार्यालय अक्कलकोट येथे रस्त्याची झालेली निकृष्ट कामे हे भ्रष्टाचार झाल्यासे सिद्ध करत आहेत. यामुळे त्याची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. याबाबत गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, जि. प. चे माजी कृषी सभापती मल्लिकार्जुन पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष बंदेनवाज कोरबू, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अश्फाक बळोरगी, सुनिल कटारे, रईस टिवाला, राम समाणे, शिवानंद बिराजदार, अरूण जाधव, मैनुद्दीन कोरबू, शरण सुरवसे, महांतेश हत्तुरे, बबन जमादार, मुबारक कोरबू, अलिबाशा अत्तार, मोहसीन मोकाशी, स्वामीनाथ कलकोटे, कुमार गद्दी, विक्रम पवार, जब्बार बागवान, गणेश मोरे, श्रीशैल धनशेट्टी, राहुल भकरे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी सांगोल्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ सप्टेंबर-**

बेकायदा जमाव जमवून जमावबंदी आदेशाचा तसेच धरणे आंदोलन,मोर्चा, निदर्शने,उपोषण करण्यास निर्बंध असताना सोलापूर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी सांगोला पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सांगोला पोलीस स्टेशनचे पोना नागनाथ वाकीटोळ यांच्या फिर्यादीवरून दिलीप जानकर, नवनाथ शिंगाडे, डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, विष्णू देशमुख, बिरुदेव शिंगाडे, शंकर मेटकरी (सर्व रा. सांगोला), परमेश्वर जानकर (रा.महिम), बालाजी येडगे (रा. महूद) व इतर २० ते २५ इसम यांनी २३ सप्टेंबर रोजी सकाळी साडेअकरा ते सव्वाबाराच्या सुमारास सांगोला-पंढरपूर हायवेवर पंचायत समितीसमोर धनगर समाजाला लवकरात लवकर एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे व पंढरपूर येथे उपोषणास बसलेले धनगर समाजातील समाज बांधवांना पाठिंबा म्हणून रोडवर बसून घोषणा देत रोडवरून जाणाऱ्या वाहनांना मज्जाव करून बेकायदा जमाव जमवून जमावबंदी आदेशाचा तसेच धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यास निर्बंध असताना सोलापूर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनकढाळ टोलनाका येथील आंदोलना प्रकरणी पोकॉ धुळदेव चोरमले यांच्या फिर्यादीवरून उल्हास धायगुडे (रा. बलवडी), आनंदकुमार मेटकरी (रा. सांगोला), तुकाराम माने (रा. सावे), राजू लवटे (रा.लोटेवाडी), उमाजी खरात, समाधान बंडगर (रा. कमलापूर) व इतर २० ते २५ इसम यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घेरडी येथील आंदोलना प्रकरणी पोना.अंकुश नलवडे यांच्या फिर्यादीवरून श्रीनिवास करे,रामचंद्र घुटुकडे, रघु घुटुकडे, बिरा निमगेर, दादासो करे, बयाजी लवटे, दिलीप मोठे, अनिल मोठे, हरिभाऊ पुकले, यशवंत पुकले, गोविंद कोळेकर, रामचंद्र घुटुकडे, सुरेश देवकते, राजाराम घुटुकडे (सर्व रा. घेरडी) व इतर २० ते २५ इसम यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अक्कलकोट बसस्थानक चिखलात!

## स्थानिकांसह प्रवाशांना सोसावा लागतोय त्रास

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ सप्टेंबर-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीतील बसस्थानक हे चिखलाने वेढल्याने प्रवासी वर्गाची मोठी तारांबळ उडत असून प्रवाशांना या चिखलातूनच मार्ग काढावा लागत आहे. यामुळे त्यांना नाहक त्रास सोसावा लागत आहे.

याबाबत सामाजिक संघटनांनी आवाज उठवूनही राज्य परिवहन महामंडळ याकडे लक्ष देण्यास तयार नसल्याने प्रवासी वर्गातून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. अक्कलकोट शहरात नव्याने बसस्थानक बांधणीचे काम जोरदार सुरू आहे. राज्य परिवहन महामंडळाकडून तात्पुरत्या स्वरूपात बसस्थानकाची उभारणी केली आहे. पण या बसस्थानक परिसरात सध्या चिखलाचे साम्राज्य पसरले असून ठिकठिकाणी पाण्याचे डबके साचले आहेत. या चिखलातूनच महिला तसेच वयोवृद्ध, लहान मुले, शालेय विद्यार्थी-विद्यार्थिनी या प्रवाशांना रस्ता शोधावा लागत आहे. तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीत श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी राज्यासह देशभरातून हजारो भाविक येत असतात. एसटी बसमधून येणाऱ्या भाविकांची मोठी संख्या आहे. अक्कलकोट बसस्थानकात उतरल्यानंतर या परगावच्या भाविकांना आपण तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरीतच आहोत की आणखीन वेगळ्या ठिकाणी आहोत, हा प्रश्न पडतो.

परगावच्या भाविक तसेच अक्कलकोट तालुक्यातील व कर्नाटकातील आळंद, गुलबर्गा-कलबुर्गी, अफजलपूर आदी ठिकाणचे प्रवासी हे अक्कलकोट बसस्थानकातूनच सोलापूरसह इतर ठिकाणी प्रवासासाठी जात असतात. बसस्थानक परिसर हा चिखलमुक्त करण्यासाठी सामाजिक संघटनांनी आंदोलन केले आहे. पण राज्य परिवहन महामंडळाला कोणाच्याच मागणीचे सोयरसुतक नसल्याचे दिसत आहे. सध्या पावसाळा असून परतीचा मोठा पाऊस सर्वत्र पडत आहे. या पावसामुळे अक्कलकोट बसस्थानक परिसरात चिखल साचून ठिकठिकाणी पाण्याचे डबके साचले आहेत.

या चिखलातून मार्ग काढताना अबालवद्ध प्रवासी बांधवांची त्रिधा तिरपीट उडत आहे. याकडे आगार प्रमुखांचे लक्ष, ना राज्य परिवहन महामंडळाचे. बसस्थानकातील या परिस्थितीकडे एसटी महामंडळ लक्ष देत नसल्याने हजारो प्रवाशांमधून संताप व्यक्त केला जात आहे. नवीन बसस्थानक सुरू होईपर्यंत या तात्पुरत्या बसस्थानकात प्रवाशांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी प्रवासी वर्गातून केली जात आहे.





# भारतीय ज्ञान संस्कृतीमधून जीवनाचे तत्त्वज्ञान आकार घेते : प्रा. पालके

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ सप्टेंबर-**

भारतीय ज्ञान संस्कृतीत समृद्धता व विविधता असून त्यामधून जीवनाचे तत्त्वज्ञान आकार घेते, असा विचार प्रा. राहुल पालके यांनी प्रकल्प भेटी दरम्यान मांडला.

भारतीय ज्ञान व्यवस्था (आयकेएस) या विषयावर बी.ए भाग- १ च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे संत व समाजसुधारक अभ्यास केंद्रास प्रकल्प भेट दिल्यानंतर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी ग्रंथपाल राहुल कुलकर्णी, घावटे सर उपस्थित होते. या भेटी दरम्यान विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या ग्रंथदालनाची ओळख करुन देण्यात आली.

पुढे बोलताना प्रा. पालके म्हणाले, भारतीय ज्ञान परंपरा समृद्ध असून भारत वर्षाचा इतिहास समजून घेणे महत्त्वाचे आहे. विविधेत एकता ही भारताची ओळख असून प्रत्येक धर्माचा हिंदू, बौद्ध, जैन, इस्लाम , शीख इ. अभ्यास चिकित्सपणे करणे ही काळाची गरज असल्याचे त्याने प्रतिपादन केले. त्याचबरोबर भारतीय ललित कलांची परंपराही सांगितली. ग्रंथपाल कुलकर्णी यांनी विविध धर्मग्रंथांची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. तसेच संत व समाजसुधारकांची कामगिरी स्पष्ट केली. अभ्यास केंद्राचे महत्त्व विषद करुन विद्यार्थ्यांना विविध विषयावरील दुर्मिळ ग्रंथांची ओळख करुन दिली. घावटे सरांनी वेद व महाकाव्यांची माहिती दिली. मराठी विश्वकोष व मराठी व्युत्पत्ती कोश कसा वापरावा याची मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना या प्रकल्पातून भारतीय ज्ञान परंपरेची ओळख झाली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विधानसभा निवडणूक प्रक्रिया माळशिरस येथेच व्हावी : ओवाळ

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २७ सप्टेंबर-**

आगामी विधानसभा निवडणूक माळशिरस येथे होण्याऐवजी निवडणूक प्रक्रियेत सहभागी पोलीस प्रशासन व अधिकारी-कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असल्यामुळे, अकलूज शहरात घेण्याच्या माळशिरस महसूल प्रशासनाच्या हालचाली सुरू आहेत.



याबाबत महसूल नायब तहसीलदार सिद्धनाथ जावीर यांच्याकडे सुनील ओवाळ यांनी निवेदन दिले. यावेळी विलास भोसले, श्रीकांत सावंत, योगेश सुळे, मारुती शिंदे, राजू सोरटे आदी उपस्थित होते. वास्तविक पाहता ब्रिटिश काळापासून माळशिरस शहरात महसूल विभागाचे तहसील कार्यालय कार्यरत आहे. तहसील कार्यालय स्थापन झाल्यापासून आजपर्यंत माळशिरस शहरात विधानसभेसह, ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पडतात. मात्र, कधीही या ठिकाणी निवडणुकांना गालबोट लागलं आहे. असे घडले नाही. मात्र, सध्या महसूल विभागाचे म्हणण्यानुसार माळशिरस येथे अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवडणूकदरम्यान गैरसोय होत असून, ही गैरसोय दूर करण्यासाठी अकलूज येथे विधानसभा निवडणूक घेण्याचा त्यांचा मानस आहे. याला आतापासूनच विरोध होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### पंढरपूर एज्युकेशन सेवक पतसंस्थेतर्फे सभासदांना ७ टक्के लाभांश : चेअरमन धोकटे

**पंढरपूर, दि.२७ सप्टेंबर-**

येथील कवठेकर प्रशाला, द. ह. कवठेकर प्रशाला, अध्यापक विद्यालयातील पंढरपूर एज्युकेशन सेवक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन राजेश धोकटे होते. यावेळी सभासदांना ७ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. यावेळी सभासदांच्या दहावी व बारावीतील उत्तीर्ण झालेल्या मुला-मुलींचा पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. माजी संचालक गजेंद्र पवार यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. नूतन संचालकांचा सत्कार करण्यात आला. अहवाल वाचन सुधीर मागाडे यांनी केले. संस्थेचे सभासद बडवे, नरेंद्र भंडारकवठेकर यांनी संस्थेच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले. यावेळी व्हा. चेअरमन प्राचार्य एच. आर. वाघमारे, सचिव सुधीर मागाडे, संचालक व्ही. एम. कुलकर्णी, प्रशांत मोरे, दत्तात्रय पाटोळे, गावडे, अमित वाडेकर, तानाजी लिंगडे, स्वप्नजा मोहिते, ज्योती उत्पात उपस्थित होते. सर्वसाधारण कर्जाची मर्यादा १४ लाख रुपये तर तातडीच्या कर्जाची मर्यादा दोन लाख रुपये ठेवण्यात आली. व्याजदर ८ टक्के इतका ठरवण्यात आला.



### भेंड येथे सौर कीटक सापळाचे वितरण

**मोडनिंब, दि. २७ सप्टेंबर-**

भेंड (ता. माढा) येथे युनिवर्सल सेंद्रिय शेतकरी गटाच्या वतीने शेतकऱ्यांना एकूण ७० सौर कीटक सापळाचे वितरण करण्यात आले. माढा कृषी अधिकारी बी. डी. कदम अध्यक्षस्थानी होते. सरपंच डॉ. संतोष दळवी, गटाचे अध्यक्ष सुभाष पाटील, सुर्वे, निकम, आत्माचे जिने, सागर रामदासी, अनिलकुमार सिंग, कृष्णपाल परमार यासह शेतकरी उपस्थित होते. प्रारंभी डॉ. संतोष दळवी यांनी भेंड येथील शेतकरी हा सतत नाविन्यपूर्ण प्रात्यक्षिकात व प्रयोगात आघाडीवर असल्याचे त्यांनी सांगितले. पाटील यांनी सौर कीटक सापळ्याविषयी माहिती दिली. कदम यांनी शेतकऱ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमासाठी शेतकरी सचिन सावंत, भैरवनाथ मते, केशव आवटे, अंकुश सावंत, जयसिंग दळवी, अजित दळवी यांनी परिश्रम घेतले. तालुका कृषी अधिकारी कदम यांनी प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. मिलेटच्या प्रात्यक्षिक असलेल्या क्षेत्राला भेट देऊन कामाचे कौतुक केले.




### पंढरपूरच्या कर्मयोगी इन्स्टिट्यूटच्या सहा विद्यार्थ्यांची पुण्याच्या कंपनीत निवड

**पंढरपूर, दि. २७ सप्टेंबर-**

श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (अभियांत्रिकी) महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची पुणे येथील आयटी प्रेन्युअर कंपनीमध्ये निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस पी पाटील यांनी दिली. वृशाली बाबर, संजीवनी बाबळसुरे, विशाल चव्हाण, मनीषा म्हेत्रे, प्रज्ञा कळकुंबे व श्रुती ठाकरे या विद्यार्थ्यांची निवड केली आहे. श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक, प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील, प्राचार्य डॉ. ए. बी. कणसे, रजीस्ट्रार जी. डी. वाळके, उपप्राचार्य प्रा. जे. एल. मुडेगावकर, प्रा. मोहसीन शेख, डॉ. अभय उत्पात, प्रा. आशीष जोशी, प्रा. अनिल बाबर, डॉ. एस. व्ही. एकलारकर, प्रा. दीपक भोसले, प्रा. एस. एम. लंबे, प्रा. अभिनंदन देशमाने, प्रा. सुशील कुलकर्णी, प्रा. व्ही. एल. जगताप, प्रा. दत्तात्रय चौगुले, प्रा. योगेश माने यांनी अभिनंदन केले.

### किशोर चौधरी यांची कनिष्ठ अभियंतापदी नियुक्ती



**वैराग, दि. २७ सप्टेंबर-**

वैराग येथील किशोर रामभाऊ चौधरी यांची सोलापूर जिल्हा परिषदेंतर्गत घेण्यात आलेल्या परीक्षेत कनिष्ठ अभियंतापदी निवड झाली आहे. किशोर रामभाऊ चौधरी हे यापूर्वी भारतीय लष्कर दलातून सेवानिवृत्त झाले होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या व इतर स्पर्धा परीक्षा दिल्या होत्या. एकदम पाच पदांवर त्यांची निवड झाली होती. सध्या ते मोहोळ पंचायत समिती येथे कनिष्ठ क्लर्क म्हणून कार्यरत आहेत. आता त्या पदाचा राजीनामा देऊन कनिष्ठ अभियंतापदी रुजू होणार आहेत.

### वक्तृत्व स्पर्धेत अंकोलीची सृष्टी रणदिवे प्रथम



**सोलापूर, दि. २७ सप्टेंबर-**

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त घेतलेल्या आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत अंकोली येथील भैरवनाथ विद्यालयातील विद्यार्थिनी सृष्टी दशरथ रणदिवे हिने प्रथम क्रमांक मिळविला. तिच्या या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य डी. टी. मोहिते, स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्या बाबासाहेब क्षीरसागर, सज्जनराव पवार, संग्रामसिंह पवार, माजी सरपंच काकासाहेब पवार, सरपंच पांडुरंग येळवे यांनी तिचे अभिनंदन केले.

# दुधात पाणी अन् अनुदानरूपी सायचे प्रलोभन

## १ ऑक्टोबरपासून प्रत्यक्ष दूध दर प्रति लिटर दोन रुपयांनी कमी तर दोन रुपये अनुदानात वाढ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना खासगी व सहकारी दूध संघ ३० रुपये प्रति लिटर दूध दर देऊन अवघे तीन महिने उलटले नाही तर १ ऑक्टोंबरपासून प्रत्यक्ष दर प्रति लिटर २ रुपयांनी कमी करून अनुदानाची २ रुपयांच्या कुबडीत वाढ करण्याचे सरकारने जाहीर केले आहे. हा प्रकार म्हणजे दुधात पाणी ओतून सायचे प्रलोभन दाखवण्याचाच प्रयत्न असल्याचा आरोप दूध उत्पादक करत आहेत.

जिल्ह्यासह राज्यातील सहकारी आणि खासगी दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर २५ रुपयांपासून पासून २७ रुपये असा दर मिळत होता. या दरामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही भागत नाही. यामध्ये पशुखाद्यांचे दर वाढल्यामुळे व्यवसाय पूर्ण मोडकळीस येऊ लागला आहे. यासाठी राज्यातील दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना खासगी व सहकारी दूध संघ प्रति लिटर ३.५ फॅट आणि ८.५ एमएसएफसाठी ३० रुपये दर व राज्य सरकार ५ रुपये अनुदान असे एकूण ३५ रुपये प्रति लिटर दर सरकारने जाहीर केला. पण हा दर शेतकऱ्यांना १ जुलैपासून देण्याची घोषणा दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केली. पण शेतकऱ्यांच्या पदरात हा दर उशिराच पडला आणि अनुदान सर्व शेतकऱ्यांना अजूनही मिळाले नाहीच. सरकारकडून दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानाचे पैसे मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. खासगी व सहकारी दूध संघावर सरकारचे नियंत्रण नसल्याने दूध व्यवसायातील अडचणी खूप वाढल्या आहेत. ३० रुपये प्रति लिटर दर खासगी आणि सहकारी दूध संघ शेतकऱ्यांना द्यायला तयार नसून २८ रुपये प्रति लिटर दरावर ठाम आहेत. या भूमिकेमुळे १ ऑक्टोबरपासून शेतकऱ्यांना खासगी व सहकारी दूध संघाकडून २८ रुपये प्रति लिटर दर मिळणार आहे तर अनुदानापोटी ५ ऐवजी ७ रुपये प्रति लिटर सरकारकडून मिळणार आहे. या दुधाच्या निर्णयावरून सिद्ध होत असून सरकारकडून दूध उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचे काम सुरू आहे, हे सरकार शेतकरी विरोधी असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांना अगोदर पशुखाद्य, चाऱ्याला पैसे मोजावे लागतात. अनुदानाचा अजूनही पत्ता नाही. अशा अवस्थेमध्ये पदरमोड करून तोट्यामध्ये शेतकऱ्यांना दूध व्यवसाय करावा लागत आहे. सरकारने गांभीर्याने प्रश्न सोडविला नाही तर दूध व्यवसाय मोडून पडल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्याची शेताच्या बांधावर काय अवस्था आहे. हे राज्यात सत्तेत बसलेल्या सत्ताधाऱ्यांना कळत कसं नाही. त्याठिकाणी बसून ते वाटेल तो निर्णय घेत आहे. अशामुळे राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांची प्रचंड अडचण निर्माण झाली आहे.

### रस्त्यावर उतरण्याचा इशारा

सरकार जर अशा पद्धतीने शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळणार असेल तर दूध उत्पादकांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. सरकारने १ जुलैपासून ३.५ फॅट ८.५ एसएनएफला ३० रुपये दर व ५ रुपये अनुदानाची घोषणा केली होती. हे एक जुलैचे अनुदान बहुतांश शेतकऱ्यांना मिळालेले नाही. याआधी देखील अनुदानापासून अनेक शेतकरी वंचित राहिले आहेत.



# अनिल सावंतांनी फुंकले विधानसभेचे रणशिंग

## खेळ पैठणीच्या कार्यक्रमात महिलांशी साधला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ सप्टेंबर-**




महिलांना आपले कौशल्य, कलागुणांना, हक्काचं व्यासपीठ मिळालं यासाठी भैरवनाथ शुगर्सचे चेअरमन अनिल सावंत यांच्याकडून गुरुवारी दुपारी होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रम पंढरपुरात झाला. यानिमित्ताने त्यांनी विधानसभेचेच रणशिंग फुंकल्याची चर्चा सुरु आहे. उपस्थित प्रत्येक महिलेस साडी वाटप करण्यात आले.

यावेळी भैरवनाथ शुगर्सचे मॅनेजमेंट डायरेक्टर शिंदे, शेतीअधिकारी रमेश पवार, कृष्णदेव लोंढे, एचआर मॅनेजर राठोड, अशोक निकम उपस्थित होते. अनिल सावंत यांच्याकडून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला. याबरोबरच पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघातील पिण्याच्या, शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडविणार, तरुणाच्या रोजगाराचा प्रश्न, शहरातील अंतर्गत रस्ते, स्वच्छता या सगळ्या समस्या मी सोडवेल.

तरुणांना रोजगार मिळावा यासाठी आपण रोजगार मेळाव्याचे आयोजन करतोय, यासह त्यांनी विविध हमी दिली. कपाळावर बिस्कीट ठेवून खाणे, तळ्यात मळ्यात, डान्स रॅम्प वॉक असे खेळ घेण्यात आले. सर्व विजेत्या महिलांना बक्षीस वितरण अनिल सावंत आणि पत्नी शैलजा सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन पूजा काळभोर यांनी केले.

### विजेत्या महिलांची नावे आणि त्यांना मिळालेली बक्षिसे

प्रथम पूजा शिंदे, पंढरपूर (रॅम्प वॉक स्पर्धेत प्रथम क्रमांक) एलईडी टिव्ही. व्दितीय अमृता शिंदे, पंढरपूर (दोरी उडी) शिलाई मशीन. तृतीय रेश्मा साळुंखे पंढरपूर, (तळ्यात-मळ्यात स्पर्धा) वॉशिंग मशीन. चौथा सपना साळुंखे, मंगळवेढा (तळ्यात मळ्यात स्पर्धा ) पिठाची चक्की. पाचवा निकिता साठे, बोहाळी (ता. पंढरपूर) (कच्चा पापड पक्का पापड स्पर्धा) फ्रीज.

# पिलीव परिसरात परतीच्या पावसाने समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव व आसपासच्या परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून परतीच्या पावसाने चांगली हजेरी लावली आहे. यामुळे सध्या शेतकरी सुखावला असून सुरुवातीला दडी मारल्यामुळे चिंतेत असणाऱ्या बळीराजाला सध्या परतीच्या पावसाची चांगली अपेक्षा आहे.

गौरी-गणपती सणाच्या वेळेस दडी मारलेल्या पावसाने गणपती विसर्जनानंतर मात्र चांगलीच हजेरी लावली आहे. सध्या कुसमोड, झिंजेंवस्ती, काळमवाडी या भागात समाधान कारक पाऊस पडत आहे पण सध्या पिलीव, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी या दुष्काळी पट्ट्यातील गावात परतीचा जोरदार पाऊस पडणे गरजेचे आहे. आता परतीचा जोरदार पाऊस पडून या भागातील तलाव, बंधारे, तळी भरली तरच शेतीच्या व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. यामुळे सध्या जरी पाऊस पडत असला तरी या भागातील शेतकऱ्यांना अपेक्षा आहे ती जोरदार पावसाची सध्या तसे वातावरण अनुकूल आहे. येत्या २६ सप्टेंबर पासून हस्त नक्षत्राला सुरूवात होत आहे. या नक्षत्रात जोरदार पावसाची अपेक्षा हवामान खात्याने सुद्धा सध्या परतीच्या पावसाचा चांगला पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. सध्या पिलीव परिसरात परतीच्या पावसाची वाटचाल चांगली आहे योग्य वातावरण आहे यामुळे जोरदार पाऊस अपेक्षित आहे.

> सध्या सुळेवाडी भागात परतीचा पाऊस थोडाफार पडत आहे . यामुळे खरीपातील पिके आली आहेत. पण परतीचा जोरदार पाऊस पडला तरच पुढील हंगाम चांगले जाणार आहेत. अजूनही या भागातील तळी, बंधारे भरलेच नाहीत. शेवटच्या दहा-पंधरा दिवसांत जोरदार पाऊस होण्याची अपेक्षा आहेत. तरच पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.
>
> **- भानुदास सुळे, सामाजिक कार्यकर्ते**

# सामाजिक शास्त्रांमधून मानवी वर्तनाचा अभ्यास : प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण

**तभा वृतसेवा,**
**मंद्रुप, दि. २७ सप्टेंबर-**

जी शास्त्रे नैसर्गिक अथवा भौतिक नाहीत ती सर्व सामाजिक शास्त्रे आहेत. सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करणाऱ्यांनी समाजाकडे डोळसपणे पाहिले पाहिजे. मानवी समाज, संस्था, मनोव्यापार, वर्तनाचा अभ्यास सामाजिक शास्त्रे करतात, असे प्रतिपादन प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी केले.




ते मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे होते. यावेळी डॉ. चव्हाण म्हणाले, सामाजिक शास्त्रांचा नीटपणे अभ्यास केल्यास समाजातील विकृतीवर मात करता येईल. समाजात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा व्यक्तीवर परिणाम होत असतो. कोणत्याही गोष्टीकडे, निर्णयाकडे उथळपणे न पाहता त्याचा खोलवर आणि सर्वांगिण विचार करून आपले मत बनवले पाहिजे. नव्या धोरणात सामाजिक शास्त्रे मरणावस्थे कडे जात आहेत. यातून इतिहासकार, साहित्यिक राहणार नाहीत.

प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे म्हणाले, सामाजिक शास्त्रातून समाजात घडणाऱ्या गोष्टींकडे निकोपणणे पाहण्याचे भान निर्माण केले पाहिजे. सर्व सामाजिक शास्त्रे आपल्या रोजच्या जीवनाशी निगडित आहेत. त्याच्या अभ्यासातून समाजाला दिशा देण्याचे काम अभ्यासकांनी करणे अपेक्षित आहे. सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाचे समन्वयक प्रा. एम. पी. कसबे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मारुती हजारे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. आर. एम. मोरे यांनी आभार मानले. या वेळी प्रा. डॉ. पी. के. लभाणे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# सामाजिक वनीकरण विभागाच्या भ्रष्टाचाराविरोधात मुंडन आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ सप्टेंबर-**

सामाजिक वनीकरण विभागाच्या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी सोलापूरच्या पूनम गेट येथे लहुजी शक्ती सेनेने मुंडन आंदोलन केले.



अक्कलकोट तालुक्यात सामाजिक वनीकरण विभागात विविध योजनेत मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा झाला आहे. त्या संदर्भात गतवर्षी चौकशी समितीने केवळ रस्ता दुतर्फाची चौकशी करून एका वनपालाला जबाबदार धरले. मात्र संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल यांच्या कार्यकाळातील कामाची कोणतीच चौकशी केली नाही. अक्कलकोट तालुक्यातील चार एनटीपीसीची तपासणी, स्थळ पाहणी, अनुदान, त्यावर झालेला सविस्तर खर्च याचा कोणताच अहवाल चौकशी समितीने सादर केलेला नाही. तो सर्व अहवाल मिळावा यासाठी लहुजी शक्ती सेना संघटनेकडून तीव्र स्वरूपात विविध प्रकारची आंदोलने पूनम गेट जि. प. समोर सुरू केले आहे. संघटनेकडून अर्धनग्न आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी दिली. २०१७ ते २०२३ आर्थिक वर्षात सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यासह इतर दहा तालुक्यातील एनटीपीसी, गट लागवड, वृक्ष लागवड, रस्ता दुतर्फा यासाठी मिळालेला निधी, त्यावर झालेला सविस्तर खर्च संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी, वनपालांच्या कामाची फेरचौकशी करण्याची मागणी वसंत देडे यांनी केली आहे.

# जिल्ह्यात तब्बल 10 हजार १८४ लाभार्थी

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील : पंढरपुरात मराठा उद्योजकांचा जिल्हास्तरीय लाभार्थी मेळावा, पंढरीत उद्या उपकेंद्राचे उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ सप्टेंबर-**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्रात १ लाख मराठा उद्योजक संख्या पूर्ण झाली आहे. महामंडळाचे १ लाख लाभार्थी उद्योजकांची संकल्पपूर्ती करण्यात आली आहे. जिल्ह्यात १० हजार १८४ लाभार्थी आहेत. आणखी मराठा उद्योजकांची संख्या वाढावी. उद्योग व्यवसाय वाढीस लागावेत. या दृष्टीने यानिमित्त मराठा उद्योजकांचा जिल्हास्तरीय लाभार्थी मेळावा आणि पंढरपूर उपकेंद्राच्या उद्घाटनाचा कार्यक्रम दि. २९ रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित पंढरपूर येथे आयोजित केल्याची माहिती महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी दिली.

महामंडळ योजनांच्या माध्यमातून आजपर्यंत १,०७२१३ लाभार्थी झाले असून, ८९९० कोटी रुपये विविध बँकांनी कर्ज वितरित केले आहे. त्यापैकी महामंडळाने ८६७ कोटी रुपये व्याज परतावा केला आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजने अंतर्गत उत्कृष्ट काम केलेल्या बँकांचा सत्कार व तसेच नाविन्य पूर्ण व्यवसाय करणाऱ्या लाभार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. १ लाख लाभार्थी उद्योजकांची संकल्पपूर्ती मेळाव्यात महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी मंत्री महोदय यांच्याबरोबर शासनाच्या



विविध विभागाचे अधिकारी, नॅशनल बँक, खाजगी बँक, व सहकारी बँकांचे प्रमुख, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, अधिकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी, लाभार्थी यांनी तसेच अन्य संबंधितांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्रात १ लाख मराठा उद्योजक संख्या पूर्ण झाली. त्यानिमित्त १ लाख मराठा उद्योजक जिल्हास्तरीय लाभार्थी मेळावा अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाने आयोजित केला आहे. दि. २९ रोजी मेळावा व पंढरपूर येथील उपकेंद्र उद्घाटनास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, आ. समाधान आवताडे, त्याचबरोबर जिल्ह्यातील आमदार उपस्थित असणार आहेत. उपकेंद्र उद्घाटन सकाळी १० वा. हॉल क्र.७, इंदिरा गांधी चौक, शॉपिंग सेंटर, लोकमंगल बँकेच्या शेजारी पंढरपूर या ठिकाणी होणार आहे. तर मेळावा सकाळी १०:३० वा. श्रीयश पॅलेस ,कोर्टी रोड पंढरपूर या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.

### सोलापूर जिल्ह्यात ७९ कोटी व्याज परतावा

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनांच्या माध्यमातून आजपर्यंत सोलापूर जिल्ह्यात १०१८४ लाभार्थी झाले असून ८१५ कोटी रुपये विविध बँकांनी कर्ज वितरित केले आहे व त्यापैकी महामंडळाने ७९ कोटी पेक्षा जास्तीचा व्याजपरतावा केला असल्याचे नरेंद्र पाटील यांनी सांगितले.

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अनंतदास महाराज पुण्यतिथीनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ सप्टेंबर -**
प.पू.श्री अनंत दास महाराजांच्या ६१ व्या पुण्यतिथी निमित्त मंडळाच्या वतीने बालवाडी ते दहावी पर्यंतच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी गट निहाय विविध स्पर्धांचे आयोजन शनिवार दि.२८ सप्टेंबर रोजी शहरातील सांजा रोड येथील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात करण्यात आले आहे.

मंडळाच्या वतीने दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, बालवाडी गट (बडबडगीत व पागंतर स्पर्धा) पहिली दुसरी करीता पाठांतर व वेशभूषा स्पर्धा, तिसरी चौथी करीता कथा कथन व रंगभरण स्पर्धा, पाचवी सहावी सातवी साठी गीत गायन चित्रकला व हस्ताक्षर स्पर्धा, आठवी नववी दहावी करीला भाषण, पीपीटरी सादरीकरण, निबंध अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. स्पर्धा शनिवार दि.२८ सप्टेंबर अनंतदास मंडळाच्या स्पर्धांचे आज आयोजन रोजी सकाळी १० वा. सुरु होणार आहेत.

तरी तालुक्यातील शाळांनी स्पर्धे करीता आपले विद्यार्थी पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन अनंतदास महाराज स्मारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील यांनी केले आहे.



## ▶▶संक्षिप्त वृत्त...



### 'भैरवनाथ'च्या वतीने स्वखर्चातुन ग्रामस्थांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय

**परंडा, दि.२७ सप्टेंबर -**
परंडा तालुक्यातील ताकमोडवाडी येथील जिल्हा परिषदे शाळेमध्ये पाण्याची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता. सदरील अडचण लक्षात घेऊन आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व जि.प. माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या नेतृत्वात भैरवनाथ उद्योग समूहाच्या वतीने आज दि.२६ रोजी बोर घेऊन पाण्याची सोय करण्यात आली. त्यामुळे ताकमोवाडी येथील शाळकरी मुलांचा व ग्रामस्तंच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. यावेळी भाऊसाहेब जेकटे, सागर जेकटे, सोमनाथ ताकमोडे, बजरंग ताकमोडे, भाऊसाहेब शिंगाडे, मुकुंद जेकटे, गोपीनाथ हगारे, रोहन ताकमोडे, सूरज ताकमोडे,हरिदास हगारे, पांडुरंग आवांळे, बाबुराव बोंद्रे, मुकुंद टिंगरे, ज्ञानेश्वर ताकमोडे यांच्यासह व ग्रामस्थ उपस्थित होते.



### भाजपा व्यापारी आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी शिवा शिंगणापूरे

**कळंब, दि.२७ सप्टेंबर -**
कळंब येथील शिवा शिंगणापुरे यांची भारतीय जनता पार्टी प्रणित व्यापार आघाडी तालुका प्रमुखपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. आ. राणाजगजितसिंह पाटील, भाजपाचे प्रदेश सरचिटणीस सुजितसिंह ठाकुर, जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, यांच्या मार्गदर्शनाखाली निवड करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अभिप्रेत असणारा आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी व पक्ष संघटण बळकट करण्यासाठी आपण जोमाने काम करावे यासाठी आपली निवड करण्यात आली आहे. भाजपाचे तालुकाध्यक्ष अजित पिंगळे, शितल चोंदे, प्रमोद लड्डा यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. निवडीबद्दल इम्रान भाई मुल्ला, युवराज धाकतोडे, युवराज पिंगळे, राहुल वाघमारे, संतोष एखंडे यांनी अभिनंदन केले आहे.

### मुल्य साखळी योजनेतून बॅटरी संचलित स्प्रेपंपाचे वाटप

**खामसवाडी, दि.२७ सप्टेंबर -**
कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे सोयाबीन अणि कापूस मुल्य साखळी योजने अंतर्गत बॅटरी ऑपरेटेड फवारणी स्प्रेपंपासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन कृषि विभाग तर्फे करण्यात आले होते.त्याअंतर्गत प्राप्त ऑनलाईन अर्जाची ऑनलाईन पद्धतीने राज्यस्तरावर सोडत होऊन लक्षांक अनुसार शेतकऱ्यांची निवड करण्यात आली होती. त्यानुसार निवड झालेल्या शेतकऱ्यांना तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांचे मार्गदर्शनाखाली बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंपाचे मोफत वाटप ग्राम पंचायत कार्यालय खामसवाडी येथे करण्यात आले. यावेळी कृषी सहाय्यक बालाजी देशमुख, अतिश नाईकवाडी व निवड झालेले शेतकरी उपस्थित होते.

### मुक्ताबाई छत्रे यांचे निधन


**जळकोट, दि.२७ सप्टेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील संभाजीनगर भागातील रहिवासी मुक्ताबाई शांतप्पा छत्रे (वय ८२) यांचे गुरुवार (दि.२६) रोजी मध्यरात्री दीडच्या सुमारास राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर जळकोट येथील मठातील स्मशानभूमीत दुपारी २.१५ च्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात २ भाऊ, १ मुलगी, ३ मुले, सूना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. तुळजापूर आगाराचे राज्य परिवहन महामंडळाचे सेवानिवृत्त चालक निळकंठ छत्रे यांच्या त्या मातोश्री होत.



# सीना कोळेगाव धरण ओव्हरफ्लो; सतरा दरवाजे उघडले

**तभा वृत्तसेवा/आप्पासाहेब शिंदे**
**परंडा, दि.२७ सप्टेंबर -**
साडेपाच टीएमसी चे जिल्ह्यातील सर्वात मोठे धरण सेना कोळेगाव शंभर टक्के भरला आहे. गुरुवार दि.२६ व २७ सप्टेंबर रोजी धरणाचे एकूण १७ दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सुरू केला आहे. त्यामुळे प्रशासनाकडून प्रकल्प परिसर व नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

२१ दरवाजांपैकी १७ दरवाजातून अंदाजे २५ ते ३० हजार क्युसेसने पाणी खाली नदी पात्रात सोडण्यात आली आहे. परंडा तालुक्यातील महत्त्वाचा असलेला सिना-कोळेगाव प्रकल्प १०० टक्के भरले आहे. त्यामुळे शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत. साडेपाच टीएमसी पाणी क्षमता असलेला हा प्रकल्प निर्मितीपासून पूर्ण क्षमतेने भरण्याची ही ८ वी वेळ आहे. हे धरण सण २०२० ते २०२१ व २०२२ असे सलग तीन वेळा हे धरण भरल्याने हॅट्रिक साधली होती. कोळेगाव या धरणाची पाणी साठवण क्षमता १५०.४९ दलघमी (साडेपाच टीएमसी) आहे. १०४.३५ दलघमी पाणीसाठा वापरता येतो तर या



धरणाचा उपयुक्त पाणीसाठा ७६.१८ दलघमी आहे.

धरणाची पूर्ण जलाशय पातळी ५०२.८०० मीटर तर माथा पातळी ५०८ मीटर आहे. या सिना-कोळेगाव प्रकल्पाच्या पाण्यावर परंडा तालुक्यातील ८ हजार ७०० हेक्टर व करमाळा तालुक्यातील ३ हजार ४०० हेक्टर असे एकूण १२ हजार १०० हेक्टर क्षेत्र भिजणारे क्षेत्र आहे.

धरण ओव्हरफ्लो झाल्यामुळे परंडा तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठा आनंद व्यक्त केला असून यावर्षी तालुक्यात मोठ्या प्रमाणात आता उसाची लागवड होऊ शकते.

## अक्षय नागरी पतसंस्था दिपस्तंभ पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ सप्टेंबर -**
शहरातील अक्षय नागरी पतसंस्थेला महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय दिपस्तंभ-२०२४ पुरस्काराने शिर्डी येथे सन्मानित करण्यात आले. पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश हिंगमिरे, उपाध्यक्ष विकास क्षीरसागर, मुख्य सचिव महादेव केसकर, संचालक भारत हिंगमिरे यांनी पुरस्कार स्विकारला.

अक्षय नागरी पतसंस्थेने अल्पावधीतच गरूडझेप घेतली आहे. मागील आर्थिक वर्षात पतसंस्थेची ५० कोटीची उलाढाल झाली आहे. संस्थेत ५ कोटीच्या ठेवी, ५.५५ कोटीचे कर्ज वाटप आहे. १०० टक्के तारणी कर्ज आहे. १०० टक्के वसुली आहे. संस्थेस १५.२७ लाखाचा नफा झाला आहे. संस्था दरवर्षी १० टक्के लाभांभ वाटप करीत आहे. संस्थेच्या कार्याची दखल घेऊन राज्यस्तरिय दिपस्तंभ पुरस्कार दिला असल्याचे संस्थेचे सचिव महादेव केसकर यांनी सांगितले.

## पाणी कधी शिळे होत नाही : डॉ. अरुण गंभीरे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२७ सप्टेंबर -**
कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे युनिसेफ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयातील ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन व वायू प्रदूषण या विषयावर शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रीन क्लब धाराशिवचे नोडल ऑफिसर व व्यकंटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय धाराशिवचे प्रा.डॉ. विनोदकुमार वायचळ कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. शामसुंदर डोके व ग्रीन क्लबचे अध्यक्ष संतोष साळुंके उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे म्हणाले कि, पाणी कधीही शिळे होत नाही तेंव्हा हि गैरसमजूत निघून जाण्यासाठी विद्यार्थांनी आपल्या परिसरामध्ये जनजागरण करावे. आमच्या महाविद्यालयामध्ये पाणी आडवा-पाणी जिरवा तसेच वायू प्रदूषणावर ग्रीन क्लबच्या माध्यमातून मोठे काम होईल असे ते



म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शामसुंदर डोके यांनी केले सूत्रसंचालन ग्रीन क्लब चे समन्वयक प्रा.डॉ पार्थराज क्षीरसागर यांनी केले तर संजीवनी जगताप हिने आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रीन क्लब चे सदस्य सुरज जगताप साक्षी फरताडे, सोहेल शेख व एम.डी. कोळी यांनी परिश्रम घेतले.

या कर्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते.

## आ. चौगुले यांच्या प्रयत्नामुळे कराळी ग्रामस्थांचा वीजेचा प्रश्न मार्गी



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२७ सप्टेंबर -**
उमरगा तालुक्यातील कराळी गावात जुन्या गावठाण रोहित्रावर अतिरिक्त भार येऊन गावात नेहमी वीजपुरवठा खंडित होत होता. विजेची वाढती गरज पाहता या गावासाठी नवीन विद्युत वितरण मंजूर करण्याची मागणी ग्राम स्थांनी आ. ज्ञानराज चौगुले यांच्याकडे केली होती.

या अनुषंगाने आ. चौगुले यांनी जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ अंतर्गत कराळी येथे नवीन १०० के.व्ही.ए. क्षमतेचे विद्युत रोहीत्रासाठी निधी उपलब्ध करू दिला आहे. शुक्रवार दि.२७ सप्टेंबर रोजी ग्रामस्थांच्या उपस्थितीत नवीन विद्युत रोहीत्र कार्यान्वित करण्यात आले. गावचा विजेचा मोठा प्रश्न सोडवल्याबद्दल ग्रामस्थांनी आ. चौगुले यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी लाईनमन सातव्या स्वामी, संदीप पवार, सरपंच सुभाष राठोड, दादाराव वडदरे, देविदास मुळे, रवी वडदरे, मारुती वडदरे, शिवाजी वडदरे, अजय जमादार, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## जागतिक फार्मासिस्ट दिन विविध उपक्रमांनी साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ सप्टेंबर -**
जागतिक फार्मासिस्ट दिनाचे औचित्य साधून उस्मानाबाद जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन आणि धाराशिव शहरातील सर्व फार्मसी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत फार्मासिस्ट रॅली, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सत्र, तसेच यावेळी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी धाराशिव शहरातील सर्व फार्मासिस्ट, औषध विक्रेते, महाविद्यालये आणि संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यालयीन व्यवस्थापक प्रसाद चिंचुरे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## नळदुर्ग बसस्थानकात चिखल; प्रवाशांचे हाल

### आण्णासाहेब दराडे यांचे बसस्थानकातील चिखलात बसून अनोखे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ सप्टेंबर -**
नळदुर्ग बसस्थानकात सर्वत्र चिखल आणि पावसाचे पाणी थांबल्यामुळे प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी आण्णासाहेब दराडे यांनी चक्क बसस्थानकातील चिखलात बसुन महामंडळ प्रशासनाचा जाहीर निषेध केला आहे.



पावसाळ्यात नळदुर्ग बसस्थानकाची अवस्था अतिशय वाईट असते. बसस्थानक परीसरात सर्वत्र मोठ्या प्रमाणात चिखल आणि पावसाचे पाणी थांबलेले असते. या चिखलातुन वाट काढत प्रवाशांना बस पकडावी लागते. यामध्ये अनेकदा प्रवाशी पाय घसरून चिखलात पडल्याच्या घटना याठिकाणी घडल्या आहेत. ही परीस्थिती आजची नाही तर हे नवीन बसस्थानक बांधल्यापासुनची आहे. महामंडळाला बसस्थानक परीसरात साधे कॉंक्रिटीकरण करता आले नाही. ही बाब जेंव्हा आण्णासाहेब दराडे यांच्या निदर्शनास आली तेंव्हा थेट त्यांनी राज्य परीवहण महामंडळ प्रशासनाचा निषेध करीत बसस्थानक परीसरातील चिखलात बसुन आंदोलन केले. यावेळी दराडे यांनी महामंडळाने तात्काळ बसस्थानक परीसरात कॉंक्रिटीकरण करून प्रवाशांना होणारा त्रास कमी करावा, अशी मागणी केली आहे.

## लोहारा-उमरगा विधानसभा लढविणार : शिवाजी कांबळे



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ सप्टेंबर**
लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहे. दररोज नवनवीन इच्छुक उमेदवारांची नावे समोर येत असून आता उमरगा-लोहारा विधानसभा मतदार संघातून माजी खासदार शिवाजी कांबळे यांनी विधानसभेसाठी शड्डू ठोकला आहे. आगामी विधानसभा निवडणुक ही आपण उमरगा विधानसभा मतदार संघातूनच लढवणार असल्याचे माजी खा. शिवाजी कांबळे यांनी स्पष्ट केले आहे.

शहरातील शासकीय विश्राम गृहामध्ये सोमवारी (दि.२३) रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये माजी खासदार शिवाजी कांबळे यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्याने आगामी निवडणुकीच्या बाबतीत सांगितले आहे.

याप्रसंगी हिंदू खाटीक समाजाचे जिल्हाध्यक्ष किशोर कांबळे, अनिल कांबळे, प्रकाश कांबळे, युवराज घोडके, गणेश घोडके, प्रभाकर पिस्के, अमर कोथिंबरे, संतोष कांबळे उपस्थित होते. कांबळे पुढे म्हणाले कि, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेवर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास असल्याने शिवसेनेचा धाराशिवचा दोन वेळा खासदार होण्याची संधी मिळाल्याने या भागातील नागरिक मला नावानीशी ओळखतात. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने मी तयारी करतोय, असे ते म्हणाले.

यावेळी आकाश कांबळे, किरण कांबळे, महेश कांबळे, सोमा कांबळे उपस्थित होते.

## तेर व परिसरातील सोयाबीन पिके पाण्याखाली; बळीराजा चिंताग्रस्त

**तभा वृत्तसेवा / गोरख माळी**
**तेर, दि.२७ सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील तेर व परिसरामध्ये २४ सप्टेंबरला ७० मिलीमीटर पाऊस होऊन अतिवृष्टीमुळे हातची आलेली शेकडो हेक्टर सोयाबीन पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त दिसून येत आहे. तसेच सोयाबीन पिकाबरोबर इतरही खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.





तेरचे भौगोलिक क्षेत्र ३२४५ हेक्टर असून लागवडी लायक क्षेत्र २९५६ हेक्टर आहे. यामध्ये भात २ हेक्टर, मका २४ हेक्टर, तूर ९५ हेक्टर, मुग १२ हेक्टर, उडीद १२ हेक्टर, भुईमूग ५ हेक्टर, सोयाबीन २५५० हेक्टर, ऊस १३५ हेक्टर, एकूण पेरणी झालेले क्षेत्र २८०५ हेक्टर आहे. तेर व धरणं परीसरात २४ सप्टेंबरला ७० मिलिमीटर मुसळधार पाऊस पडून अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात खरीप पिकांचे नुकसान झाले. शेतकऱ्यांना नांगरणी, पाळी, पेरणी, कोळपणी, डुबे त्याचबरोबर महागडे बियाणे, महागडे खत, पिकावर विविध प्रकारचे रोग पडल्यामुळे महागड्या औषधांची फवारणी अशा प्रकारच्या प्रचंड खर्चामुळे शेतकऱ्यांचा विविध खर्चामुळे जीव मेटाकुटीला आलेला असताना हातातोंडाशी आलेली सोयाबीन पिके अतिवृष्टीमुळे हातची वाया जात असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले असून प्रपंच कसा चालवायचा या विवंचनेत शेतकरी वर्ग दिसून येत आहे.

हातची आलेली सोयाबीन पिके अतिवृष्टीमुळे वाया जात असल्याने शेतकरी चिंताग्रस्त दिसत आहे.

## वडगांव (सि.) येथे रविवारी संत संमेलन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ सप्टेंबर -**
धाराशिव तालुक्यातील श्रीक्षेत्र सिध्देश्वर मंदीर, वडगाव या सभागृहामध्ये होत असलेल्या संत-महंत (धर्माचार्यांच्या) भव्य जिल्हास्तरिय संम्मेलनामध्ये प्रवचनकार, किर्तनकार आदी भक्तगणांनी अधिक संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन 'संत सेवा समिती' व हभप. ॲड. राजानन चौगुले महाराज यांनी एका पत्रकाव्दारे केले आहे.

सदर सम्मेलनामध्ये उपस्थित होणाऱ्या व इतर संत, महंताचे देशाच्या व समाजाच्या एकात्मतेसाठी मोलाचे योगदान मिळत आलेले आहे. भविष्यातील देखिल त्यांच्याकडून राष्ट्रौध्दाराचे व धार्मिक संवर्धनाचे कार्य त्यांच्या किर्तन प्रवचनव्दारे योग्य पध्दतीने होत राहावे यासाठीच उपस्थित धर्माचार्यांना संबोधित करण्यासाठी भोर किर्तनकार गुरुवर्य हभप. संदिपान महाराज शिंदे, हासेगावकर तसेच गुरुवर्य हभप. प्रकाश महाराज बोधले तसेच गुरुवर्य हभप. महेश महाराज कानेगावकर, तसेच वेंदाताचार्य सोलापूरचे लक्ष्मण महाराज चव्हाण, मंहत ईच्छागिरी महाराज व हभप. सुनिता आडसूळ महाराज आणि हभप. जनार्धन महाराज मेटे, प्रांत धर्माचार्य प्रमुख (विहिप) हे विविध विषयी मोलाचे मार्गदर्शन उपस्थित राहून करणार आहेत.

# आतंकवादाच्या खात्म्यासाठी अधिनस्थ अधिकारी सशस्त्र सज्ज !

## दीक्षांत सोहळ्यात प्रशिक्षणार्थी जवानांची शपथ

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २७ सप्टेंबर -**

आतंकवाद, उग्रवाद, नक्षलवाद, अलगाववाद अन्य देश विघातक बाबीचा खात्मा करण्यासाठी ४२१ प्रशिक्षण अधिनस्थ अधिकाऱ्यांनी दीक्षांत सोहळ्यात सामूहिक शपथ घेतली असून यावेळी जवानांनी सादर केलेले थरारक प्रात्यक्षिके सर्वांचे डोळे दिपवुन टाकणारे ठरले आहे.



मुदखेड येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या प्रांगणात ता. २५ बुधवार रोजी ४२१ अधिनस्थ अधिकारी दीक्षांत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय पोलीस सेवा अप्पर महानिदेशक दीपक कुमार महानिरीक्षक सी टी व्यंकटेश, उपमहानिरीक्षक आर टी सी अमिरुल हसन अन्सारी लातूर,सी टी सी कामाडंट व्ही पी त्रिपाटी यांची प्रमुख उपस्थिती होती. अधिनस्थ अधिकाऱ्यांनी पथसंचलन करीत सलामी दिली. यावेळी शहीद जवानांच्या वीर पत्नींचा दीपककुमार यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी प्रशिक्षण देणाऱ्या मार्गदर्शकांना उल्लेखनीय कार्याबद्दल ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अभिजित राऊत, पोलिस महानिदेशक शहाजी उमाप आणि पोलीस अधिक्षक अविनाश कुमार,दीपक कुमार,अरुण कुमार, मोहम्मद शहानवाज, जाकी कुमार, हरीशंकर प्रसाद, वासुदेव, निलेश कुमार, सी संजीवन, एस रमेश, उपस्थित होते.

देशातील विविध राज्यातून प्रशिक्षण घेण्यासाठी आलेल्या ४२१ अधिनस्थ अधिकाऱ्यांना ४८ आठवड्यांच्या कालावधीत सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या दलात थेट नियुक्त करण्यात आलेल्या अधिनस्थ अधिकारी कर्मचाऱ्यांची महत्वाची भूमिका म्हणजे दुर्गम भागातील नक्षलवाद, पूर्वोत्तर राज्यातील अलगाववाद, उग्रवाद, आतंकवाद यासोबतच संवेदनशील क्षेत्रातील संप्रदायिक उपद्रवांचा समूळ नायनाट करण्यासाठी या जवानांची भूमिका महत्वपूर्ण ठरणार असल्याचे मत अप्पर महानिदेशक दीपककुमार यांनी व्यक्त केले आहे.

**दीक्षांत समारोहात साहसी प्रात्यक्षिक सादर**

दीक्षांत समारोहात साहसी खेळ आणि प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यात योग, मल्लखांब, रायफल चालवणे, अग्नी रिंग मधून जवानांच्या उड्या आणि मोटार सायकलचे साहसी प्रदर्शन यावेळी सादर करण्यात आले.

# शहीद भगतसिंघ चौकात अपघात टाळण्यासाठी उपाय योजना करण्याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

शहरातील असर्जन परिसरात जवळपास दिड वर्षापुर्वी असर्जन नाका ते हस्सापूर रोड हा मार्ग तयार केला आहे. परंतु या मार्गावरील शहीद भगतसिंग चौक येथे अपघात टाळण्यासाठी कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. वाहनधारक या मार्गावरून आपली वाहने भरधाव वेगाने नेत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असताना बांधकाम विभागाने अपघात रोखण्यासाठी आतापर्यंत कुठलीही उपाययोजना केली नसल्याने बांधकाम विभाग एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहते की काय ? असा संतप्त सवाल असर्जन परीसरातील नागरीक उपस्थित करत आहेत.

असर्जन नाका ते हस्सापूर रोड या रस्त्याचे काम जवळपास दिड वर्षापुर्वी करण्यात आले आहे. परंतु या मार्गावरील शहीद भगतसिंग चौक येथे अपघात रोखण्यासाठीची कुठलीही उपाययोजना करण्यात आली नाही. या चौकातुन नांदेड ते लातुर, गंगाखेड मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. याच मार्गावर विष्णुपुरी येथे शासकिय रुग्णालय असल्याने या मार्गावर वाहनांची गर्दी वाढली आहे. तसेच जड वाहने देखील या भरधाव वेगाने जात असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावर दररोज किरकोळ अपघात होणे नित्यनियमाचे झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी मागील दिड वर्षापासुन असर्जन, धुमाळवाडी परीसरातील नागरीकांतुन मागील दिड वर्षापासुन होत आहे तर जनता पँथर या संघटनेने शहीद भगतसिंघ चौकात रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देखील दिला होता. परंतू सार्वजनिक बांधकाम विभाग ही मागणी गांभीर्याने घेत नसल्याने बांधकाम विभाग एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहते की काय ? असा संतप्त सवाल असर्जन, धुमाळवाडी परीसरातील नागरीक व्यक्त करीत असुन एखाद्या अपघाताला कारणीभुत ठरण्यापुर्वी येथील होत आहे. वेगाने आपली वाहने नेत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावर दररोज किरकोळ अपघात होत असून एखादा मोठा अपघात होण्यापुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.



**बांधकाम विभाग मोठ्या अपघाताची वाट पाहते की काय ? असर्जन परीसरातील नागरीकांचा संतप्त सवाल**

**फ्लश आऊटमुळे जड वाहनावर लगाम**

जिल्हा पोलिस अधिक्षक अबिनाशकुमार यांनी फ्लश आऊट ऑपरेशन सुरु केले असल्याने बहुतांश प्रमाणात असर्जन ते हस्सपूर या मार्गावरुन अवैधरीत्या होणारी रेती, माती, मुरुमाची वाहतुक थांबली असुन जड वाहनावर लगाम लागला आहे. विशेष म्हणजे असर्जन ते हस्सापूर या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतुक होत होती. हे वाहनधारक भरधाव वेगाने वाहन नेत असल्याने अपघाताची शक्यता देखील वाढली होती.

## संक्षिप्त वृत्त


### शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी सौ. मंगनाळे तर उपाध्यक्ष पदी पुंजाजी

**नायगाव**-मांजरम येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या नुतन शालेय व्यवस्थापन समितीच्या निवडी संदर्भात बुधवारी नुकतीच बैठक घेण्यात आली.यावेळी निवडणूक नघेता ही निवड बिनविरोध पार पडली. यात अध्यक्ष पदी लक्ष्मीबाई उमेश मंगनाळे तर उपाध्यक्षपदी उमाताई मोतीराम पुंजाजी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मांजरम येथील जिल्हा परिषद हायस्कूल येथे अडीच वर्षांच्या कालावधीत व्यवस्थापन समितीची निवड लोकशाही पध्दतीने करण्यात येते.शालेय विद्यार्थीच्या इच्छूक पालकांना या निवडी मध्ये सहभागी होता येते.प्र.मुख्याध्यापक पी.आर.ठीकाणे यांच्या अध्यक्षतेखाली पालकांची बैठक घेण्यात आली. पालकांच्या बैठकीत शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी लक्ष्मीबाई उमेश मंगनाळे यांची तर उपाध्यक्षपदी उमाबाई मोतीराम पुंजाजी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.तर सदस्यपदी रिजवाना सादीक शेख, अनिता नागेश वाघमारे, बालाजी वैजनाथ पांचाळ, मारोती बापुराव बोईनवाड , गंगाधर गणपती फुगारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.



### भगवान परशुराम आर्थिक विकास मंडळ स्थापन केल्याबद्दल आनंदोत्सव

**नायगाव**-महाराष्ट्र राज्यातील महायुती सरकारने २३ सप्टेंबर रोजी मंत्री मंडळ निर्णयात भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल ब्राह्मण समाजा करीता गेल्या अनेक दिवसा पासून प्रलंबित मागणीची दखल घेऊन यशस्वी निर्णय घेतल्या बद्दल नायगाव ब्राह्मण महासंघ च्या वतीने भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून महायुती सरकारचे अभिनंदन करून ,फटाके वाजवून व पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी अ.भा.ब्राह्मण महासंघ जिल्हाध्यक्ष ग्रा.बाळासाहेब पांडे मांजरमकर,तालुका अध्यक्ष प्रसाद देसाई,ज्येष्ठ सलागार श्याम कुलकर्णी,मंगेश देशपांडे,सुनील जोशी,युवा अध्यक्ष रोहन जोशी,उमेश महाराज नायगाव कर,नागठाणे सर,वे. शा.स.शाहू महाराज या सह ब्राह्मण महासंघ कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी युती सरकारने अनेक दिवसापासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावून ब्राह्मण समाज उन्नती साठी प्रयत्न केल्या बद्दल शासनाचे ऋण व्यक्त करण्यात आले.संचलन श्याम कुलकर्णी यांनी तर आभार मंगेश देशपांडे यांनी मानले.



### धर्माबाद रेल्वे स्थानकास पहिले हु. पानसरे नाव देण्यासाठी प्रयत्न करणार - चिखलीकर

**बिलोली**-धर्माबाद रेल्वे स्टेशनला मराठवाडा मुक्ती संग्रामातील पहिले हुतात्मा गोविंदराव पानसरे यांचे नाव देणे याबाबत कोणाचेच दुमत असण्याचे कारण नाही. यासाठी मी स्वतः शासन पातळीवर प्रयत्न करणार आहे.असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले. ते मराठवाडा मुक्ती संग्राम जागर कार्यक्रमात बोलत होते. सोमवार दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा मुक्ती संग्रामातील जागर कार्यक्रमातील मुलाखतीत विविध विषयांवर त्यांनी प्रकाश टाकला.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी त्यांच्या संसद सदस्यत्वाच्या कालखंडातील रेल्वे विमानसेवा आणि रस्ते कामांची माहिती देत असतानाच मराठवाडा मुक्ती संग्राम महोत्सव कार्यक्रमांतर्गत सांस्कृतिक मंत्रालयाच्यावतीने घेण्यात आलेल्या उपक्रमाचा आढावा घेतला. यात म्हणावे तसे काम झाले नाही. याबाबत अजून भरपूर काम करण्यासारखे आहे असेही प्रतापराव पाटील चिखलीकर व्यक्त केले. बिलोली तालुक्यात आयुष्य खर्च केलेल्या, शेवटी कुंडलवाडी जवळ अर्जापूर येथे प्राणाची आहूती दिलेल्या हुतात्मा गोविंदराव पानसरे यांचे नाव देशातील अन्य लोकांना ज्ञात होण्यासाठी त्यांचे कार्य केवळ बिलोली तालुक्यापुरते नव्हते तर देश पातळीवरचे होते. याची जाणीव करून देण्यासाठी कुणीतरी पुढाकार घेण्याची गरज होती. हा पुढाकार राज्य पत्रकार परिषद आणि स्वर्गीय बसवंतराव मुंडकर विचार मंचाने घेतला,असेही ते म्हणाले.याबाबत आजच पंतप्रधान आणि रेल्वेमंत्री यांना माझ्या कार्यालयातून पत्र पाठवणार असल्याचे जाहीर केले. यावेळी चैतन्य बापू देशमुख,बालाजी बच्चेवार, नायगावकर, श्रावण पाटील भिलवंडे नरसीकर, डॉ. शिवदास हमंद, गोविंद मुंडकर,साहेबराव जाधव, प्रसाद देशपांडे आदींची उपस्थिती होती.

## कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार अर्थसहाय्य

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

राज्यातील ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक प, पोर्टलद्वारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे. अशा नोंदणीकृत शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मिळणार आहे. अशा शेतकऱ्यांनी नजीकच्या सेतू सुविधा केंद्रावर जावून आपले ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी. ई-केवायसी पूर्ण केल्यावरच एकवेळ अनुदान वितरणासाठी शेतकरी पात्र ठरणार आहेत. तरी शेतकऱ्यांनी २७ सप्टेंबर २०२४ पर्यत ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले आहे.

लाभार्थी शेतकऱ्यांना ०.२० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार रुपये तर ०.२० हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर ५ हजार (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थ सहाय्य देण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले संमतीपत्र व नाहरकत पत्र तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत संकलित करुन शासनाने महाआयटीकडून तयार केलेल्या scagridbt.mahaitgov.in या वेबपोर्टलवर माहिती भरली जात आहे. यासाठी कोणत्याही मध्यस्थांचा सहभागाशिवाय आर्थिक सहाय्य योजना पात्र लाभार्थ्यांकडून त्यांच्या आधार-सीड बँक खात्यापर्यत पोहेचते याची खात्री करण्यासाठी राज्याने ई-केवायसी प्रक्रिया सुरु केली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मोर्चाने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात दणाणला

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

जिल्ह्याभरासह शहरांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी व नागरी भागातील सखल भागातील रहिवाशांचे अन्नधान्य व संसारोपयोगी सामानाचे नुकसान झाले होते. झालेल्या नुकसानीपोटी प्रत्येकी कुटुंब पंचवीस हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रवीण घुले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मोर्चाने शुक्रवारी जिल्हाधिकारी परिसर दणाणून गेला होता.

जिल्हाभरासह शहरांमध्ये दि. ३१ ऑगस्ट ते ०३ सप्टेंबर दरम्यान मोठी अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे व शहरातील सखल नागरी भागातील घरांमध्ये पाणी शिरून अन्नधान्य व संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले होते. यामुळे नागरिकांना मोठ्या त्रास सहन करावा लागल्याने त्यांना प्रती कुटुंब रुपये २५००० सानुग्रह अनुदान देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रवीण घुले यांनी केली होती. या मागणीसाठी शुक्रवार दि. २७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड मोर्चा काढण्यात आला या मोर्चातील घोषणाबाजीमुळे जिल्हाधिकारी परिसर दणाणून गेला होता.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा शहर सरचिटणीस घुले यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मोर्चामध्ये छगन पाईकराव, ज्ञानेश्वर गजभारे, सचिन हटकर, साहेबराव जोंधळे, चंद्रकांत सोनकांबळे, गौतम भद्रे, राहुल कांबळे, संदीप नवघरे, शेख बशीर, चंद्रकांत सोनकांबळे, बळीराम निखाते, वैजंताबाई निखाते, भोजुबाई ढबाले, अर्चना घुले, पंचफुलाबाई धुतराज , सुमनबाई कांबळे, सरफराज अहमद, बिस्मिल्ला बी , राष्ट्रपाल राजभोज, साहेबराव भदर्गे, प्रदीप आढाव, चंद्रकांत इंगळे, लक्ष्मीबाई गायगोधने, लताबाई पाईकराव, साधनाबाई झेंनेकर यांच्यासह हजारो नागरिक उपस्थित होते.

## स्वच्छता ही मनुष्य जिवनाची प्राथमिक गरज, ती प्रत्येकाने जोपासली पाहिजे : कांदे

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. २७ सप्टेंबर -**

स्वच्छता ही मनुष्य जीवनाची प्राथमिक गरज असून, ती प्रत्येकाने जोपासली पाहिजे.स्वच्छतेच्या बाबतीत आपले तीर्थक्षेत्राचे माहूर शहर हे प्रथम क्रमांकाचे शहर बनविण्यासाठी सर्वांना प्रयत्न करावे लागणार आहेत. त्यासाठी शहरवासीयांनी सहकार्य करावे! असे आवाहन मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी केले आहे.

केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय,भारत सरकार यांनी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत स्वच्छता पंधरवडा मार्फत 'स्वच्छ्ता ही सेवा अभियान' अंतर्गत स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता ही मोहीम १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोंबर दरम्यान राबविण्याचे कळविलेले आहे. त्यानुषंगाने आज बुधवार दिनांक २५ रोजी माहूर नगरपंचायतचे मुख्याधिकारी विवेक कांदे यांच्या मार्गदर्शनात शहरातील मातृतिर्थ तलाव रस्त्यावर 'स्वच्छता मोहीम' राबविण्यात आली.त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मार्गदर्शन करताना नगराध्यक्ष फिरोज दोसानी म्हणाले की,शहर स्वच्छ व सुंदर करण्याबरोबरच शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातूनही सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. राज्यातील एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्रीक्षेत्र माहूर शहराला सुंदर साजेसे स्वरूप देण्यासाठी नगर पंचायत कडून राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना शहरातील नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद सदैव मिळत आलेला आहे.नागरिक ओला आणि सुका कचऱ्याचे विलगीकरण करून स्वच्छतेच्या उपक्रमात स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत असतात! अशा शब्दांत कृतज्ञता व आभार व्यक्त करत 'स्वच्छता ही सेवा' या उपक्रमात देखील शहरातील नागरिकांनी सक्रीय सहभागी व्हावे असे नम्र आवाहन देखील दोसानी यांनी केले.

राबविण्यात आलेल्या अभियानात मुख्याधिकारी विवेक कांदे,नायब तहसीलदार डॉ.राजकुमार राठोड, कार्यालयीन अधीक्षक वैजनाथ स्वामी, नपं चे कर्मचारी संदिप गजलवाड,देविदास जोंधळे, विशाल ढोरे, देविदास सिडाम, सुरेंद्र पांडे,शेख मजहर, गणेश जाधव,विजय शिंदे,बसवंत कल्याण, रामसिंह थुरवाल, अनिल खडसे,नईम पाशा, जीवन खडसे, राहूल खंदारे, समाधान राठोड, विलास बोरकर, शेख शब्बीर, संदिप गोस्वामी व स्वच्छता कामगार सहभागी होते.

## महिलांनी मानले सरकारचे धन्यवाद

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. २७ सप्टेंबर -**

लाडकी बहीण योजना महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे,महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर ,या सर्वांच्या आदेशान्वये,नांदेड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष इंजिनीयर विश्वंभर पवार व महिला जिल्हाध्यक्षा पूजाताई व्यवहारे डोंगरगावकर, यांच्या मार्गदर्शनात दि. २२ सप्टेंबर रोजी मुदखेड तालुका येथे बसस्थानक येथे,माझी लाडकी बहीण योजना ,लेक लाडकी,मुलींना मोफतपदवी शिक्षण,अन्नपूर्णा,या सर्व योजना दिल्या बद्दल महायुती सरकार व अजित दादा पवार,यांचे विशेष धन्यवाद म्हणून तसेच या सर्व योजना महिलांना लाभदायक आहेत.

# रासेयोतून घडलेले विद्यार्थी पुढे जीवनात यशस्वी होतात: कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. २७ सप्टेंबर -**

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सभ्यता, शिस्त, प्रामाणिकता, कौशल्य इत्यादी चांगली मुले जोपासली जातात. जे की जीवनात यशस्वी होण्यासाठी खूप महत्त्वाचे असतात. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेवक आणि स्वयंसेविका जीवनात पुढे यशस्वी होतात असे मत विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मनोहर चासकर यांनी व्यक्त केले.

ते दि. २६ सप्टेंबर रोजी विद्यापीठातील दीक्षान्त सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात मार्गदर्शनपर बोलत होते. यावेळी त्यांच्या समवेत मुंबई विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष कार्यसन अधिकारी डॉ. सुशील शिंदे, मुंबई विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी रमेश देवकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. नरेंद्र चव्हाण, डॉ. सुरेखा भोसले, कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे. प्रा. रवींद्र खडकीकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, क्रीडा विभागाचे संचालक डॉ, भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांची उपस्थिती होती.

राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय कार्यालय पुणे, युवा कार्य व क्रीडा कार्यालय भारत सरकार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन पूर्व निवड चाचणी शिबिराचा आज उद्घाटन समारंभ कार्यक्रम पार पडला.

पुढे डॉ. चासकर म्हणाले राष्ट्रीय सेवा योजनेतील प्रत्येक स्वयंसेवक व स्वयंसेविकेचे राज्य किंवा राष्ट्रीय परेड साठी निवड होण्याचे स्वप्न असते. तुमच्या पैकी ८६ स्वयंसेवकांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. सर्वांनीच आपले कौशल्य दाखविण्याची ही वेळ आहे. पुढे ते स्वच्छते बाबतीत बोलताना ते म्हणाले, पाश्चात्त्य देशात अगदी बालपणापासून स्वच्छतेची जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात रुजवली जाते. पुढे त्यांना स्वच्छतेबद्दल धडे देण्याची गरज नाही त्यामुळे ते त्यांचे घर आणि देश सुंदर ठेवतात. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकही स्वच्छतेचे दूत आहेत. त्यांनी आपला भारत देश सुंदर कसा होईल या बाबतीत जागरूक असले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

प्रमुख पाहुणे डॉ. सुशील शिंदे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये स्वयंसेवक केवळ स्वच्छता अभियानासाठी नसतात. तर ते राष्ट्रीय पथसंचलन सुद्धा चांगल्या पद्धतीने करत असतात. म्हणून केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या वतीने असे शिबीर घेतले जातात. यातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होते.

यावेळी दुसरे प्रमुख पाहुणे डॉ. देवकर म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी आपल्या जवळील चांगल्यात चांगल्या परेडसाठी कौशल्य देण्याची आणि दाखविण्याची ही वेळ आहे. प्रत्येकांने स्वंयशिस्त पाळून आपले कार्य यशस्वी केले पाहिजे.

यावेळी मागीलवर्षी दिल्ली येथील परेडसाठी निवड झालेले विद्यार्थी विष्णू जाधव आणि कु. भाग्यश्री गैनवाड यांचा सन्मान कुलगुरूंच्या हस्ते करण्यात आला.


प. पूज्य स्वामीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर रोपट्यास पाणी देऊन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुणा शुक्ला यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अमोल काळे यांनी केले.

सदरील प्रजासत्ताक पूर्व संचलन शिबिरासाठी महाराष्ट्रातील ५१ विद्यापीठातील कृषी, तंत्रज्ञान, अकृषी, आरोग्य, पशुवैद्यकीय, महिला विद्यापीठ अशा विविध महाराष्ट्रातील विद्यापीठातून १६५ मुले स्वयंसेवक व १७४ मुली स्वयंसेविका तसेच या शिबारासाठी ९ पुरुष व १० महिला यांचा संघ व्यवस्थापक म्हणून सहभागी आहेत. शिबिराच्या यशस्वीतेसाठी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विविध महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी परिश्रम घेत आहेत.

# माहूर लगतच्या मालवाडा घाटातील राष्ट्रीय महामार्गाच्या अर्धवट कामावर नवरात्र पूर्वी तोडगा

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. २७ सप्टेंबर -**

: तीर्थक्षेत्र माहूर शहराचे प्रलंबित विविध विकास कामे मार्गी लावण्यासाठी आज बुधवार दिनांक २५ सप्टेंबर रोजी खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्यासोबत माहूर चे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी जिल्हाधिकारी डॉ. अभिजित राऊत यांची भेट घेतली असता; माहूर शहरा लगतच्या मालवाडा घाटातील अर्धवट असलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामावर शारदीय नवरात्र पूर्वी तोडगा काढू व शहरातील रोहित्र अभावी बंद असलेले पथदिवे हे सुद्धा नावरात्रापूर्वी सुरू करण्यासाठी महामार्ग विभागाला तातडीच्या सूचना देण्यात येईल! अशी ग्वाही जिल्हाधिकारी राऊत यांनी दिली.यावेळी लांजीचे सरपंच मारोती रेकुलवार, अमित येवतीकर यांची उपस्थिती होती.



माहूर शहरापासून जेमतेम अवघ्या दोन किलोमिटर अंतरावर असलेल्या मालवाडा घाटात मागील दोन वर्षापासून रस्ता अर्धवट आणि एकेरी स्थितीत आहे.राष्ट्रीय महामार्गाच्या या रस्त्यावर वनविभागाने दावा केल्याने हे काम थांबले आहे.विशेष म्हणजे एका बाजूने सिमेंट कॉँक्रिट रस्त्याचे काम काही प्रमाणात झाले होते,तर एका बाजूने खोदून ठेवलेला रस्ता गिट्टी व इतर बांधकाम साहित्य टाकून बंद करण्यात आला आहे.

माहूर हे राज्यातील देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री रेणुका देवीचे एक मुख्य पिठ आहे.याठीकाणी भरणाऱ्या विविध यात्रोत्सवांपैकी सर्वात मोठा व दिर्घ कालावधीत साजरा करण्यात येणारा उत्सव म्हणजे शारदीय नवरात्र महोत्सव होय.येत्या काही दिवसांवर हा उत्सव येऊन ठेपला असून,श्री रेणुका देवी संस्थान व तालुका यात्रा प्रशासन यात्रा महोत्सवाच्या जय्यत तयारीला लागला आहे. परवा माहूर दौऱ्यावर खा.नागेश पाटील यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत माजी.आ.प्रदीप नाईक व

शिवसेना (उबाठा) ज्योतिबा खराटे यांनी मालवाडा घाटातील अर्धवट रस्त्याचा विषय खासदारांच्या लक्षात आणून दिला होता.तर नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी माहूर शहरातील पथदिवे महामार्ग विभागाच्या दुर्लक्षित धोरणानामुळे बंद असल्याने रात्रीला शहरात काळोख पसरत असल्याचे लक्षात आणून दिले होते.

तीर्थक्षेत्र माहूर शहरात उद्भवलेल्या या गंभीर समस्या सोडविण्यासाठी खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी थेट नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांना बोलावून घेत नांदेड जिल्हाधिकारी डॉ. अभिजीत राऊत यांची भेट घेतली असता

याविषयी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व समस्यांवर नवरात्र पूर्वी तोडगा काढण्यात येईल! असा विश्वास जिल्हाधिकारी राऊत यांनी यांनी दिला आहे.आता माहूर गडावर मोठ्या प्रमाणात साजरा केला जाणाऱ्या शारदीय नवरात्र महोत्सवासाठी उरलेल्या जेमतेम आठवडाभरात शहर व परिसरात उद्भवलेल्या या गंभीर समस्यांवर जिल्हाधिकारी राऊत किती लवकर काय तोडगा काढतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

जिल्हा कार्यालय - पहिला माळा, जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड.
Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439

लातूर
दिनांक

**लातूर तरुण भारत**, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल



# शालेय विद्यार्थ्यांच्या वाहनास अपघात; पाच विद्यार्थी जखमी

**वलांडी, दि. २७ सप्टेंबर-**
अ‍ॅटो व दुचाकी वलांडी दवणहिप्परगा रस्त्यावर गुरुवारी (ता. २६) सांयकाळी पाचच्या सुमारास शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या अ‍ॅटो व दुचाकीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात पाच शालेय बालके गंभीर जखमी झाले आहेत.

अपघातात सर्व दहा वर्षाखालील विद्यार्थी जखमी झाले असुन त्यांना वलांडी येथे प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी उदगीर येथे हलवण्यात आले आहे. दवणहिप्परगा येथील अनेक विद्यार्थी वलांडी येथील इग्रंजी माध्यमांच्या शाळेत शिक्षण घेत आहेत. गुरुवारी शाळा संपल्यानंतर अ‍ॅटो (एम एच २४ ई ५१३१) दवणहिप्परग्याकडे जात असताना समोरुन आलेल्या भरधाव दुचाकीने (एम एच २२ ई ३५२६ ) धडक दिल्याने अ‍ॅटो उलटला. यात अ‍ॅटोमधील सर्व पाच विद्यार्थी व चालक जखमी झाला आहे. सुहाशीनी राहुल भांताब्रे, (वय ७), संविधान पदमाकर कांबळे (वय ९) रोहन माधव गायकवाड (वय १०), शिवण्या माधव सावळे (वय ७) अनुराग बालाजी कारभारी (वय १०) हे सर्व विद्यार्थी गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना तत्काळ प्रवाशी व पालकांच्या मदतीने वलांडी येथे प्राथमिक उपचार करण्यात आले असुन पुढील उपचारासाठी उदगीरला हलवण्यात आले आहेत. सर्वच बालकांना डोळ्याला, तोंडाला, पायाला हाताला मार लागला आहे. या अपघातात दुचाकीचालक गिरजाप्पा बंसवत बिरादार (रा. जवळगा ता. देवणी) व अ‍ॅटोचालक तुकाराम सौदागर सूर्यवंशी हेही जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तालुक्यातील शाळांची वाहतूक यंत्रणा व त्यांच्या माध्यमातून होणारी विद्यार्थी वाहतुकीच्या नियमावलीबाबत तपासणी होणे गरजेचे आहे.

## संक्षिप्त वृत्त



### शास्त्री शाळेत पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी

**उदगीर, दि. २७ सप्टेंबर-**
लालबहाद्दूर शास्त्री प्राथमिक विद्यालयात आज दिनांक २५सप्टेंबर २०२४ रोजी पं. दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून माधव केंद्रे व प्रमुख वक्ते म्हणून देवकबाई काळे उपस्थित होते.मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांची विशेष उपस्थिती होते. मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या देवकबाई काळे यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या कार्याविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली.त्यांचा रेल्वे प्रवासातील प्रामाणिकपणाचा प्रसंग सांगितला. आपणही जीवनात प्रामाणिकपणे वागावे,असे सांगितले. अध्यक्षीय समारोप भाषण माधव केंद्रे यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक होते. त्यांच्या अंगी प्रामाणिकपणा व राष्ट्रनिष्ठा हे महत्त्वाचे गुण होते. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपणही त्यांच्यासारखे प्रामाणिक राहूया व राष्ट्रसेवेसाठी सदैव तत्पर राहण्याचे आवाहन केले. सूत्रसंचालन मंजुषा पेन्सलवार यांनी केले




### देवणी केमिस्ट, ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने फार्मासिस्ट डे उत्साहात साजरा

**देवणी, दि. २७ सप्टेंबर-**
देवणी तालुका केमिस्ट ड्रगीस्ट असोसिएशनच्या वतीने फार्मासिस्ट डे साजरा करण्यात आला. यावेळी डॉक्टरांचा सत्कार आणि उदगीर तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सत्यवान भाऊ बोरोळकर यांचा सत्कार देवणी तालुक्याच्या वतीने असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून उद्धव मलेशे यांच्याकडून करण्यात आला. या सोबतच देवणी तालुक्यातील जुन्या केमिस्टांचा सत्कार आणि पत्रकार अध्यक्षांचा सत्कार रमेश जी कोतवाल, रेवण मळभगे, गायकवाड गिरिधर यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. कार्यक्रम सनराईस पब्लिक स्कूल या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम प्रसंगी या सर्वांकडून उपस्थिती दाखवण्यात आली. व्यंकट चिद्रेवार सावकार, राशिद खेडे, तालुका अध्यक्ष उद्धवजी मल्लेश,उपाध्यक्ष वामन भोसले, सुभास पाटिल, सचिव संजय हुडगे, सहसचिव सचिन. मंगनाळे, सुनील बावगे, अजीज खेडे, शहर अध्यक्ष बसवराज ईश्वरशेट्टे, आदित्य पाटील, दत्ता हुरूचनाळे, डोंगरे उमाकांत, धनराज म्हेत्रे,बन ज्ञानेश्वर, मोदी सुधीर, मदन पाटील, नागनाथ गरीबे, रोट्टे सुमित, योगेश देवशेटवश्रर, वसीम पठान, अजय जानतीकर देवणी तालुक्यातील सर्व केमिस्ट बांधव यावेळी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उपाध्यक्ष तालुका अध्यक्ष उदगीर सत्यवान भाऊ बोरोळकर, दीपक नेत्रगावे, तसेच खश्रलील देवनी तालुक्यश्रतिल डॉक्टरांचा सत्कार यावेळी करण्यात आला. डॉ. विश्वास कुलकर्णी, डॉ.लोभाजी मोघेकर, डॉ. पंकज जनवाडकर, सुरशेट्टे मलिकार्जुन, डॉ. पठान एम. एच, बिरादार संतोष, डॉ. कल्याणी पवन, डॉ. ऋषिकेश चौहान, डॉ. आतिक मोमिन, डॉ. प्रताप बोडके, डॉ. वैभव कदम, डॉ. वाय.बी. रेड्डी., उपस्थित होते. यावेळी फळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. प्रास्ताविक, सूत्रसंचालन सचिन मंगनाळे यांनी केले.



### महाईसेवा तालुकाध्यक्षपदी मारोती वाकरे यांची बिनविरोध निवड

**शिरूरअनंतपाळ, दि. २७ सप्टेंबर-**
शिरूर अनंतपाळ तालुका महाईसेवा केंद्राध्यक्ष पदी मारोती वाकरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.दिनांक २१ सप्टेबर रोजी सुरेश साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पत्रकार मेहताब शेख यांच्या अध्यक्षतेखाली महाईसेवा केंद्राध्यपदी तालुका अध्यक्ष मारोती वाकरे तर उपाध्यक्षपदी मयूर गायकवाड या नुतन कार्यकारणी मध्ये,सचिव राम सुमठाने, कोषाध्यक्ष अमोल बिरादार ,सहसचिव सुरेश साखरे , सदस्य नारायण पालकर ,विशाल कोतवाडे,हेमंत पतंगे, उदय चिंताकोटे,बालाजी सलगरे,जीवन उमाटे अशी तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली.याप्रसंगी जिल्हा कार्यकारिणिसाठी जेष्ठ सदस्य सुरेश साखरे व हेमंत पतंगे यांची नावे पाठवण्यात आल्याचे नुतन तालुकाध्यक्ष मारोती वाकरे यांनी सांगितले.यावेळी नवीन सर्व पदाधिकाऱ्यांचे सत्कार करण्यात आले. यावेळी सर्व महाईसेवा चालक, मालक उपस्थित होते.

# माझी शक्ती, माझ कुटुंब म्हणजे आपले बुथप्रमुख

## क्रीडा मंत्री संजय बनसोडे; उदगीर-जळकोट मतदार संघातील पदाधिकाऱ्यांची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २७ सप्टेंबर-**
कोरोना महामारीच्या काळात आपण सर्वजण संयमाने काम केले. २०१९ च्या निवडणुकीत आपण सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवुन मला मोठ्या मताधिक्याने निवडून दिले. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच मी आमदार ते राज्याचा कॅबिनेट मंत्री झालो आणि मागील ५ वर्षाच्या काळात मी उदगीर मतदार संघात विकासाचा डोंगर उभा केला आता आपले उदगीर, जळकोट हे विकासाचे मॉडेल म्हणून महाराष्ट्रात नावारूपाला येत आहे. हे केवळ आपल्यामुळेच शक्य झाले. माझी शक्ती, माझ कुटुंब आपण सर्वजण असल्याची भावना क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केली.

ते उदगीर-जळकोट विधानसभा मतदार संघातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, बुथ प्रमुख व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या संवाद बैठकीत बोलत होते. यावेळी सिद्धेश्वर पाटील, रामराव राठोड, समीर शेख, प्रवीण भोळे, अर्जुन आगलावे, श्याम डावळे, ब्रम्हाजी केंद्रे, बालाजी भोसले, सय्यद जानीमियाँ, संग्राम हासुळे पाटील, वसंत पाटील, शशिकांत बनसोडे, तात्या पाटील, पाशा शेख, फैजुखाँ पठाण, बाळासाहेब मरलापल्ले, दिपाली औटे, मधुमती कनशेट्टे, काजल मिरजगावे, सुनिल केंद्रे, सत्यवान पाटील, अभिजित औटे, शफी हाशमी, प्रदीप जोंधळे, गिरीश उप्परबावडे, नवनाथ गायकवाड, संगम टाले, धनाजी मुळे, नजीर हाशमी, इम्तियाज शेख, पाशा बेग, शुभम भुमणे, खाजा तांबोळी, प्रभाकर पाटील, दत्ता बामणे, दत्ता पाटील, अरविंद गिलचे, अ‍ॅड.वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, प्रिती कवितकर, आझम पटेल, अझहर मोमीन, इब्राहिम नाना पटेल, ज्ञानेश्वर बिरादार, अविनाश गायकवाड आदी उपस्थित होते.



पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, आपण केलेली लोकहिताची व सामजिक कामे, नागरिकांना उपलब्ध करुन दिलेल्या सर्व सुख सुविधा आदी संदर्भातील कामे शेवटच्या माणसापर्यंत पोहचवा आणि आपल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीमागे मोठी ताकद निर्माण करा कारण आपल्या गावातला व वार्डातलाच बुथ कार्यकर्ता व बुथ प्रमुखच ही आपली खरी ताकद असुन बूथ प्रमुख व प्रमुख पदाधिका-यांनी आता जोमाने कामाला लागावे असे आवाहन ना.संजय बनसोडे यांनी केले. येत्या ३० सप्टेंबर रोजी जनसन्मान यात्रा व मतदार संघातील विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या हस्ते होणार असुन या कार्यक्रमास आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहनही ना.बनसोडे यांनी केले. यावेळी मतदार संघातील बुथ प्रमुख, पदाधिकारी व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## चन्नबसवेश्वर फार्मसीमध्ये डेंटल कॅम्पचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ सप्टेंबर-**
पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट अंतर्गत चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज येथे जागतिक फार्मसिस्ट दिनाचे औचित्य साधून डेंटल कॅम्पचे आयोजन करण्यात आले.

या उद्घाटन समारंभामध्ये प्रमुख पाहूणे डॉ. विजयालक्ष्मी माले व डॉ. अर्चना आपटे यांनी विध्यार्थींना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी यांनी जमलेल्या विध्यार्थांना जागतिक फार्मसिस्ट दिनाच्या शुभेच्या देत प्रास्ताविक सादर केले. तसेच या प्रसंगी वरिष्ठ प्राध्यापक सर्व कर्मचारी व विध्यार्थी यांनी डेंटल कॉलेज मधील लाभलेल्या सर्व दंतचिकीत्सकाकडून दंत तपासणी करून घेतली. सूत्रसंचालन प्रा. स्नेहल जोगदंड आणि प्रा. डॉ. अनामिका पटणे यांनी केले

## शिरुर ताजबंद येथे उद्या आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि. २७ सप्टेंबर-**
बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ,अहमदपूर द्वारा संचलित धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अँड चॅरिटेबल हॉस्पिटल, उदगीर यांच्या वतीने जिल्हा परिषद प्रशाला,कुमठा,ता. अहमदपूर येथे दि.२९ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ०४.३० या दरम्यान मोफत सर्व रोगनिदान व औषधोपचार तथा मोतीबिंदू व रक्त-लघवी-ई.सी.जी तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या निःशुल्क शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

शिबिरास माजी मंत्री बाळासाहेब जाधव, आ. बाबासाहेब पाटील , सुभाष भगवानराव पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

शिबिरामध्ये वातविकार,संधिवात,आमवात,आम्लपित्त, मधुमेह, त्वचा विकार,कान-नाक-घसाचे आजार, हृदयरोग,पोटाचे विकार,लहान बालकांचे आजार व स्त्रीयांचे विकार-मासिकपाळी, स्तन व गर्भाशयाचे आजार,मानसिक आजार, कर्करोग, अस्थिरोग, यकृताचे विकार, वंध्यत्व व लैंगिक समस्या इत्यादी आजारांच्या रुग्णांवर आवश्यकतेनुसार मोफत औषधोपचार व मार्गदर्शन करणार आहेत.

शिबिरामध्ये नोंदणी केलेल्या महिलांची कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया निःशुल्क केली जाईल आणि तसेच प्रसुती(बाळंतपण) व गर्भाशयासंबंधीत विकारांची शस्त्रक्रिया ,अपेंडिक्स,हर्निया,हायड्रोसिल, मूळव्याध व भगंदर या शस्त्रक्रिया ५० टक्के सवलत दरात धन्वंतरी आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज,श्रीकृष्ण मंदिरासमोर,देगलूर रोड,उदगीर येथे केली जाणार आहे. शिबिरामध्ये लॉयन्स नेत्र रुग्णालय,उदगीर यांच्या सहकार्याने मोफत नेत्ररोग तपासणी करून मोतीबिंदू आजाराचे निदान झालेल्या व नोंदणी केलेल्या व्यक्तींवर अल्प दरात औषधोपचार व शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात येणार आहेत.

## मांजरा प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग पुन्हा वाढवला

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ सप्टेंबर-**
धरण पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने आज दि.२६/०९/२०२४ रोजी १८:३० वाजता गेट क्रमांक ३ व ४ (हे २ गेट) ०.२५ मीटरने उघडण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत मांजरा धरणाच्या सांडव्याची ४ वक्रद्वारे (क्र.१,६,३,४) ०.२५ मीटर ने चालू असून मांजरा नदीपात्रात ३४९४ क्युसेक (९८.९६ क्युमेक) इतका विसर्ग सुरू आहे. धरणामध्ये येणारी पाण्याची आवक पाहून विसर्ग वाढवणे किंवा कमी करणेबाबत निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे, नदी काठावरील, पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सनातन हिंदू बोर्ड स्थापन करा; अहमदपूर येथील हिंदूंचे निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. २७ सप्टेंबर-**
तिरुपती बालाजी मंदिर येथील प्रसादात चरबी मिसळून हिंदू धर्म भ्रष्ट करण्याचा जे षडयंत्र रचले गेले त्याचा निषेध करून प्रकरणाची चौकशीत कडक कारवाईची मागणी करत अहमदपूर येथील हिंदू समाज बांधवा तर्फे येथील तहसिलदार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले, की तिरुपती बालाजी मंदिर तिरुमला तेलंगना येथील नित्यभोग आराधना (प्रसाद) मध्ये प्राण्याची चरबी मिश्रीत तुप वापरुन प्रसाद तयार करुन देशातील सर्व हिंदूंच्या भावना दुखवल्या आहेत. सदर प्रसाद हा बालाजी भक्तांना वाटप करुन धर्म भ्रष्ट करण्याचे षडयंत्र केले आहे. सदर घटनेचा सदर निवेदनाद्वारे आम्ही तीव्र निषेध करत आहोत. तसेच सदर निषेध व्यक्त करुन या निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी करत आहे कि देशात अधर्मीय लोकांना मंदिराच्या ट्रस्टवरील प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमणूक करू नये, सनातन हिंदू बोर्डची स्थापना करणे, अधर्मीयांना हिंदू धर्मस्थळातील व परीसरात येण्यास बंदी घालण्यात यावी. देशातील हिंदू धर्मातील देवस्थानांना शासनाच्या अधिपत्याखालून मुक्त करण्या संदर्भात बील पास करावे. तसेच सदर निवेदन वरिष्ठाकडे पाठविण्याची विनंती तहसीलदार, अहमदपूर यांचे कडे निवेदन कर्त्यांनी केली आहे. सदरच्या मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा अभियानात महाराष्ट्र विद्यालय जिल्ह्यात सर्वप्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २७ सप्टेंबर-**
मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा- २ या अंतर्गत स्पर्धात्मक अभियानामध्ये निलंगा येथील महाराष्ट्र विद्यालयाने लातूर जिल्ह्यात सर्वप्रथम येऊन शासनाच्या अकरा लाख रुपये बक्षीसास पात्र ठरली आहे. शासन स्तरावर शाळेतील पायाभूत सुविधा, शासन ध्येय धोरण अंमलबजावणी, शैक्षणिक संपादणूक इत्यादी निकषांच्या आधारावर परसबाग, शाळा विकासासाठी विद्यांजली पोर्टलवरील भौतिक सुविधांची मागणी व पुरवठा यांची अंमलबजावणी, स्वच्छता मॉनिटरचे कार्य, स्काऊट गाईडचे उपक्रम, क्रीडा क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरापर्यंतची कामगिरी, असाक्षरांचे सर्वेक्षण, ऑनलाइन शिक्षण, शिष्यवृत्ती परीक्षेतील यश, विद्यार्थ्यांसाठी विविध शासकीय योजनांचा झालेला लाभ, आरोग्य विषयक स्थिती जनजागृती, कार्यालयीन कामकाज, वाचन महोत्सव, वर्ग सजावट, ऐतिहासिक वास्तूचे जतन, शासकीय कार्यक्रमातील सहभाग, दिव्यांगासाठी राबवलेल्या सोयी सुविधा, आधार वैद्यता, सरल प्रणाली, यु-डायस प्रणाली अद्ययावतीकरण इत्यादी महत्त्वपूर्ण उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी शाळेच्या माध्यमातून करण्यात आली होती. हे स्पर्धात्मक अभियान ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत घेण्यात आले. सदर निकषानुसार केंद्र स्तर, तालुकास्तर आणि जिल्हास्तरावर मुल्यांकन करण्यात आले. यात सर्व निकषांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे ही शाळा लातूर जिल्ह्यात गुणांकनामध्ये सरस ठरत या स्पर्धेमध्ये सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला. यामुळे शाळेचा नावलौकिक वाढला आहे.

शाळेच्या यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर यांचे सक्षम नेतृत्व, शाळेचे मुख्याध्यापक मोहन नटवे यांचे उत्तम नियोजन, उपमुख्याध्यापक डी. डी. पवार , पर्यवेक्षिका सौ. शिला देशमुख यांची साथ, सर्व शिक्षक- शिक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे योगदान आहे. या यशाबद्दल पालक, शिक्षण विभाग व सर्व स्तरातून शाळेचे कौतुक व अभिनंदन होत आहे.




## अशोक पाटील-निलंगेकरांची काँग्रेस भवनात आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूरअनंतपाळ, दि. २७ सप्टेंबर-**
काँग्रेस भवन, लातूर येथे माजी मंत्री मा. अमित देशमुख यांच्या नेतृत्वाखाली अशोक पाटील-निलंगेकर यांची आगामी विधानसभा निवडणूकी बाबतीत आढावा बैठक पार पडली. यावेळी लातूर जिल्ह्याचे काँग्रेस पक्ष निरीक्षक तथा कर्नाटक प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष ए. वसंतकुमार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मा. अशोकभैय्या शिवाजीराव पाटील-निलंगेकर, प्रदेश सरचिटणीस मोईज शेख, आमदार त्र्यंबक भिसे, प्रदेश सचिव, अभय साळुंके,जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे,शहर जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. किरण जाधव, निलंगा तालुका अध्यक्ष विजयकुमार पाटील, शिरूर अनंतपाळ तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील-उजेडकर, देवणी तालुकाअध्यक्ष अ‍ॅड. अजितराव बेळकोणे, माजी सभापती. अजित माने, महिला काँग्रेस प्रदेश सचिव उषा कांबळे, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष. विद्या पाटील, माजी महापौर. प्रा.स्मिता खानापुरे,ओबीसी काँग्रेस जिल्हाध्यक्ष. एकनाथ पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी काँग्रेस पक्षाचे विचार व ध्येय धोरणे, न्याय जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार या बैठकीत सर्वानुमते करण्यात आला. तसेच लातूर जिल्ह्यासह निलंगा विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी यांच्याशी आगामी विधानसभा निवडणूकीसंदर्भात चर्चा करण्यात आली.

# आ. पाटील-निलंगेकरांच्या पाठपुराव्यामुळे निळकंठेश्वर मंदिराचे काम सुरु

### हभप गहिनीनाथ महाराज औसेकर

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २७ सप्टेंबर-**
निलंगा येथील ग्रामदैवत निळकंठेश्वर मंदिर हे संपूर्ण मराठवाड्याचे भूषण आहे. आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर हे धार्मिक आणि परमार्थिक विचाराचे असल्याने त्यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे पुरातत्त्व खात्याच्या मार्गदर्शनाखाली मंदिरास प्राचीन गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी व मंदिर मूळ स्वरूपात आणण्यासाठीचे कार्य प्रगतीपथावर असल्याचे प्रतिपादन पंढरपूर देवस्थान समितीचे अध्यक्ष हभप गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले.

दि. २६ सप्टेंबर रोजी निलंगा येथील ग्रामदैवत निळकंटेश्वर मंदिरात शहरातील प्रमुख नागरिकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी हभप गहिनीनाथ महाराज औसेकर बोलत होते. यावेळी माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, मधवाचार्य महाराज पिंपळे, माजी नगराध्यक्ष



बाळासाहेब शिंगाडे,उपाध्यक्ष मनोज कोळे, पुरातत्व विभागाचे मुकुंद जाधव, भाजपा जिल्हाउपाध्यक्ष शेषेराव ममाळे, प्रा. दत्ता शाहीर, संजय हलगरकर, वीरभद्र स्वामी,सुनिल पंढरीकर चेरमन दगडू सोळुंके, दत्ता मोहळकर, जयंत देशपांडे, शिवसेनेचे सुधीर पाटील माजी नगरसेवक पिंटू पाटील,शंकर भुरके, शरद पेठकर, किशोर लंगोट सुमित इनानी, अशोक शेटकार मंचक पांचाळ नीलकंठ पेठकर किशोर जाधव उपस्थित होते. सर्व प्रथम औसेकर महाराज व माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी मंदिराची पाहणी केली. व पुरातत्व विभागाच्या कर्मचाऱ्यांशी चर्चा केली.

**काशीच्या जगद्गुरूंचा निर्णय अंतिम ठेऊन काम करू : आ. संभाजीराव निलंगेकर**

निलंग्याचे ग्रामदैवत निळकंठेश्वर मंदिर हे शहरातील व या भागातील नागरिकांचे आराध्य दैवत आहे. मंदिर पिढ्यानपिढ्या टिकले पाहिजे यासाठी मंदिराचे काम पुरातत्त्व विभागाच्या सूचनेनुसार व मार्गदर्शनाखाली केले जाईल. त्याचबरोबर काशीच्या जगद्गुरुंना या ठिकाणी बोलावून त्यांच्या सूचनेनुसार ते ज्याप्रमाणे काम करण्यास आपणाला सांगतील त्याप्रमाणे आपण काम करून घेऊ असे शेवटी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील-निलंगेकर यांनी सांगितले.